Regd NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४९ ] आकोला--सोमवार तारीख ८ माहे मार्च सन १९१५ ई० [ अंक ९

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं द. हां. ........२ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बॅंकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बॅंकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक अकोला ९।९।०९ } J. G. Ridland. एजंट

नो. न २

### केशराचे फूल मुफ्त

पवित्र केशर ॥।= शुद्ध शिलाजीत ॥ असली कस्तूरी २४ ममीरातिनती ३ खालिस हींग ८= तो० सुंदर कामदार शाल ३ व

$३\frac{१}{२}+१\frac{१}{२}$ गज ६ से १०

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० १२

नो० नं० ८

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं रु. १८८.

बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दतमंजन मायफळाशीं कांहीं इग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ९

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारची सुबक व घाटदार भांडा आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठ मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.

नो. नं. ४

### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ९ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यांत श्रीशंकराचार्य, शंकरानंद, व विद्यारण्य यांचे उपनिषदावरील भाष्य, आत्मपुराण व अनुभूतिप्रकाश हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास 'वैशेषिक दर्शन' बक्षीस-

सनातन वैदिक धर्माचें, तत्त्वज्ञानाचें व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें--

### आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथें यांचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधें प्रश्नांची समर्पक उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.

नो० नं० ३

### नोटीस

रा. रा. नथु वल्लद विठोबा व उकर्डा वल्लद गोविंदा आणि काशीराव व गणपत आणि रावजी वल्लद पांडू शिंदे व नामदेव वल्लद इक्रमजी सर्व राहणार ईसापुर ता० आकोट

यांसः---

रामचंद चुनीलाल मारवाडी रा. तेल्हारा ता० आकोट यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी खालील शेतें माझे पासून वहितीस केली होती. त्याचे स्वामीत्वाबद्दल कबुलायत लिहून दिली ती शेतें ईसापूर ता० आकोट येथील.

| स. नं. | ए. गुं. | आ. रु. | |
|---|---|---|---|
| ५३ | ३१८२ | ६९ | दोन्हीचे रुपये ३७७॥ |
| वाकोडी ता० आकोट येथील | | | |
| स. नं. | ए. गुं. | आ. रु. | |
| ३२ | २३८२९ | ६१।=। | |

ईसापूर ता० आकोट येथील शेतें

| स नं. | ए. गुं. | आ. रु. | |
|---|---|---|---|
| ६७ | ३४८३९ | ७१ | ही तिन्ही शेते ७२७॥ |
| ११ | १७८२८ | ४०॥।=॥ | |
| ३४ | १९८१२ | ४० | |

ही शेतें तुह्मांस सन १३२० ते सन १३२४ पावेतों वहितीस दिली होती तीं पट्याचीं वर्षे पुरलीं. पट्यांतील शर्ती प्रमाणें तुह्मी शेते तयार करून ( कुंधाकाडी काढून काळे साफ करून घ्यावे. परत देते वेळीं काळे साफ नसल्यास काळे करण्यांत खर्च लागेल तो भरून देऊं ) व बांधवळ्ळी दुरस्त ठेवूं अशी शर्त लिहून दिली. त्या प्रमाणें करून देण्याविषयीं तुह्मास बहूत वेळ हटलें असतां तुह्मी काळे करून देत नाहीं. करितां सुचवितो कीं नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आठ ८ दिवसांत कुंधाकाडी काढून काळे साफ करून द्यावे व बांधवळ्याची दुरुस्ती करून द्यावी असें न केल्यास आह्मी माणसें खोदण्यास लावूं व जो खर्च लागेल तो तुमचेपासून भरून घेऊं फिर्यादीचे व नोटीशीचे खर्चासह तुह्मास रुपये मजुरीचे द्यावे लागतील कळावें ता० १९ फेब्रुवारी सन १९१५ इ.

सही

रामचंदर चुनीलाल दस्तुर खुद

नो. नं. ७८

### नोटीस

चि० रा० रा० हरी गोविंद शास्त्री मुक्काम बाळापूर पेठ

यांहास

पार्वती भ्रतार राजेश्वर जोशी हल्लीं मुक्काम आकोला इजकडून नोटीस दिली जाते कीं— आपण माझे धाकटे दीर आहांत माझे भ्रतार नामें राजेश्वरशास्त्री हे आपले वडील बंधु होते. आपली आई नामें अहिल्याबाई यांचे आणि आपले माझे भ्रताराशीं पटत नसल्यानें आह्मी उभयतां देगांवीं राहून उदर निर्वाह करीत होतों. परंतु ईश्वरी कोपा मुळें माझे भ्रतार ७।८ महिन्यापूर्वीं परलोकवासी झाले. मरतांना आपली वडिलोपार्जित इस्टेट व वतन हीं एकत्र असल्यानें व मातृप्रेमानें तसेंच आपण मला व दोन मुलांना दोन धंदे करून घेऊन अन्नवस्त्र देऊन पालन पोषण कराल या आशेनें स्वतः मिळविलेल्या जिनगी सह ( खाण्यापिण्याचीं भांडीं कुंडीं, कपडालत्ता, नगवज, पोथ्या पुस्तकें वगैरे. ) आपणांकडेस बाळापूर मुक्कामीं आणिले. व तेथें वरील सर्व इस्टेट आणि आह्मां त्रीवर्गास आपणाजवळ ठेवून परलोक संपादिला. वडील बंधूशीं तसेंच मुलाशीं आईनें कबूल केल्या प्रमाणें पालन पोषण करणें आपणांस उचित होते. परंतु ज्याअर्थीं भाऊ भाऊ किंवा आई व मुलगा यांचे जन्मांत पटलें नाहीं ते आपण माझें कसे पटूं देणार! अखेरीस कीर्ति किंवा लोकोपहास याकडे न पाहतां. उत्तर कर्म आटोपतांच आपण दोघेही "आपण कोठें ही आपली सोय पहा, आमचे कडून व्यवस्था होत नाहीं." वगैरे सांगून वरील नमूद केलेल्या जिनगीपैकीं मला कांहीं एक न देतां घालविलें. मुलगा शाळेंत शिकत होता त्यालाही हाकलून दिले. आह्मी तूर्त माझ्या बापाकडे असतों. वरील आपल्या कृष्ण कृत्यामुळें मला ही नोटीस देणें भाग झाले ती नोटीस अशी— हल्लीं मी व माझीं दोन मुलें या तिघांच्या अन्नवस्त्राची लवकर हिंदु-धर्मशास्त्राप्रमाणें व्यवस्था लावावी. व वरील सामान ही येथें आणून पोचवून माझी पावती घ्यावी. काय व्यवस्था करितां ते नोटीसीद्वारें आठ दिवसाचे आंत कळवावें. तसें न केल्यास योग्य रीतीनें कोर्टमार्फत व्यवस्था लावून घेणें भाग होईल. कळावें. तारीख २१।२।१५

सही

पार्वती भ्रतार राजेश्वरशास्त्री हल्लीं मुक्काम आकोला निशानी अंगठा

नो० नं० ७९

### अनुभवून पसंत ठरलेलो

केशनाशकपूड किं० ४ आणे, दंतमंजन कापूर, शोप, पेपरमिंट, सुंठ, पुदीना, हिंग, अजवान, दवना यांचे अर्क, किं० प्रत्येकीं ४ आणे, कावीळ व मुळव्याध, याच्या अप्रतीम गोळ्या किं १। रु० खरुज गजकर्ण, खवडा, इसब, नायटा, आगपैण; व्रण, चिखली, मुकी, ओली खाज, जखम, नखाविषयीं, तमाम रोगावर चालणारा १ च 'दिलखुष' मलम किं ४ आणे ३ दिवसांत वरील मलमानें गुण येतो पौष्टीक चहा किं ४ आणे, वातनाशक तेल किं १२ आणे, विंचवावर पूड किं. १ रु० व डोळ्यांतील वेगळे सोडण्याचे औ. किं ४ आणे, वि० खु० पत्रद्वारें, वंग प्रवाळ हात होचे किं० तोळ्यास २ रु०

पत्ता – श्री० आर० मुळे,
नांदुरा. जी० आय० पी०
नो० नं० ९


### नोटीस

रा. रा. वामन भटजी जोसी हातगांवकर मु॥ निबे ता. मूर्तिजापूर

इसः—

नोटीस देणार नारायण रामभट मुळे जोसी मु॥ आकोला सिटी यांजकडून नोटीस दिली जाते कीं आपण माझे व्याही आहांत. माझा मुलगा मरून आज ७।८ वर्षे झाली. मी सुनेला न्यावयास बरेच वेळा आलों असतां आपण पाठविलें नाहीं. निरोप पत्रें पाठवून पाहिलें उत्तर नाहीं. आमचा मुलगा वारला ते दुःख गिळन ब्राम्हण बेटीला दुसरा मार्ग नसतो असें मनांत आणून सून वारली असून मुलगा जिंवत आहे अशी भावना धरून तिजला आमचे लेकरा प्रमाणें येथें ठेवून आम्ही खाऊं त्या प्रमाणें भाजी भाकरी घालावयास तयार आहोंत. तरी ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत सुनेला आणून घालावें. तसें नकेल्यास या उपर सुनेला ही येथें ठेवणार नाहीं व अन्न वस्त्राची ही तोशीस लागू राहणार नाहीं कळावें. तारीख. २१।२।१९ इ.

सही

नारायण रामभट मुळे जोसी द. खु.
नो. नं.

### जाहीरनोटीस

सर्वत्र लोकांस या जाहिरनोटिसीनें कळविण्यांत येते कीं वादी गोवर्धनदास माटे यांचे हुकुमनाम्यान्वयें रा० रतनलाल आसाराम भाटे यांची आंबेटाकळी व सीरल येथील सर्व शेती विद्यमान तहसीलदार साहेब ता० बाळापूर हे ता० १९।३।१९ रोजीं दिवसाचे १२ वाजल्यापासून संध्याकाळचे ५ पर्यंत अंबेटाकळी व सीरला येथें हराज करणार आहेत. तरी ही शेती ज्या कोणाची हराजांत घेण्याची इच्छा असेल त्यांनीं हजर राहावें. ता. २३-२-१९ ई.

सही.

वादी तर्फे मु. हिरालाल माणिकलाल शर्मा
नो. नं.

# वऱ्हाडसमाचार

मिति फाल्गुन वद्य ८ शके १८३६

## हिंदुस्थानांतली महर्घता–३

या विषयावरील आमच्या मागल्यालेखांत सध्याच्या महागाईच्या कित्येक कारणांचा व विशेषतः या महागाईचा परिणाम एकंदरीनें हिंदुस्थानाला हितावह असाच होईल या मि. दत्त यांनीं केलेल्या विचित्र विधानाचा विचार करण्यांत आला होता. आज दुसऱ्या कित्येक कारणांचा विचार करून आह्मी या विषयाची रजा घेण्याचा विचार केला आहे. या दुसऱ्या कारणांत अग्रस्थान नाण्यांच्या प्रस्तुतच्या पद्धतीला देण्यांत येत असतें. आमच्या मतें हें महत्व निष्कारण आहे. लोकांच्या खिशांत चांदीचें किंवा सोन्याचें नाणें बरेंचसें खुळखुळूं लागलें म्हणजे लोक सुखी होतील ही कल्पना अनुभवाच्या कसोटीला उतरणारी नाहीं. लोकांचें उत्पन्न कितीही वाढलें तरी जोंपर्यंत त्यांच्या चैनीच्या पदार्थांची परदेशाहून होणारी आयात वाजवीपेक्षां ज्यास्त होत आहे व खाद्यपदार्थांची निकास वाजवीपेक्षां ज्यास्त होऊन लोकांच्या दृष्टीला धान्य ज्यास्त ज्यास्त दुर्मिळ होत आहे, तोंपर्यंत महागाई अशीच पीडा देत राहणार. आज स्थिति अशी आहे कीं उत्तम तलम कपडा, पांढरी रवाळ साखर, स्टेशनरीचें सामान कांच, चिनी मातीचीं भांडीं, शोभेचे पदार्थ वगैरे जीवनास अवश्य नसलेल्या पण मोहक पदार्थांच्या पायीं आमच्या उत्पन्नाचा बराचसा भाग न कळत खर्च होतो. या पदार्थांची रेलचेल परदेशी व्यापाऱ्यांनीं करून सोडलेली दिसते. पण जीवनास अत्यवश्य असलेल्या धान्याचा एक दाणा या परदेशांतून येईल तर शपथ ब्रह्मदेशांतून मात्र हलके तांदूळ येतात. मि. दत्त यांनीं ब्रह्मदेशाचा विचार आपल्या रिपोर्टांतून अजीबात वगळला आहे. पण वस्तुतः तो देश राज्यकारभारापुरता हिंदुस्थानचाच एक भाग समजला जात असल्यामुळें त्या देशांतून होणारी आयात परदेशाहून आलेली ह्मणतां येत नाहीं. सारांश काय, तर आह्मास चैनीची चटक लावून सोडणाऱ्या वस्तूंचा सुकाळ व धान्याच्या आयातीचा अभाव, उलट आमच्या देशच्या धान्याची अप्रतिबंध निर्गत हें सध्याच्या महर्घतेचें हिंदुस्थानाला विशेष असें कारण आहे. बाकीचीं कारणें साऱ्या जगांत व हिंदुस्थानांत सारखींच आहेत. मि. दत्त यांनीं जगांतल्या ठळक ठळक देशांतल्या सध्याच्या महागाईचे प्रमाणाचे सापेक्ष आंकडे आपल्या रिपोर्टांत दिले आहेत त्यां वरून ही हिंदुस्थानांत विशेष महागाई होण्याला विशेष कारण असलें पाहिजे असें निघतें. मि. दत्त यांचे आंकडे येणेप्रमाणें आहेत— हिंदुस्थानांतलें महागाईचें प्रमाण शेंकडा ४०, बेलज्यम २९, जर्मनी २४, अमेरिका २०, कानडा १९, इटली १४, आस्ट्रेलिया १३' फ्रान्स १३, ग्रेट ब्रिटन व आयर्लंड १२' व न्यूझीलंड १. या आंकड्यां वरून हिंदुस्थानांतल्या विशेष महागाईला तसेंच मोठे विशेष कारण असलें पाहिजे हें उघड दिसतें. आमच्या मतें हें विशेष कारण चैनीच्या पदार्थांचा सुकाळ व धान्याचा दुष्काळ हें आहे. खुद्द मि. दत्त यांनीं सुद्धां याच कारणावर जोर दिला आहे. लोकसंख्येच्या मानानें धान्याचा पुरवठा नाहीं असें मि. दत्त यांनीं स्पष्टपणें ह्मटलें आहे. कांहीं वर्षांमागें दुष्काळाच्या कारणाचा विचार करण्या करितां बसलेल्या कमिशनचा सुद्धां हाच अभिप्राय पडला होता. पण तो कमीशनराचा अभिप्राय, मि. दत्त यांचा ही तसाच अभिप्राय व या देशांतील विचारी माणसांचे मत हीं तिन्ही सरकारास मान्य नाहींत. इतकेंच नाहीं तर ज्या सरकारी रिपोर्टांतल्या आंकड्यांवरून हीं अनुमानें काढण्यांत येतात, ते आंकडेच विश्वसनीय नाहींत असें ह्मणण्यापर्यंत सरकारी अधिकाऱ्यांच्या दुराग्रहाची मजल गेलेली दिसते. त्यांचीं जीं ठरलेलीं विशिष्ट मतें असतील त्यांना पुष्टि देणारे आंकडे तेवढे खरे, बाकीचे बटसारे अविश्वनीय ठरल्यावर मग वादच खुंटला. पण प्रस्तुत वादाची वस्तुस्थिति अशी आहे यांत शंका नाहीं. इकडे सरकारी अधिकारी जरी धान्याचा पुरवठा भरपूर आहे असें ह्मणत आहेत, तरी मनांत वागत असलेली रयतेच्या कल्याणाविषयींची कळकळ शेतकीपासून होणारे धान्याचें उत्पन्न वाढत्या प्रमाणावर व्हावें ह्मणून शेतकीखात्या मार्फत त्यांचे जटोकाट प्रयत्न चालले आहेत. जी गोष्ट हातानें कबूल करावयाची, ती तोंडानें कबूल करावयाची नाहीं असा हा सगळा प्रकार आहे. सारांश काय कीं शेतीचें उत्पन्न वाढविण्याची अवश्यकता सरकारला अत्यंत वाटत आहे. तिच्या बरोबरच धान्याच्या निर्गतीला कांहीं आळा घालण्याचे प्रयत्न त्यांचे कडून होतील तर महागाईला लवकरच तोंड काळें करावें लागेल.

पण नुसती धान्याची निपज वाढवून ही काम भागणार नाहीं. लोकांच्या वाढत्या चैनीला आळा घालणें सरकारच्या आटोक्या बाहेरचें आहे, तर निदान त्या चैनीच्या संबंधी बरोबर लोकांचें उत्पन्न वाढेल अशी कांहीं तजवीज केली पाहिजे. अशी तजवीज ह्मणजे देशांतल्या कारखान्यांची वाढ करणें ही होय. हल्लीं कारखान्यांतल्या मजुरांना पूर्वींच्या दुप्पट मजुरी मिळूं लागली आहे, तरी त्यांचे उत्पन्न पोटाची खाच भरण्याला पुरत नाहीं. ती भरण्याला आणि चहा, दारूपिणें, चांगले कपडे घालणें, नाटक तमाशे पाहणे वगैरे अनिवार्य होऊन बसलेल्या चैनीच्या गोष्टींना पुरेल इतकी मजुरी मजूर वर्गाला मिळण्याला दोन गोष्टी केल्या पाहिजेत. एक त्यांचें सामान्य शिक्षण व औद्योगिक शिक्षण वाढून ते कारखान्यांस अधिक उपयुक्त होतील असें करणें व दुसरी मजुराच्या शरीराला पुरेसे धान्य मिळेल इतकी ऐपत कारखान्याला येईल असे करणें. सध्या हिंदुस्थानांतल्या कारखान्यांची स्थिति पाहिली तर असें दिसून येईल कीं कारखाने काढतांना कारखानदारांना गोड वाटते, पण ते कारखाने मोठ्या प्रमाणावर चालविण्यास त्यांचे जवळ भांडवल नसतें; हें सामर्थ्य त्यांच्या अंगीं येण्यास भांडवल, उद्योगधंद्यांची माहिती, काम करण्याची सुरळीत पद्धति व उत्पन्न होणाऱ्या मालाला परदेशांत गिऱ्हाईक मिळविणें, या सर्व कामीं आमचे लोक पंगु असल्यामुळें ते सरकारच्या मदतीची अपेक्षा करीत असतात. इतर राष्ट्रांतून शिक्षणाचा प्रसार इकडच्या पेक्षां ही ज्यास्त झाला असून तेथील लोकांना सरकारच्या मदतीची अपेक्षा वाटते व ती त्यांना मिळतेही. खुद्द इंग्लंड इंग्रज व्यापाऱ्यांना व कारखानदारांना अशी मदत करण्यास आतां तयार झालें आहे. तेंच धोरण इकडे ठेविल्यास आणि शेतकी व उद्योग धंदे यांची अभिवृद्धि झाल्यास सध्याच्या महागाईचा प्रश्न पुढें उरणार नाहीं. पण तसें न झाल्यास मात्र सध्याच्या महागाईच्या कारणांची मीमांसा करण्यासाठीं कामिटी नेमण्याचे सरकारचे श्रम व व्यय हे व्यर्थ खर्ची पडले असें होईल. ईश्वर करो, आणि असा दुर्दैवाचा प्रसंग न येवो.

## देशी संस्थानिकांची संधी.

हिंदुस्थानांतल्या देशी संस्थानिकांनीं मनांत आणिल्यास त्यांना राज्य कारभारांत पुष्कळ उपयुक्त सुधारणा घडवून आणितां येतील. ब्रिटिश अंमलाखालचा मुलुख फार विस्तृत व सर्व ठिकाणी बहुधा एकाच प्रकारची पद्धति ठेवण्याचें सरकारचे धोरण यामुळें कोणतीही सुधारणा इष्ट आहे अशी वरिष्ठ सरकारची खात्री झाल्याशिवाय आणि कित्येक वर्षेंपर्यंत तें प्रकरण टप्पे खात निरनिराळ्या अधिकाऱ्यांच्या हातांतून गेल्याशिवाय कोणतीही सुधारणा घाईनें त्यांना करतां येत नाहीं. पण संस्थानिकांनीं आपल्या रयतेचें कल्याण करण्याची संधी पुष्कळ अधिक असते. इच्छा मात्र पाहिजे, आणि मोठी गोम आहे ती तेथेंच. अशी इच्छा संस्थानिकांचे ठायीं आहे ते भराभर सुधारणा करून दाखवीत आहेत. म्हैसूर संस्थानानें औद्योगिक सुधारणा करण्याचें मनावर घेतलें आहे, बडोद्याच्या महाराजांचें लक्ष विद्याप्रसार व समाजाची सुधारणा यांकडे विशेष आहे, ग्वाल्हेरचे महाराज शेतकरी व जमनिदार यांच्या सुधारणेसाठीं झटत आहेत, जोधपूर, बिकानेर वगैरे रजपूत संस्थानें शौर्याविषयींचा आपल्या घराण्याचा लौकिक कायम राखण्यासाठीं नवा नवसानें आलेली संधी साधून व इंग्रज सेनापतीकडून वाहवा मिळवून रणक्षेत्रावरून यशस्वी होऊन परत फिरले आहेत सांगली संस्थान रयत सभेच्या कारभारांत लक्ष घालीत आहे. या थोड्याशा संस्थानांच्या यादींत आपलेंही नांव यावें अशी स्पृहणीय इच्छा मध्य हिंदुस्थानांतल्या देवासासारख्या छोट्या संस्थानाला होऊन त्यानें ग्रामपंचाईतपद्धतीचें पुनरुज्जीवन करण्याची खटपट जोरानें चालविली आहे हें ऐकून आह्मांस फार समाधान वाटतें. देशी संस्थानांतली रयत ब्रिटिश राज्यांतल्या रयतेपेक्षां अधिक सुखी नसते ही गोष्ट कितीही खेदजनीय

असली तरी वस्तुस्थिति कबूल केल्याशिवाय गत्यंतर नाहीं; आणि याबद्दल पुष्कळ अंशानें संस्थानिकांकडेसच दोष येतो. पोलिटिकल एजंटाची ढवळाढवळ कित्येक राजप्रकरणीं त्यांच्या मार्गांत येत असेल, नाहीं असें आह्मी ह्मणत नाहीं. पण वर सांगितलेल्या अनेक संस्थानिकांना इष्ट सुधारणा घडवून आणण्याच्या कामीं पो. एजंटाकडून अडथळा झाल्याचें दिसत नाहीं. तेव्हां हा आरोप निरर्थक आहे. खरीगोष्ट स्पष्टपणें बोलावयाची ह्मणजे आमच्या संस्थानिकांना स्वतःच्या चैनीपलीकडे कर्तव्यजागृति नसते. अधिकाऱ्यांच्या नेमणुका पात्रतेपेक्षां शिफारशीनें अधिक होतात, यामुळें नालायक लोकांचे हातीं राज्यसूत्रें जातात. खलबतें करून स्वार्थहित साधण्याकडे या लोकांचें सारें लक्ष असतें, व संस्थानिक अशा लोकांच्या हातांतलीं बाहुलीं होऊन बसतात. ही खरी स्थिति लपवून ठेवण्यात अर्थ नाहीं.

## संक्षिप्त युद्ध समाचार.

जर्मनीनें पूर्वेकडील रणक्षेत्रांत पुष्कळ सैन्य जमा केल्यामुळें रशियाला थोडें मागें पाऊल घ्यावें लागलें आहे. तरी तयारी करून एकदम उचल करून पुढें सरकण्याचा त्याचा बेत दिसतो. पश्चिमेकडे सेंट अलोई व पेप्रेसचा कालवा यांच्या मधले खंदक संयुक्तराष्ट्रें घेत चालली आहेत. आस्ट्रियानें पोलंडच्या राजवंशापैकीं एकाला पोलंडच्या गादीवर बसविलें आहे. पोलंडच्या लोकांना अशा रीतीनें वश करून घेऊन रशियाचे विरुद्ध चेतविण्याचा हा प्रयत्न दिसतो. जर्मनीनें तटस्थ राष्ट्रांपैकीं दोघांचीं दोन व्यापारी जहाजें नष्ट करण्याचा यत्न केला. दोन्ही जहाजांचें थोडेंसें नुकसान झालें. यावरून जर्मनीशीं त्यांची भानगड उपस्थित होते कीं काय तें पहावें. अमेरिकेंतल्या जर्मन वकिलांनीं तेथें राहणाऱ्या जर्मनवंशीय अमेरिकन लोकांत इंग्रजांविषयीं द्वेषाचें बीज पेरून ठेविलें आहे. हे लोक अमेरिकेनें ठेवलेल्या धोरणाविषयीं असंतोष प्रकट करूं लागले आहेत. तुर्कस्थाननें ग्रीसच्या वकिलावर पोलीसांनीं अत्याचार केल्याबद्दल क्षमा मागितल्यावरून तें प्रकरण शांत झालेलें दिसत आहे. माटिनीग्रो येथील राजाराणी व राजपुत्र आस्ट्रियाच्या तोफेच्या गोळ्यांपासून फार शिकस्तीनें वाचले. जर्मनींत रसदीचा तोटा पडला आहे ही गोष्ट जर्मन पत्रें आता निरुपायास्तव कबूल करूं लागलीं आहेत. विश्चुला नदीच्या दोन्ही तीरावर घनघोर संग्राम सुरू आहे. त्यांत जर्मनीची फार हानि झाली आहे. पारिस येथील २३०० बारिस्टरांपैकीं १५००लढाईवर गेले आहेत. इंग्लंडांतल्या ईटन नामक पाठशाळेंतले १७ वर्षांवरच्या वयाचे विद्यार्थी बहुतेक लढाईवर गेल्यामुळें ती शाळा ओस पडली आहे. फ्रेंच सैन्य अलसास परगण्यांत शिरलें. हा परगणा ह्मणजे जर्मनीचें चोरद्वार आहे. आतां जर्मनींत प्रवेश होण्याचा मार्ग लवकरच मोकळा होईल. ग्रीस लवकरच या महायुद्धांत पडेल असा रंग दिसत आहे. रुमानियानें इंग्लंड पासून द्रव्य साह्य घेतल्यामुळें त्यालाही युद्धांत संयुक्त राष्ट्रांच्या पक्षानें लढण्याची बुद्धि होईल असा अंदाज आहे. जपान इतके दिवस भूमितृष्णेपासून अलिप्त आहे असें वाटत होतें. पण आतां त्यानें ही चीनकडे एका प्रांताची मागणी केली आहे. हा प्रांत इतके दिवस इंग्रजाकडे होता. या मागणीमुळें इंग्रजांशीं बिघाड न होवो ह्मणजे झालें. इजिप्तदेश सर करण्याची आपली महत्वाकांक्षा निष्फळ आहे अशी अनुभवानें आतां तुर्कांची खात्री झाली आहे. सुएजच्या कालव्याचें रक्षण इंग्रजांनीं मोठ्या बहादुरीनें केलें त्यामुळें विलायतेहून जाणाऱ्या बोटींना आता कांहीं भीति उरली नाहीं.

## विवाहपद्धती.

अंक ७ वरून पुढें चालू.

विवाहपद्धतीच्या इतिहासाचें सिंहावलोकन करितांना हें लक्षांत ठेवलें पाहिजे का ती पद्धति प्रचारांत आली ते वेळीं पूर्वींची कुटुम्ब पद्धति ( ज्या पद्धतींत सर्व अधिकार घराण्यांतील श्रेष्ठ पुरुषाच्या हातीं असत ती पद्धति ) मोडून हल्लीं प्रचारांत असलेली पण मोडूं पहाणारी समाईक कुटुम्बपद्धति आणि व्यक्तिस्वातंत्र्य सुरू झालें होतें. पूर्वींची स्त्रियांची मालकीक कमी होत चालली होती. वाटेल त्या स्त्रीस पूर्वींच्या हिंदु जातींतील प्रचारानुसार वाटेल त्या पुरुषाचा वाटेल तेव्हां आश्रय करतां येत असे. इतका काळ गेला तरी **कोचीन त्रावणकोर, मलबार किनारा, तिबेटच्या दक्षिणे कडील** भाग इत्यादि प्रांतांत अद्यापिही स्त्रियांस लागेल त्या पुरुषास बोलावून घेता येतें. **नेअर, टोडा, मल्याली,** वगैरे जातींत अद्यापही विवाहपद्धति प्रचारांत यावी तशी आलेली नाहीं. मुंबइच अर्धदेवतारूप महाराज जैन धर्मांत काय बखेडा करून आहेत हेंही विश्रुतच आहे. अशा प्रकारच्या स्वातंत्र्यांतून बाहेर निघणें ह्मणजे पहिली पायरी हीच कीं एकदां जो पुरुष पसंत केला त्याजवळ आमरण राहू लागणें. दुसरी पायरी या आजन्म सहवासासाठीं बऱ्याच पुरुषांतून निवड करून येणें अगर पुरुषास पहातांच त्याच्या आधीन होणें. कोणत्या तरी अशा कारण परम्परेनें एकवार स्त्रीपुरुष एकत्र झाले कीं उभयतांनीं आमरण व्यतिरेकानें एकमेकांपाशीं राहूं लागणें. या परस्पर साहचर्यांतून सांप्रतची विवाह पद्धति उत्पन्न झाली आहे. "विवाह पद्धति" हा शब्द जेथें जेथें आला आहे तेथें तेथें सांप्रतची प्रचारांतील पद्धति हा अर्थ योजिला आहे. व नियोग बंद होण्यापूर्वीं जी पद्धति होती ती आमरणसाहचर्यअभिवचनपद्धति होती. नियोगापूर्वींची पद्धति जवळ जवळ ( love at first sight ) किंवा ( emotional out burst of fassion ) **मिथ समय** किंवा **दर्शनादान**पद्धति होती. ह्मणजे नियोगाच्या पूर्वींच्या पद्धतीचें विवाहपद्धति हें पूर्ण उन्नत स्वरूप होय, ज्यावेळीं विवाहपद्धति शास्त्रकार प्रस्थापित करीत होते त्यावेळीं "स्त्रीणाम् गुरुः पतिरेकः" ही शास्त्राज्ञा दिली गेली आहे हें लक्षांत असल्यावर संतवचनांत आणि शास्त्रांत मेळ आहे असें स्पष्ट दिसून येतें.

वरील विवाहपद्धति निरीक्षणावरून स्त्रियांस शिष्यत्वाची दीक्षा घेण्यास लावावें किंवा लावू नये याचा सहज निकाल लागेल. कित्येक वेदांती कर्मवादावर विश्वास ठेवून प्रतिपादीत असतात कीं संततीचा जोम उत्साह, दानत व सदाचरण पूर्वकर्मावर अवलंबून आहे. स्त्रीपुरुषैक्याशीं यांचा संबंध नाहीं. यास दृष्टांतही अशांपाशीं सज्ज आहेच. तो **सूर्यापोटीं शनैश्चराचा** कायम ठशांत छापलेला. कर्मवाद "जेथें शास्त्रवाद, युक्तिवाद ऐतिहासीक पद्धतीचीं अनुमानें, अनुमान व्यवहार इत्यादींच्या" शक्यभावांत प्रादुर्भूत होतो. कोणता ही मनुष्य घ्या. त्यावर अनंत वेगांचे परिणाम घडलेले असतात. व तो जसा आपणास दिसतो तसा त्या सर्ववेगांच्या एक परिणामामुळें दिसतो हा वेगसमुच्चय प्रत्येकाचा उकलत बसणें शक्य नाहीं. दृश्य आणि अदृश्य असेही कांहीं कांहीं वेग आहेत त्यांस कोणी (force) तर कोणी ( circumstances )

असेंही ह्मणतात. परंतु या सर्व परिणाम घटक वेगांमध्यें स्त्रीपुरुषप्रेम हा वेग फार स्थूल प्रमाणानें संततीच्या उत्साहीपणावर, नेटावर आणि दानतीवर परीणाम घडवितो हेंच आमचें ह्मणणें आहे. हें प्रेम मनोभावानें उत्पन्न होत नसेल तेथें धर्मबंधनांनीं उत्पन्न करण्याचा शास्त्रकारांनीं एक सारखा कैक कालपर्यंत यत्न केला व तो यत्न सांप्रतच्या विवाह पद्धतीवरून देखील स्पष्टपणें दिसण्या सारखा आहे. हेंच आमचे प्रतिपादन आहे. याच प्रतिपादनावरून स्त्रीशिष्यत्व संबंधीं पुढील प्रश्नांची बाराखडी उत्पन्न होते.

"अ" देवब्राह्मणाग्निसान्निध्य दानकरून एकवार अर्पण केलेल्या स्त्रीस आपले नाशिवंत गुरूस अर्पण करतां येतें काय? पति तरी दानांत स्वीकारलेलें नाशिवंत गुरूस देऊन टाकू शकतो काय? असें समर्पण ह्मणजे वाण्याच्या घरावर अक्षता टाकण्यासारखें नाहीं काय?

"आ" विवाहित स्त्री ह्मणजे निर्माल्य तिचा स्वीकार गुरु कोणत्या आधारावर करू शकतात?

गुरु काय करतात? बहुतेक मंत्र देतात. मंत्रांत तर द्वैत आहे. मंत्र देवता प्राप्त्यर्थ ते सिद्ध झाल्यावर भेदभाव नष्ट करण्यासाठीं महावाक्यापदेश. महावाक्यापदेशा शिवाय अभेदप्रतीति नाहीं. महावाक्यें तर चार वेदांतून घेतलेलीं. स्त्रियांस जर वेदाचा अधिकार नाहीं तर त्यांस महावाक्योपदेश ग्रहण करण्यास लावणारे गुरु सुधारक कां सनातन धर्मावलंबी? बरें वेदबाह्य पौराणीक मंत्र देवता प्रसन्न करून देतील असें धरलें तर मोक्षप्राप्ति कशी करून देणार? स्त्रियांचें महावाक्य कोणतें? मंत्रसाधन चतुष्टय संपादन करून देऊन अधिकार देण्यासाठींच ना? मग आलें मंत्र गुरु मुखानेंच कां घ्यावें? अधिकार प्राप्त झाल्यावर स्त्रियांस महावाक्याचा तर अधिकारच नाहीं. मग स्त्रियांस मोक्ष तो कसा मिळणार? जर त्यास मोक्षच नाहीं तर त्यांच्या गळ्यांत मोक्षगुरूचें लिंग कां अडकवावें?

'ई' धर्म, अर्थ आणि काम याचें पालन करून अधिकार प्राप्त करून घेतल्याशिवाय मोक्ष प्राप्त होणें शक्य आहे काय? व ज्या गुरूंत मी गुरु आहे असा अहंभाव असेल तो गुरु होणें शक्य तरी आहे काय? धर्मार्थकामांत एकवटून टाकलेलीं स्त्रीपुरुषें मोक्ष मार्गांत मात्र कां व कशी भिन्न होतात? ती भिन्न आहेत अशी कल्पना त्यांच्या मनांत पहिल्यापासून 'अधिकारप्राप्तीपूर्वींच' भरविल्यास पुर्वींच्या विवाहपद्धतींत अपक्रांन्ति केल्यासारखें होणार नाहीं काय? स्त्रिया शरीरानें एका जवळ राहून मनानें ( ह्मणजे ध्यानचिंतनादींनीं ) दुसऱ्याजवळ राहू लागणार नाहींत काय? उभयतां पतिपत्नि एकाच गुरुचें शिष्यत्व घेतील तर त्यांच्यांतील विद्युत्प्रवाह समान होऊन ते समानशील ( either positvie or negative ) अतएव एक गुणी ( like ) होणार नाहींत काय? मग संतति झालीच तर कशी होईल बरें?

'उ' गुरु हुडकून आणून त्यास पत्नी अर्पण करणें हा तरी एक प्रकारचा नियोगच नाहीं काय? प्रजोत्पादी नियोग आणि हा मोक्षोत्पादी नियोग एवढाच काय तो या दोहोंत विशेषता? या नियोगानें पति आपल्या स्त्रीस एकाद्या अहंकारी शास्त्रद्रोही मानवाचेंच ध्यान आणि चिंतन करावयास लावतोना! जैनादि जातींतील चालीचेंच हें नवीन चित्र समाजांत येऊ पहात आहे. नाहीं कां?

**'ऊ' सत्** पद सर्वांस कळतें **चित्** पद सर्वांस कळतें पण **आनंदा**चा अनुभव कोणास आहे हें मात्र समजत नाहीं. त्याचप्रमाणें **आधुनिक गुरूंस** सेवा व षड्रसान्न मिळतें हें सर्वांस दिसतें. तेच स्वतः सद्गतीस जातील कां नरकास जातील हें त्यांसच माहीत नसतें तर इतरांस काय माहित असणार? अशांच्या सारखें चिंतन करणें ह्मणजे वेदान्तांतील कृमिकीटकन्यायानें अशासारखी दुसऱ्याच्या बीजानें संतति निर्माण करून घेणें नाहीं काय? भाडोत्री संततीबद्दल पुरुषानें कां काळजी वहावी?

'ए' मनुष्याच्या मनांत विचार कसे उत्पन्न होतात. त्यांचा दुसऱ्यावर आणि स्वतः वर काय परीणाम घडतो. ते मनोमय व्यापारानेंच कसे समजतात इत्यादि विषयांच्या शास्त्रास ( psychic working ) **विचारमिमांसा** असें ह्मणतात हें ज्यांस समजत असेल ते कधींही स्त्रीपुरुषांस विभिन्न विभिन्न मार्गांनीं चालू देतील काय? देतील तर ते गुरु कीं अधम?

**'ऐ' वामनपंडित, रोहिदास नामदेवादींस** इतके इतके जन्म घ्यावे लागले मग मोक्ष मिळाला. या आख्यायिका खऱ्या असतील तर कोणते गुरु कोणत्या शिष्यास कीति जन्मानंतर मोक्ष देतील हें सांगू शकतील कां?

त्यांस पति आणि पत्नी एकस्थित निश्चीत करवत नाहींत. त्यांच्यानें त्यांच्यांतील जीवास मोक्ष देववेल कां? मोक्ष तरी कोणास? जिवास कां उपाधीस? शास्त्राज्ञा त्यांस एकजीव बनविण्याचा यत्न करतात गुरु त्यांस वियुक्त करीत नाहींत कां? हें इष्ट कां अनिष्ट?

"ओ" स्त्रियांस मंत्र देणें अगर शिष्य बनविणें अगर ज्ञान पटवणें हे सर्व ( Mesmerisum ) शक्तिपाताचे प्रकार नव्हेत काय? अनधिकाऱ्यास कोणतीही गोष्ट

मारून मुटकुन पटविली तर ती कीती दिवस टिकणार? पूर्वरूप कधींनाकधीं येईल किंवा नाहीं? मग हातचें सोडून पळत्याचें मागें कां लागावें?

"मी पाप्याचे पदरीं पडलें आहे" "देहपातानंतर मला मोक्ष आहे." "मला सत्संगति नाहीं" या कल्पनांत स्त्रिया राहिल्यास भवसागर अधिक सुतर होईल कां अधिक दुस्तर होईल ? उपदेशाचें हेंच कां फळ?

(औ) शास्त्रें स्त्रीपुरुष मिळून एक व्यक्ति बनवितात पुत्राभावी पत्नीस मृतपतींचें श्राद्ध व महालय करता येतो पुरुषास गुरु श्राद्ध करतां येतें. तसें विधवा स्त्रियास गुरु श्राद्ध करितां येतें असा किंवा स्त्रियांनीं महालयांत गुरुस पिण्ड द्यावा असा कोणी शास्त्राधार काढून देईल काय? जो गुरु मुकुंदरायाच्या परमामृताचा आधार घेऊन.

> व्रतें तपें नियमांची साकडीं।
> संदेहीं गुंतलीं बापुडीं।
> तीं केंवि पावतील पैलथडीं।
> संसारसागराचिये ॥

असें नित्य शिकवित असतो. त्याच्या निपुत्रीक विधवा शिष्यिणीनें पातिश्राद्ध केल्यास गुरु आज्ञाभंग केला असेंच होणारना? आज्ञा मोडावी तर मोक्ष बुडाला. पाळावी तर पतीस अन्नोदकावांचून परलोकी भुकें मारावें. गुरुचें काय उतर असावे कोण जाणे.

[अं] पतीच्या धनावर गुरुंनीं ताव मारल्यास गुरु पतीचे ऋणी होत नाहींत काय ? मग तें ऋण फेडण्यासाठीं त्यांस दुसरा जन्म घेऊन तें फेडावें लागणार नाहीं काय ?

"अः" स्त्री शिष्यिणी केल्यानें त्या शिष्यिणीची भवयात्रा कष्टप्रद होईल कां सुगम होईल ?

या बाराखडीवरून स्त्रियांचे कपाळीं शिष्यत्वाची विभूति फांसणें कीति अयुक्त आहे हें सहज ध्यानांत येईल. इतकेंही असून कोणास गुरुस कुरघोडी करून द्यावयाची असेल तर तें आमच्या समाजाचें दुर्भाग्यच समजावयाचें.

---

## महायुद्ध

या महायुद्धाच्या बातम्या अलिकडे थोडथोड्या महत्त्वाच्या येऊं लागल्या आहेत. लवकरच समुद्रावर व खुष्कीवर निकराच्या लढाया होतील असा रंग दिसतो. आजपर्यंतच्या हकीकतींचें सरकारी साप्ताहिक युद्धवृत्त खालील प्रमाणें आहे. त्यावरून प्रस्तुतच्या स्थितीची कल्पना चांगली होण्यासारखी आहे.

### साप्ताहिक युद्धवृत्त.

#### अमेरिकेचीं जर्मनीकडे तक्रार.

१ ब्रिटिश समुद्रांत फिरणाऱ्या निरुपद्रवी व्यापारी गलबतांस बडवून टाकूं अशी जी जर्मनीनें धमकी दिली आहे त्यामुळें तटस्थ राष्ट्रांना व विशेषतः अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांना, अतिशय चीड आली आहे, हें मागील लेखांत सांगितलेंच आहे. संयुक्त संस्थानांच्या अध्यक्षांनीं (युनायटेड स्टेट्सच्या प्रेसिडेंटांनीं) जर्मनीस एक खलिता पाठविला आहे. त्यांत असें ह्मटलें आहे की जर्मन पाणबुड्या बोटींनीं जर कां एखादें अमेरिकन जहाज बुडविलें तर युनायटेड स्टेट्सनां आपल्या जहाजाचें संरक्षण करण्या करितां उपाय योजणें भाग पडेल.

#### जर्मनीचें उत्तर.

२ वरील खलित्यास गेल्या आठवड्यांत जर्मनीनें उत्तर दिलें त्यांत असें ह्मटलें आहे कीं "अमेरिकन गलबतें जर ब्रिटिश समुद्रांत शिरलीं व तेथें त्यांस दुर्दैवानें कांहीं धोका पोहोंचला तर त्याची जबाबदारी सर्वस्वीं त्यांचेच माथीं राहील". ह्याचा अर्थ इतकाच कीं जर्मनी तीं गलबतें बुडवून टाकणार! असें ह्मणतात कीं ह्या उत्तरानें अमेरिकन लोक जर्मनांविरुद्ध अधिकच खवळून गेले आहेत.

#### जर्मनींत दारू गोळ्याचें सामानाचा दुष्काळ

३ मागील लेखांत ह्मटल्या प्रमाणें जर्मनी अगदींच हताश झाला असला पाहिजे. अगदींच हताश झाला नसता तर अमेरिकनां सारख्या लोकांचें मन दुखविण्याचें त्यानें साहस केलें नसतें. जर्मनी हताश तर झालाच आहे पण तो देशांतील अन्नसामुग्रीच्या दुष्काळापेक्षां दारू गोळा करण्यास लागणाऱ्या सामानाचा जो दुष्काळ पडला आहे त्यानेंच अधिक हताश झाला आहे. असें ह्मणतात कीं तांबें, पेट्रोल, रबर, निकेल व मँगॅनीज इत्यादि ज्या वस्तु दारू गोळा तयार करण्यास अवश्य लागतात त्या सर्वांचा जर्मनींत फारच तुटवडा पडूं लागला आहे.

#### जर्मनीनें व्यापारी गलबतें बुडविलीं.

४. हा माल जो जर्मनींत पोहोंचत नाहीं त्याचें कारण ब्रिटिश आरमार तो जर्मनींत पोहोंचुच देत नाहींत हें होय असें या लेखमालेंत वारंवार सांगितलें आहे. जर्मनीस पोहोंचावा या हेतूनें पाठविण्यांत येणारा युद्धोपयोगी असा सर्व माल ब्रिटिश लढाऊ जहाजें पकडतात हें सर्वथैव योग्य आहे. ब्रिटिश समुद्रांत येणारीं व्यापारी जहाजें आपण बुडवून टाकिलीं ह्मणजे इंग्लंडास माल पोहोंचणार नाहीं असा जर्मनीला भ्रम आहे, आणि जर्मनीनें आपल्या जाहिरनाम्यांत ह्मटलें आहे कीं आमच्या पाणबुड्या बोटी तारीख १८ फेब्रुवारीपासून आपलें विध्वंसक काम सुरु करतील. पण वस्तुतः जर्मनांच्या पाणबुड्या बोटींनीं त्या तारखेच्या अगोदरच कित्येक व्यापारी गलबतें बुडविलीं आहेत; त्यांपैकीं एक ब्रिटिश गलबत होतें, दोन फ्रेंचांचीं होतीं आणि एक तटस्थ राष्ट्राचें, ह्मणजे नॉर्वेचें, होते.

५ फेब्रुवारीची १८ वी तारीख आली तरी सुद्धां व्यापारी गलबतें ब्रिटिश बंदरांत नेहमीं सारखी येजा करितच राहिलीं. वस्तुतः त्या दिवशीं जितकीं गलबतें लिव्हरपूलच्या बंदरांत आलीं किंवा डोव्हरचे सामुद्रधुनींतून आलीं गेलीं तितकीं केव्हांही या पूर्वी एकाच दिवसांत आलीं गेलीं नव्हतीं. अर्थात् जर्मनीच्या डरकावणीचा कांहींच परिणाम झालेला नाहीं.

#### ब्रिटिश विमानांचे जर्मन तळावर हल्ले.

६ जर्मन लोक बेलज्यमचे किनाऱ्यावरील कांहीं ठिकाणे पाणबुड्या बोटींचे तळ ह्मणून तयार करित होते त्या ठिकाणीं ब्रिटिश विमानांनी बांब टाकले असें मागल्या लेखांत कळविलें होतें नुकत्याच आलेल्या तारांवरून असें कळतें कीं ह्या विमानांनीं शत्रूची बरीच नुकसानी केली. जर्मन विमानांच्या एका मोठ्या विमानगृहाचा त्यांनीं नाश केला आणि एक मोठा विजेचा कारखाना व रेल्वेचा पूल हे मोडून टाकले. त्यानंतर आणखी ४० ब्रिटिश विमानांनीं आणखी एकदां बांब टाकून जर्मनांची कित्येक लष्करी बांधकामें मोडून टाकलीं.

#### ब्रिटिश वैमानिकांची उत्कृष्ट कामगिरी

७ शत्रूंच्या मोर्चांवर हल्ले करून आणि रणमैदानांत शत्रू कोठें कोठें आहेत ह्याची टेहळणी करून ब्रिटिश वैमानिक तर फारच छान कामगिरी बजावित आहेत आकाशांत जाऊन ते शत्रूंच्या सैन्याची टेहळणी करितात व शत्रूंचे पुष्कळसे लोक एकत्र कोठें जमलेले आहेत व त्यांच्या मोठमोठ्या तोफा कोठें आहेत तें पाहून परत येतात व आपण काय काय पाहिलें ते आपल्या गोलंदाजांस कळवितात. आणि मग ब्रिटिश तोफा शत्रूवर अचुक मारा करून त्यांचे सैन्याची भयंकर कत्तल करितात.

#### जर्मन झेपेलिन विमानांचा नाश.

८ उलटपक्षी, लोकांस वाटलें होतें तसें यश तर जर्मन विमानांना आलें नाहींच पण सर्वांत मोठी आणि नवीन अशी त्यांचीं दोन विमानें मात्र गेल्या आठवड्यांत नाश पावलीं.

#### फ्रान्समधून छानदार बातमी आली आहे.

९ फ्रांसमधील रणक्षेत्राच्या पट्टीच्या एका भागाकडून फार छान बातमी आली आहे. ह्या पट्टीच्या पूर्वेस, ह्मणजे जेथें ती जर्मन सरहद्दीशीं जाऊन भिडली आहे तेथें, फ्रेंच सैन्य पुढें सरकलें आणि 'आल्सेस' मधील एक महत्त्वाचें तटबंदीचें ठाणें त्यांनीं काबीज करून पांच तोफा, शेंकडों बंदुका ढाली, बांब, टेलिफोनें, आणि हजारों काडतुसें सर केलीं. ह्या पट्टीच्या बाकीच्या भागावर उभय दळांचे स्थितींत कांहींही फरक झालेला नाहीं.

#### राशियन सैन्य पूर्व–प्राशियांतून परत फिरलें.

१० रणक्षेत्राचे पूर्वेकडील भागांत, ह्मणजे पोलंड मधील पूर्व–प्राशियांत व कार्पेथियन पर्वताचे टापूंत उभय दळांचे स्थितींत कांहीं लक्ष्यांत ठेवण्याजोगे फरक झाले आहेत. पूर्वप्राशियामध्यें शत्रूंनी आपलें सैन्य बरेंच वाढविल्यामुळें राशियन सैन्य परत फिरून आपल्या देशांत गेलें आहे. पण जर्मन सैन्याला फारसें पुढें सरकता येईल कीं नाहीं ह्याची शंकाच आहे, कारण राशियन सैन्य तेथें चांगलीं मजबूत तटबंदीचीं ठाणीं धरून बसलेलें आहे.

११ पोलंडमध्यें उभय दळांची स्थिति होती तीच कायम आहे.

#### बुकोव्हिनांतूनही रशियन सैन्य परत फिरलें

१२ रशियन मुलुखास लागून असलेल्या 'बुकोव्हिना' प्रांतांत आस्ट्रियन सैन्यानें पुढें सरकून 'क्झेमोविट्स' नांवाचें महत्त्वाचें व मध्यवर्ती ठाणें पुनः व्यापिलें आहे.

#### पण कार्पेथियन पर्वतांत रशियन सैन्य पुढें सरकतच आहे.

पण ह्या अवधींत कार्पेथियन पर्वतांत रशियन सैन्यानें आपला क्रम नेटानें चालूच ठेवला आहे. अशी तार आली आहे कीं "तेथें रशियन सैन्य करील ती पूर्वदिशा अशी स्थिति झाली आहेसे दिसतें."

१४. 'तुर्कांनीं सुवेझवर हल्ला करण्याचा नाद सोडला.

'सिनाई' द्वीपकल्पांत तुर्की सैन्याच्या एका २०० लोकांच्या तुकडीचा पराभव झाला. पण सुवेझकालव्याचे टापूंतुन तुर्की सैन्य मागें हटलें आहे आणि आतां पुनः ते सुवेझवर हल्ला करतील असें वाटत नाहीं. काकेससमधील रशियन मुलुखातून सर्व तुर्कांस हांकून लावण्यांत आलें आहे.

#### हिंदी सैन्याचा बहुमान

१५. फ्रान्स व बेलज्यममधील ब्रिटिश व हिंदी सैन्याचे कमांडर इन्-चीफ यांजकडून डिसेंबर व जानेवारी या महिन्यांतील युद्धाचे हकीकतीचा नुकताच एक खलिता पाठविण्यांत आला आहे ह्या खलित्यांत त्यांनीं ज्या अंमलदारांनीं किंवा सैनिकांनीं ह्या युद्धांत विशेष बहादुरीचीं कामें केलीं अशा मंडळीचा नामानिर्देश केला आहे. ह्या खलित्यात हिंदुस्थानांतील ब्रिटिश व हिंदी पलटणींतील मिळून २०० हून अधिक अंमलदार व शिपायी यांचा नामनिर्देश करण्यांत आला आहे. ह्या नांवांमध्यें पुढें लिहिलेलीं नांवें आहेत:—किशनगडचे महाराजाधिराज, सर प्रतापसिंग जोधपूरचे महाराज, टिक्कारीचे महाराजासिंग, कॅप्टन मलिक उमार हयातखान, लेफ्टनंट मलिक मुमताझ महंमद खान आणि पन्नाचे लेफ्टनंट राजकुमार हीरासिंग.

---

## युरोपांतील महायुद्ध.

गेल्या दहाबारा दिवसांत समरक्षेत्राच्या पश्चिम भागांत विशेषशी गडबड नाहीं. अतलांतिक महासागरांत इंग्रजांच्या पांचचार बोटी बुडविल्या नंतर जर्मनी स्वस्थ बसून आहे. पूर्वेकडे मात्र बरीच धामधूम चालली आहे. मध्यंतरी राशिया बराच मागें हटल्याच्या बातम्या आल्या होत्या. कोणी ह्मणतात कीं जर्मन पत्रानीं या खोट्या बातम्या मुद्दाम प्रसिद्ध केल्या होत्या. त्या खऱ्या धरून चाललें तरी अलीकडे राशिया विजयी होत चालला आहे यांत शंका नाहीं. त्यानें आस्ट्रियाला तर चांगलाच हात दाखविण्याचें मनात आणिलें आहे. इंग्लिश व फ्रेंच आरमारें डार्डनेल्स सामुद्रधुनींतून तोफांचा भडिमार करून किनाऱ्यावरील किल्ल्यांचा सत्यनाश करीत सुटलीं आहेत. गेल्या आठवड्यांत चार किल्ले त्यांनी जमीनदोस्त करुन टाकिले. आस्ट्रिया व तुर्कस्थान या दोघांची सारखीच दुर्दशा आहे. एकाचें राष्ट्रीय निशाण जाळण्यांत आलें, तर दुसऱ्याच्या मुख्य राजधानीवरच नवग्रहांची दृष्टि आहे, इटलीची लढाईची तयारी उघड रीतीनें चालली आहे. संयुक्त राष्ट्राच्या वतीनें इटलीनें युद्धांत पडावें अशा प्रकारची मागणी करणाऱ्या स्वतंत्र चळवळीला अलीकडे व्यापक स्वरूप प्राप्त झालें आहे. इतर तटस्थ राष्टांच्या मनाची

स्थिती ही फार चंचल झाली आहे. कांस्तातिनोपल संयुक्त राष्ट्रांनीं घेतल्यावर मग तर रुमानियाला युद्धांत सामिल व्हावेंच लागेल. हालंडला कांहीं हाल चाल करतां येत नाहीं. त्यानें जरा थोडीशी हालचाल दाखवितांच जर्मन सैन्य हालंडांत पसरून बेलज्यम सारखी उध्वस्तता करून टाकतील ही त्याला भीती वाटते. शिवाय बेलज्यम मधून पळून गेलेल्या लोकांची संख्या तेथें मोठी आहे. जर्मन धाड तेथें ही अभ्यास त्या विचाऱ्यांना यमसदनच पाहवें लागेल. डेनमर्कला संयुक्त राष्ट्रांचें चांगलें पाठबळ मिळण्याची खात्रा वाटल्याशिवाय युद्धांत सामिल होण्यापासून त्याला फायदा वाटत नाहीं. ग्रीस आणि बलगेरिया यांचें तूर्त विशेष महत्त्व नाहीं. अशी तटस्थ राष्ट्रांची स्थिति आहे. व्यापारी जहाजासंबंधानें अमेरिकेशी तंटा करण्याची ग्रेटब्रिटनची बिलकुल इच्छा नाहीं. ह्मणून डेशिया नावाचें अमेरिकन व्यापारी जहाज पकडण्याची कामगिरि फ्रान्सला करावी लागली. तें जहाज फ्रेंचांनी पकडलें आहे व लवकरच प्राइझ कोर्टा पुढें त्याचा खटला जाईल. कायद्याची परीक्षा पाहण्या साठींच मुद्दाम अमेरीकेनें हें छोटेंसें पिलुं पुढें सोडलें आहे असें ह्मणतात. या खटल्याच्या निकालावर पुढें मोठाल्या गोष्टी अवलंबून आहेत.

## वऱ्हाडचा प्रश्न

### ( चांगल्या माणसाची हेलना )

न्यायखात्यांतील ४०० रुपया वरच्या जागा भरतांना लायकीचे सद्गुण पाहण्यांत येतात. केवळ नंबरवारीनें घोड्यामागून घोडा ऊभा करीत नाहींत ह्मणजे या मोठ्या जागा संबंधानें वरिष्ठांच्या मर्जीचा प्रश्न पुढे येतो. रा. रा. ड्रेक्‌ब्रॉकमन हे जुडिशिअल कमिशनर आहेत आणि त्यांच्याच मतश्रीला स्थानिक सरकार आपली मन डोलवीत असते. राजश्री ड्रेकब्रॅकमन यांचा लौकिक मोठा आहे. किंबहुना त्यांच्या कडक व निस्पृही बाण्यावर लोकांची भिस्त मोठी आहे. पण त्यांच्या एककल्ली स्वभावाला अलिकडे विशेष स्थळें मिळतात आणि त्यांचा कान कोणाच्या विनवणीकडे झुकेल याचा नेम नसतो असें आह्मांस वाटूं लागलें आहे. गेल्या १३ फेब्रुवारीच्या ग्याझिटांत ८०० रुपयांची जागा भरतांन आमच्या वऱ्हाडच्या दोन अधिकाऱ्यांचे सद्गुण त्यांच्या डोळयांत उतरले नाहींत असें दिसतें. रा. रा. माणिकजी रतनजी दस्तूर यांस बाजूला सारून त्यांनीं राजश्री केळकर यास बढती दिली. आणि त्याच वर्गांवर्गींत रा. रा. गोपाळ वामन बापट यांस पुनः दुसऱ्यानें खालींच ठेऊनरा. रा. रामलाल पांडे यांस उडत पाखऱ्या प्रमाणें चार पांच घरें एकदम वर नेऊन बसाविलें आहे. राजश्री दस्तुर लॉ ग्राज्युएट नाहींत असा आक्षेप निघूं शकेल पण राजश्री बापट ह्मणजे वऱ्हाडांतील सर्वमान्य उत्तमोत्तम अधिकाऱ्या पैकीं एक अहेत व त्यांन गालबोट लावण्याला कोठेंन अवकाश नाहीं. आह्मास वाटतें राजश्री ड्रेकब्राकमन यांस त्यांचा परीचय नाहीं ह्मणून असा प्रकार झाला असावा. चांगल्या माणसाची हेलणा सर्व चाकरींतील शोभा नाहींशी करिते तेव्हां मोठ्या वरिष्ठ माणसांनीं आपली चूक वाटल्यास ती दुरुस्त करावी यांनच त्यांचा मोठेपणा मोठा होईल व स्थनिक सरकारची न्यायदृष्टी चांगली उज्वल होईल. इच्छा प्रदर्शित करणें आमच्या हातीं आहे पण वऱ्हाडच्या चांगल्या माणसाकडें करडी नजर न करणें सरकारच्या हातीं आहे. नाहीं तर, वऱ्हाडला कोणी वली नाही असें लोक ह्मणूं लागतील. राजश्री ड्रेकब्राकमन हे न्यायदेवतची आंधळेपट्टी वयोमानानें अधिकाधीक आपल्या डोळयावर घट्ट बसूं देणार नाहींत असा आह्मांस भरंवसा आहे.

## वऱ्हाडवृत्त

**हवामान**—तुफान वारा, विजांचा कडकडाट व जोराची मेघवृष्टी यांनीं गेल्या दहाबारा दिवसांत पर्जन्यकालाचाच देखावा उभा केला होता. सुमारें ४ इंचा इतक्या पावसानें नासधुस मोठी झाली आहे. रोगराई त्या मानानें वाढलेली नाहीं व प्लेगाची भिती नाहीं ही कृपाच होय. हळूं हळूं शिशीर ऋतु आपलें गुलाबी रूप पुनः धारण करूं लागला आहे.

प्लेगची स्वारी नागपुराहून उमरावती बडनेरा या शहरांपर्यंत आली आहे. या स्वारींची वक्रदृष्टि आपल्या शहरावरही फिरते कीं काय अशी भीति वाटूं लागली आहे कारण शहरांत व शहराच्या बाहेर असलेल्या वस्तींत उंदीर मरूं लागले असल्याबद्दल ऐकिवांत येत आहे.

रा. रा. बी पी स्टांडन कमिशनर हे दर्यापूर व मुर्तिजापूर येथील तहशिलीची तपासणी पुरी करून कारंजा मार्गानें काल रोजीं वाशिमास गेले आहेत.

**हॉलिका संमेलन**—या संमेलनाची कार्यें पावसामुळें चांगलीं जुळलीं नाहींत तथापि तरुण पिढीच्या मनाचा ओघ उत्तम सन्मान्य करमणुकीच्या मार्गाकडे बदलला आहे हें सार्वजनिक मिरवणुकीवरून दिसून आलें.

## जाहिरात.

सर्व देशमूख लोक वऱ्हाड यांना विनंती पूर्वक कळविलें जातें कीं मौजे कटार ता० व जिल्हे अकोले येथील टिकाराम रामचंद्र देशमूख यांजवर तेथील बनी माहारीण इनें तिचें पोट आणल्याचा आळ घेतला अहे तथापि या गोष्टीस जरी कांहीं पुरावा नाहीं. तरी शद्ध दोषामुळें ता० १७।२।१९१५ इ० रोजीं मौजे कटार येथें जमलेली देशमूख मंडळी यांनीं प्रोसिडिंग करून ठराव पास केले आहेत. त्यांत ठराव नंबर १चे वरून त्यास प्रायश्चित देण्याचें बहुमतानें ठरविलें आहे. टिकाराम यानें वर दर्शविलें प्रमाणें कांहीं केल्याचा प्रत्यक्ष पुरावा तर नाहींच, यद्यपि असता तरी आज कालचे कालमानानें पाहतां त्याचा गुन्हा अक्षम्य नव्हता. शद्धदोशाकरितां टिकाराम याजपासून दंडादाखल रकम रुपये ७५० साडेसातशें घेण्याचें ठरलें असून पैकीं रुपये अडीचशें '२५०' प्रायश्चित विधीस खर्च करावे व २५० अडीचशें भोजनखर्च व मंडळीस बोरगांव स्टेशनहून कटार येथें येणें जाणें बद्दल गाडी भाडे बद्दल खर्च करावे. व रुपये २५० अडीचशें मराठा समाज ऑफिस उमरावती यास द्यावे या प्रमाणें ठराव नंबर १ चा केला आहे. येणें प्रमाणें ता० १७।२।१५ रोजीं ठरलें आहे. व तारीख १४।३।१९१५ इसवी रोजीं बहुमतानें प्रायश्चित देण्याचें ठरविलें आहे. तरी या संबंधांत ज्यास आपले प्रतिकूळ मत देणें असेल तें सकारण द्यावें व वरील तारखेचे आंत ह्मैसांग येथें खालीं सही करणार यांचे पत्यावर कळविणें ह्मणजे या संबंधांत पुन्हा ता० १४।३।१९१५ इ० रोजीं विचार करून बहुमतानें प्रायश्चित द्यावें अथवा न द्यावें हें ठरविण्यांत येईल व सदहु दिवशीं बरीच मंडळीही हजर राहील कोणाकडून कांहीं ठराव मता बद्दल पत्र वर दर्शविलेले तारखेचे आंत न आल्यास सर्व देशमूख मंडळी राजी आहेत असें समजलें जाईल. कळावें ता० ४।३।१५ इ०

सही आपला

नारायणराव बाबुरावजी देशमूख

## नोटीस

भाऊराव वा॥ झाबुजी पागरूत जात कुणबी रा० चुसर ता० व जि० आकोला. यांसः—

या नोटीसीनें कळविण्यांत येते कीं तुह्मी माझें लग्नाचे पति आहां तुमचा व माझा विवाह होण्यास आज सोळा सतरा वर्षें झालीं. गेल्या अकरा बारा वर्षांत तुह्मी मला मुळींच नेलें नाहीं. दीडवर्षापूर्वीं माझा भाऊ अर्जुन यानें मला तुमचे घरीं पोहोंचविलें. तेव्हां मला कळून आलें कीं तुह्मी सात आठ वर्षांपूर्वीं गंधर्वाची स्त्री केली आहे. मला तुह्मी उभयतांनीं फार वाईट वागविलें. खाण्यांत कांहीं घालून मला मेंदुविकार घडविला. पंधरा दिवसांनीं माझा भाऊ परत येऊन मला घेऊन गेला. मी अकरा बारा वर्षें एक सारखी (वरील पंधरा दिवस सोडून) माझे बापाचे घरीं आहे. माझे अन्नवस्त्राचा खर्च जवळ जवळ दोनशे रुपये साल आहे. गेल्या तीन वर्षांचा खर्च आपली तडजोडीनें निदान चारशे रुपये तरी माझ्या बापास द्यावे. पुढील अन्नवस्त्राबद्दल करार करून द्यावा. व माझा मेंदुविकार बरा करण्यासाठीं माझे बापानें पाण्यासारखा खर्च केला. त्या पैकीं दोनशें व खावटी आणि वस्त्रप्रावरण बद्दल वर मागितलेले साडेचारशें असे ६५० अक्षरी साडेसहाशे रुपये ही नोटीस पावल्यापासून दहा दिवसांचे आंत माझे बापास देऊन पुढील अन्नवस्त्रासाठीं रकम बांधून करार करून द्यावा. तसें न कराल तर रकमेसाठीं दिवाणींत आणि अन्नवस्त्रासाठीं क्रि. प्रो. को. कलम ४८८ अन्वयें फौजदारींत दावे आणीन. तुह्मी आपल्या हल्लींच्या बायकोच्या बापाजवळ मला नांदवणार नाहीं असा करारनामा लिहून दिला आहे ह्मणून ऐकतें. त्या कराराशीं माझा अर्थाअर्थी संबंध नाहीं. तो असेल तर मला मान्य नाहीं कळावें ता० ६ माहे मार्च सन १९१५ सही

शेवंती भ्रतार भाऊराव पागरुत

इचा नि० — रेघ

द० अर्जुन वा॥ बापुजी काकड

रा० मोरगांव ता० आकोला

जि० आकोला नि० डावा आंगठा

## नोटीस

नोटीश बेशमी जानू वा॥ दानू भीसे रा० खेर्डा ता० खामगांव जिल्हा बुलडाणा

यांस

खाली सही करणारा कडून कळविण्यांत येते कीं, माझी मालकीची जमीन दरसाल ९०० रु० नफ्याचे चिधुर्वे व तुझें नांवानें ५ वर्षांचे करारानें पट्टा छापलेला आहे त्या जमीनीचा तपशील येणेंप्रमाणेः—

| सर्वे नं० | ए० गुं० आ० | रुपये |
| --- | --- | --- |
| ९७ | २९८३७ | ४९ |
| ६ | १०८१२ | २४ |
| १०९ | ३८३७ | ८ |

ही जमीन खेर्डा येथें असून तुह्मांस दिली होती व त्याप्रमाणें एक वर्षाचे रुपये ९०० भरून पावलों व यंदाचे पिकाचे पैश्याबद्दल दहा पांच वेळा मागणी केली परंतु तुमचा विचार पैसे देण्याचा नसून तुह्मी चळवळीच्या गोष्टी करितां व तुमचे स्वतःचे मालकीची जमीन व जिंदगी अफरातफरा करण्याचे विचारांत आहां त्याकरितां वरील नोटीशीनें सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं जो कोणी याचेशी व्यवहार करील त्याचा सर्व व्यवहार खोटा असा ठरला जाईल.

ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत रकम न मिळाल्यास कोर्ट मार्फत कायदेशीर तजवीज केली जाईल कळावें. ता० ७।३।१९१५ इ०

सही

किसनलाल कुसालचंदजी

रा० खेरडा द० खु०

## जाहीर नोटीस

खाली सही करणार याजकडून सर्व लोकांस जाहीर करण्यांत येते कीं माझा भाऊ नामे मोती वा॥ बाबनसा पाहाड रा० कारंजा ता० मुर्तिजापूर जि० आकोला हा बरेच दिवसा पासून वेडा झाला असून बेजात झाला आहे. आज सरासरी ४।५ महिने झाले तो बाहेर गांवीं त्याचे मनास वाटेल तिकडे तो भटकतो. तो व आह्मी पुष्कळ दिवसा पासून विभक्त आहोत. त्याचा आमचा अर्था अर्थी कांहीं संबंध नाहीं. कोणी त्याज बरोबर कांहीं व्यवहार केल्यास त्याची जबाबदारी आमचेवर मुळींच नाहीं व त्याचे व्यवहारानें कोणतेही प्रमाणें आह्मी बांधले जाणार नाहीं. करितां ही जाहीर नोटीस दिली आहे. ता० २९ माहे फेब्रुवारी सन १९१५ इ०

द० लक्ष्मण बाळकृष्ण देशपांडे कारंजा हल्लीं मु० आकोला.

सही

सहीची नी० भोनाजी वा॥ बाबनसा पाहाड रा० कारंजा ता० मुर्तिजापूर ह० मु० आकोला.

# युरोपांतील महायुद्ध.

—:※:※:※:—

## उपयुक्त व विविध माहितींचा संग्रह.

( रंगीत नकाशे व विविध चित्रें यांसह. )


सांप्रत युरोपांत जें महायुद्ध चाललें आहे, त्यासंबंधांत लागणारी सर्व प्रकारची माहिती थोडक्यांत वाचकांस समजावी, अशा उद्देशानें हें पुस्तक तयार केलेलें आहे. वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या लढाईच्या बातम्या या पुस्तकांत घेतलेल्या नसून, हल्लींच्या महायुद्धाचें ज्ञान सुलभ रीतीनें होईल अशा प्रकारची संगतवार हकीकत घेऊन, शेवटीं वेगवेगळ्या रणभूमीचे २ नकाशे; आणि सर्व जगाचा व युरोपांतील सर्व रणसंग्राम—भूमीचा एकत्र असे दोन रंगीत नकाशे, आणि लढाईंत सामील झालेल्या राष्ट्रांचे बलाबल दाखविणारा नकाशा, याप्रमाणें पांच नकाशे या पुस्तकास जोडले आहेत. ह्या नकाशांत लढाईचीं मुख्य ठिकाणें, आरमाराच्या जागा, किल्ले मुख्य शहरें, नद्या, रेल्वे इत्यादि माहिती स्पष्ट करून दाखविली असून, शिवाय स्पष्टीकरणार्थ ३ कोश जोडले आहेत. या कोशांच्या आधारानें लढाईंतील शहरांची, बंदरांची, गावांची, त्याचप्रमाणें लढाईंत भाग घेणारे थोर पुरुष आणि शस्त्रास्त्रासंबंधानें वापरण्यांत येत असलेले पारिभाषिक शब्द इत्यादि माहिती थोडक्यांत समजेल अशी योजना केली आहे. पुस्तकांतील विषयांचीं ४९ प्रकरणें केलीं असून त्यांत युरोपांतील राष्ट्रांची परिस्थिति, लढाईचीं कारणें, जर्मनी इंग्लंड, रशिया, फ्रान्स, आस्ट्रिया, सर्विया, टर्की, बेल्जम इत्यादि राष्ट्रांचा परस्परांत झालेला पत्रव्यवहार नाकेबंदीचीं ठाणीं, व्यापाराचा प्रसार, वेगवेगळ्या राष्ट्रांच्या परिस्थितीची माहिती, लढाईशीं संबंध असलेल्या थोर पुरुषांची माहिती, आतापर्यंत लढाईंत घडलेल्या गोष्टींची त्रोटक माहिती, अशा प्रकारें विषयांची योजना करून पन्नासांवर चित्रेंहि घातलीं आहेत. कापडी पुठ्यांत बांधलेल्या पुस्तकाची किंमत १॥ रुपया, आणि साध्या कागदी पुठ्यांत बांधलेल्या पुस्तकाची किं. १ रु. आहे. परंतु '**इंदुप्रकाश**' आणि '**श्रीसयाजीविजय**' या पत्राच्या वर्गणीदारांस हें पुस्तक सन १९१५ सालची भेट ह्मणून देण्यांत येतें. इंदुप्रकाश रोजचें पत्र असून त्याची वार्षिक वर्गणी टपालसह ९ रु. आहे, आणि सयाजीविजय हें साप्ताहिक पत्र असून त्याची वार्षिक वर्गणी टपालसह रु. २॥ आहे. वाटेल तेव्हां नांव दाखल करून वर्गणीदार होतां येतें. नमुना अंक फुकट मिळेल.

ठाकुरद्वार, मुंबई, दामोदर सांवळाराम आणि मंडळी

---

सतत ९० वर्षांच्या पूर्ण अनुभवानें उत्तमोत्तम ठरलेला

दूषित रक्त शुद्ध करणारा




शरीराचा पंचप्राण ह्मणजे शुद्ध रक्त होय. तेंच एकदां बिघडलें कीं नाना तऱ्हेचे रोग देहांत आपला शिरकाव करूं लागतात. भयंकर अशा उपदंशजन्य विकारांमुळें व तदनुषंगिक होणाऱ्या पक्षघातासारख्या रोगामुळें अर्धांग वायु, अवयव लुले पडणें, स्मरणशक्ति कमी होणें, शरीरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, संधिवात व दूषित रक्तामुळें उद्भवणाऱ्या इतर सर्व रोगांवर हाच **सार्सापरिला** देणें फारच उत्तम होय. अनुभवाशिवाय गुणाची कल्पना येणार नाहीं. किंमत १ बाटलीस रु.१।. टपालखर्च -।- पांच आणे. चार बाटल्यांस टपालखर्चासह रु. ४॥— उत्तम गुणास चार बाटल्या लागतात. आमचा सार्सापरिल्याचा खप पाहून बऱ्याच लोकांनीं हुबेहुब नकल केली आहे. तरी घेतांना तो आमचाच आहे अशाबद्दल खात्री करून घेणें.

**मालक**— डा. गौतमराव केशव, आणि सन्स
ठाकुरद्वार पोस्टाजवळ मुंबई नंबर २

नो. न. २३

---

## वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.

नामर्दास मर्द बनविणारी

### राजवंशी नवरत्न याकुती,

किंमत रु० १० ट्रेड मार्क "सँडो"

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

### राजवंशी सांध्याचें तेल,

किंमत रुपये ९ ट्रेड मार्क "सँडो."

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे.

सरकारचे अॅनॅलायझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

### परमा सायरप.

कसल्याही प्रमेहावर तीन दिवसांत खात्रीनें गुण देणारें औषध. एक फारच अत्युत्तम आश्चर्यकारक इलाज किं० ३ औंसाच्या बाटलीस २॥ रुपया.

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट,

खबुतरखाना भुलेश्वर मुंबई.

नो० नं० २४

---

## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER

THE LEADING INDIAN LIFE ASSURANCE COMPANY

### FUNDS 4 CRORES.

INVESTITED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BOUNDS.

### Quinquennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Exisra Assunces. |
|---|---|---|
| | Rs | Rs. |
| 1888 | 8668 | 2,63,38,000 |
| 1893 | 17,657 | 4 68,36,090 |
| 1898 | 28,516 | 6 81,27,774 |
| 1903 | 40,390 | 8,47,06,108 |
| 1908 | 52,168 | 10,12,93,883 |
| 1913 | 62 097 | 12,36,79,510 |

| Year. | Annua Income. | Total Assets. |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| 1888 | 1148,642 | 36 38,694 |
| 189 | 21,16,549 | 80 05,818 |
| [illegible]3 | 31,36,421 | 1,40,32356 |
| 1908 | 1,07, 09 | 2,10,[illegible]5,947 |
| 190 | 535,55,639 | 3,22,79,991 |
| 1913 | 69,44 69 | 4,41,61,889 |

### RECORD BONUS

*The Bonus declared for the last triennium constitutes a record.*

IMMEDIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH and TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*Extract from report made upon the Company's position as at 31st December 1912, by Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Actuaries, London*

"At each of the last three Valuations the Reserves of the Company have been calculated on an increasingly stringent basis. On this occasion there has been a further addition to the reserves and the financial position of the Company has been further strengthened. The resouaces of the Company are now so ample that the security which they afford is undoubted and Policyholders and Shareholders alike may confidently forward to a continuation of prosperity in the future."

Do not delay in applying for Insurance—delays are dangerous. The Oriental is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy holders with a absolute security and possessing all the important factors essentia in a first class office it commands the full confidence of the public.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBERAL

Full particulars, prospectus and prosposal forms on application to:—

**M. deSOUZA,**
CHIEF AGENT,
*C. P. Berar & Khandesh, Nagpur*

N. N. 25

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

Regd NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४९ ] आकोला--सोमवार तारीख १५ माहे मार्च सन १९१५ ई० [ अंक १०

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक अकोला ९।९।०९ } J. G. Ridland. एजंट

नो. न २

### केशराचें फूल मुफ्त

पवित्र केशर ॥।= शुद्ध शिलाजीत ॥ असली कस्तूरी २४ ममीरातिनती २ खालिस हींग ८= तो० सुंदर कामदार शाल ३ व

३$\frac{१}{२}$+१$\frac{१}{२}$ गज ६ गे १०

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० १२

नो० नं० ८

### हिंदुस्थानावर आरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें आरिष्ट सदोदित लागले आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं रु. १८८.

बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे किं ८४

बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसात नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

ना० नं० ९

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व वाटदार भांडा आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठ मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.

नो. नं. ४

### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ९ तिच्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक वा० व० ८० खर्चासह तीन रुपये. यांत श्रीशंकराचार्य, शंकरानंद, व विद्यारण्य यांचे उपनिषदावरील भाष्य, आत्मपुराण व अनुभूतिप्रकाश हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास 'वैशेषिक दर्शन' बक्षीस-

सनातन वैदिक धर्माचें, तत्त्वज्ञानाचें व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें--

### आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ८० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथें यांचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधें प्रश्नांचीं समर्पक उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.

नो० नं० ३

### आठवें महाराष्ट्र साहित्यसंमेलन.

[ वेळ बदलली ]

हें संमेलन मंबईत फेब्रुवारी अखेर शिमग्याच्या सुट्टींत भरण्याचें ठरून त्याप्रमाणे जाहीर करण्यांतही आलें. परंतु बऱ्याच ठिकाणीं— विशेषतः नागपूर वऱ्हाडप्रांतीं— शिमग्याची फक्त एक दिवसच रजा असल्यामुळें, ही वेळा संमेलनास हजर राहू इच्छिणारांस सोईची पडणार नाहीं, ह्मणून तें मे महिन्यांत भरवावें, अशा पुष्कळशा सूचना खासगी आणि वर्तमानपत्रांतून आल्या. त्यांचा विचार करून परिषदेच्या कार्यकारी मंडळानें संमेलन मे महिन्यांचे सुट्टींत भरविण्याचें मुक्रर केलें आहे. नक्की दिवस संमेलनाची स्वागत कमेटी ठरवील आणि मागाहून प्रसिद्ध करील.

संमेलनांत निबंधांसाठीं नेमिलेले विषय लेखकवर्गास पत्रद्वारें आणि वर्तमानपत्रांतून कळविण्यांत आले आहेत. ज्या कोणास कळले नसतील त्यांनीं ते चिटणिसांस लिहून मागवावे.

ज्यांनीं संमेलनासाठीं निबंध लिहिण्याचें कबूल केलें आहे, आणि ज्यांना या नंतर लिहिण्याची इच्छा होईल, त्यांनीं ते मार्च अखेर खालील पत्त्यावर पाठविण्याची कृपा करावी.

८१ फणसवाडी, मुंबई, १९ फेब्रुवारी १९१९. } रामकृष्ण रघुनाथ मोरमकर, वा. गो. आपटे
चिटणीस, म. सा. परिषद

### मुद्दाम अनुभवाकरितां.

दिलखुषमलम— तमाम त्वचा रोगावर चालणारा— १ मनुष्या पुरते औषध किं० १॥ आणा. अस्सल कर्पुरार्क— किं० २ आणे केशनाशक अप्रातिम पूड किं. २ आणे कर्णबिंदू— कानाचा विकार १ दिवसांत गुण ३ दिवसांत फायदा होतो. किं० २ आणे मेंथालार्क किं० १ आणा.

### अनंगविलास

गोळी. अत्यंक धातुस्तंभक व पौष्टिक १ दिवसांत गुण दाखविते, किं० २ आणे "४ गोळ्या" दंतमंजन— ३ दिवसात गुण किं० २ आणे. विंचवावर प्रातिज्ञेचें औषध किं० ८ मनुष्या पुरत्या औषधाची ३ आणे. नेत्रांजन— डोळ्याचे विकारावर— सावारण, लाली, खुपरी, पाणिगळणें, आग यावर किं० २ आणे. दम्यावर— प्रातिज्ञेनें १ दिवसांत गुण देणारे व ७ दिवसांत पुर्ण फायदा देणारे औषध किं० ४ आणे. सित्ता पित्तामुळें आंगावर गांधी व खाज अतिशय येते त्यावर ३ दिवसांत गुण देणारे किं० २ आणे. उपदंशरिपु— प्रमेह, उपदंश यावर ३ दिवसांत फायदा व ७ दिवसांत पूर्ण गुण देणारं औषध किं० १ रूपया दिलबहार— सुपारी- १ चिमटी विड्यांत घेतांच, आजिर्ण, अमांशयांचा नाश होऊन झाडा साफ होतो, भूख खुलते किं० १ आणा, तंबाखु रंजनवटी— अत्यंत सुवासीक व कडक तंबाखुची गोळी २० किं० २ आणे. निदान ८ आण्याचा माल मागवावा. व टिकिटाचे रुपाने पोस्टेज सह रकम आगाऊ यावी. १ रुपयाचे आरडरीसही अट नाहीं. व्ही. पी. नें पाठवूं.

मुळे एन्ड सन्स नांदुरा.

नो० नं० ९

### नोटीस

नोटीस बेशमी महादू वा। गोविंदा हरमकार रा० उमर ता० बाळापूर

यांस

खालीं निशानी करणाराकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुह्मास १ शेत मौजे हिवरे ता० बाळापूर येथील नामें चौभागणीचें हें शेत यांत माझा हिस्सा चौथाईचा १२०० रुपयास विकला. व त्या बद्दल इसार ह्मणून १० दहा रुपये आपण मला दिले. बाकीचे रुपये देण्याचा करार १ महिन्याचा होता तो झाला अद्याप तुह्मी पैसे आणून दिले नाहींत व शेत खरेदी करून घेतले नाहीं. तरी तोंडीं सांगून थकल्यावर आतां नोटिशीनें कळवितों कीं मला रकमेची फार गरज आहे व त्यामुळें ही नोटीस पावल्यापासून १० दिवसाचे आंत आपण पैसे आणून खरेदी करून घ्यावे नाहीं पेक्षां मुदती नंतर हें शेत मी दुसऱ्यास विकूनटाकीन. व असें करणानें त्यांत मला जें नुकसान येईल तें योग्य कोर्ट मार्फत दावाकरून आपलेकडून तसें करण्यास जो खर्च येईल त्यासह भरून घेतलें जाईल, सबब आगाऊ नोटीस दिली आहे कळावें, ता० २७।२।१९१५

सहीची नि॥ आंगठा
मानाजी वा। उमाजी चिपडे रा० उमर ता० बाळापूर याचा खुद्द

नो० नं० ८६

### नोटीस

नोटीस बेशमी देवीदास वा। रामु सइतवाळ रा० जवळ खुर्द पो० शेगांव

यांसः····

खालीं सही करणार नोटीस देतें कीं मी तुमची मोहतराची बायको असून तुह्मी

मजला ६ वर्षांपासुन टाकून दिले तेव्हां पासून मी माझे आई बापाचे येथें रहात आहे माझे आई बापाच्या गरीबीमुळें त्यांना माझे खाण्याबद्दल दर साल ६० रु. प्रमाणें ६ वर्षांचे ३६० तीनसे साठ रु० सावकारी कर्ज झाले आहे. तें कर्जाचे रुपये नोटीस पावल्यापासून ८ दिवसांत देऊन मला घेऊन जावें. पंच व माझे वडील ज्यावेळें मुक्कामीं माझे बद्दल फारकती घेण्यास आले असतां तुह्मी ३ दिवस लपून बसला व पुढें तुमचा शोध लाग-ल्यावर तुह्माला विचारलें असतां तुह्मी फारकती देत नाहीं व साफ वागवीत नाहीं ह्मणाकांत शेवटीं ही नोटीस दिली आहे. मुदतींत तुह्मी कर्ज रु. ३६० न दिल्यास हीच फारकती समजून मी दुसरा नवरा करणार मग पुढें तुमचा माझ्यावर कोणतेच प्रका-रचा दावा चालणार नाहीं कळावें तारिख ७।३।१९ इ.

सही

काशी मर्द देवीदास सइतवाळ

रा. खाममांव निशानी आंगठा

नो० नं० ८७

## जाहीर नोटीस

सर्वत्र लाकांस जाहीर करण्यांत येते कीं जनी मर्द गुलाबसिंग जात रजपूत रा० कारखेड प्र० गिरोली ता० दारव्हा जिल्हा येवतमाळ ही माझी ठेवलेली बायको असून माझे स्थावर इस्टेटीपैकीं मौजे कार-खेड येथील सर्वे नंबर ४४ चे तिने मजजवळ मरेपर्यंत राहण्याचे कबुल केले वरुन तिचे नावे बक्षीस पत्र करुन दिलें व बक्षीसपत्र होतांच तिने मजपाशी हमेषा राहण्याचा करार मोडून व्यभीचार कर्मास प्रवृत्त झाली. अशी माझी खात्री झाल्यावरुन इचा व माझा बेबनाव झाला आहे. करितां या जाहीर नोटीसीनें कळ-वितोंकीं ह्या आमच्या बेबनावामुळें जनी ही माझे स्थावर जंगम इस्टेटीपैकीं कोणास कोणत्याही प्रकारें इस्टेट लिहून देऊन कर्ज काढील तर त्याजबद्दल मी किंवा माझी इस्टेट जबाबदार होणार नाहीं कळावें ता० ९।३।१९१९ इ.

दस्तुर माधव यशवंत अर्जनवीस राहणार दारव्हा.

सही

सदु वा। भमाजी रा० कारखेड

हल्लीं मुक्काम दारव्हा द० खु०

नो० न० ८८

## नोटीस

नोटीस बेशमी लक्ष्मीबाई मर्द तुकाराम सोनार व माधव बा। तुकाराम सोनार राह-णार देवठाणा ता० मंगरुळपीर जिल्हा आकोला पो० मानोरा

यांसी:-

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं आपली नोटीस ता० १ माहे फेब्रुवारी सन १९१९ ची जी तूं नोटीस दिली ती मीळाली परंतु ती नोटीस अजीबात खोटी आहे. आपण दस्तऐवज वेंडराचे येथन आणन मुसाभाई कची गांस कर्जरोखा लिहून दिला मला जमानतीबद्दल करारनामा लिहून दिला आपण उगेच भलते कांहीं लिहितां ते लिहिणें आपले चुकीचे आहे. डागीने लिहिलें मुळींच नाहीं. कांकण फक्त आहेत. आपण ज्या वेळेस दस्तऐवज जो लिहून दिला त्या वेळेस बरींच मंडळी होती. त्यानंतरचे आपण दस्तऐवज करुन दिली वऱ्हाड-समाचार पत्रांतून जी नोटीस दिली नो० नं० ४६ ची अजिबात खोटी आहे. कळावें ता० ११।२।१९ इ.

द० पुंजाजी ग.जी गावंडे ह.तोली

सही

विश्वनाथ राघोजी सोनार पाळोदी

ता० मंगरुळपीर

नो. नं. ८९

## नोटीस

नोटीस बेशमी रा. रा. जोधराज विसनसींग मारवाडी दुकान ऊंद्री ता० चिखली जि० बुलडाणा. यांसी:-

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आमचे जवळ सोन्या मोत्याचे डागीने नग ६ याचा तपसील.

१ कंठी १ सोन्याची वजन तोळे सहा मासे साडेच्यार
६ ८ ४॥

१ कंठी १ सोन्याची वजन तोळे साडेबारा
१२॥

बाजुबंद १ सोन्याचा सुता सुद्धां वजन तोळे १० १०॥ मासे

१ साकळ १ व झुंबरचा जोड १ या-सुद्धां वजन तोळे साडे आठ
८॥

१ नथ १ लहान मोती ४८ व मोठे मोती २ एकुण मोती ५०

१ नथ १ लहान मोत्यासह मोती एकंदर ९२

असे वरील डागीणें तारणगाहाण ठेवून २२८७ दोन हजार दोनशे सत्यासी रुपये च्यार आणे नगदी रोख नेऊन १९ दिवसानीं आणून देतो असा करार केला. तरी याला आजपर्यंत सात महिने झाले आह्मी पुष्कळवेळ सोडून नेण्यावि-षयीं ह्मटलें परंतु तुह्मी अद्याप सोडून ही नेले नाहीं व वरील रकम व्याजासमेत आणून दिली नाहीं. यावरुन असा तुमचे मनांतील हेतु दिसतो कीं वरील रकमेची फेड वर लिहिलेल्या डागीण्यांतच करण्या-चा हेतु आहे. सबब तुह्मी आजपर्यंत थापा दिल्या आहेत. तरी या नोटीसीनें कळाविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्या पासून ८ दिवसांचे आंत २२८७।. रुपये व याचे सात महिन्याचे व्याज दर महा दर शेकडा १॥= आणे प्रमाणें व्याज निघाले १४०८-॥ एकुण रुपये २४८७।-॥ असे आणून द्यावें व आपले डागीणें घेऊन जावे. असे आपण न केल्यास आह्मी व-रील डागीण्यांचा खामगावचे पंचमार्फत विक्री करुन जी रकम येईल ती तुमचे खात्यात जमाकरुन बाकी राहिलेल्या रकमेची व्यवस्था कोर्ट मार्फत करतां येईल. मग आह्मी आपले डागीण्याचे जबाबदार राहणार नाहीं करितां नोटीसीनें जाहीर केल आहे. तरी या नोटीसीचा खर्च व कोर्ट खर्च ही तुह्मास द्यावा लागेल कळावे.

ता० २१।११।१९ इ० द० केशव लक्ष्मनु नसवाले ऊंद्री.

सही

केशरबाई मर्द पुनमचंद मारवाडी

रा० ऊंद्री ता॥ बांगडी द० केशवराव

नो० न० ९०

## नोटीस

जनी मर्द गुलाबसिंग रजपुत रा. कारखेड प्र० गिरोली ता। दारव्हा जिला यवतमाळ ईस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यात येतें कीं तूं मज-जवळ मरे पर्यंत राहण्याचे कबुल केले वरुन तुजला माझे इस्टेटी पैकी सर्वेनंबर ४४ चे बक्षीसपत्र करुन दिले. परंतु या तीन चार महिन्यापासुन मजजवळचे राहणे सोडून देऊन इतरासी वाईट कर्म करते म्र असी माझी पूर्ण खात्री झालेवरुन मीवरील नंबरचे बक्षीसपत्र रद्द करण्या-चा दावा तुजवर केला आहे. तरी आतां तुझा व माझा कोणतेच प्रकारचा व माझे स्थावर जंगम इस्टेटीसी संबंध राहिली नाहीं जर तू माझे इस्टेटीसी कांहीं अफरातफर करसील व माझे नांवावर देव घेव अगर कोणते तऱ्हेचा व्यवहार करसील तर तो या नोटीसीचे आधारें खोटा आहे असें समजले जाऊन मी अगर माझी स्थावर व जंगम ईस्टट जबाबदार राहणार नाहीं. हें लक्षांत ठेवावे ता॥ ९।३।१९ ई: दस्तुर

माधव यशवंत अर्जनवीस रा. दारव्हा

सही

सदु वा॥ भगाजी राहणार

कारखेड हल्लीं दारव्हा द खुः

नो. नं. ९१

## नोटीस

नोटीस बेशमी लक्ष्या वल्लद इष्णाजी चौधरी रा० कुंभी ता० मंगरुळपीर.

यांसः—

नोटीस देणार उकर्डा वल्लद लक्ष्मण रा. लही ता० मंगरुळपीर याजकडून नोटीस देण्यात येते कीं माझी मुलगी नामे तारा ही तुमचे लग्राची बायको आहे. तिजलों तुह्मी वागविण्यास तयार नाहीं. तुह्मी तिजवर इं. पी. कलम ३२८ प्रमाणें काम चालवीले होतें. तो फौजदारी मु. नं. ३० सन १९१४ ही फिर्याद पोलीसानें काढून घेऊन तिला डिसचार्ज केलें. आतां पुन्हा तिजला तुमचे येथें नांदण्यास ठेवणें फार धोक्याचे आहे व तुह्मी ठेवण्यास कबुल केले तरी तुह्मी पुन्हां काय तिच्या-वर आळ घालाल यांनें भरंवसा राहीला नाहीं करिता तीचा अन्नवस्त्राबद्दल बंदोबस्त करावा तसें न केल्यास ही नोटीस पाव-ल्या पासून १९ दिवसांचे आंत फार कती द्यावी तसें न करल्यास पुढें रिती-प्रेमाणें व्यवस्था केली जाईल कळावे ता० ९-३-१९ इसवी

सही.

उकर्डा वल्लद लक्ष्मणजीच्या हातची रेघ.

नो० नं. ९२

## जाहिरनोटीस

नोटीस बेशमी तुळशी मर्द रामचंद्र कुणबी रा० हल्लीं दाती पो० लाखपुरी ता० मुर्तिजापूर येथें लक्ष्मण जयराम गावंडे यांचे घरीं

ईसः-

व सर्वत्र साहु सावकार लोक

यासः-

खालीं सही करणार नोटीस देता कीं तूं माझे चुलत भावाची बायको असून माझा चुलतभाऊ रामचंद्र हा मयत होण्यास सुमारें ८ वर्षें झालीं. वडिलोपार्जित हिस्सा एकत्र असून तुला संतती कांहीं नाहीं. त्यामुळे तुझ्या नवऱ्यामागें त्याचा वारस मी आहे. व तूं आतां शहाणी झाल्यानें तुझा आमच्या समाईक इस्टेटीची अफरातफर करुन गंधर्व करुन जाण्याचा बेत दिसतो. करितां कळवितों कीं तुझा अन्नवस्त्राचा हक्क आहे. याबर दुसऱ्या उलाढाली त्वां करुं नयेस. केल्यास त्या रद्द समजल्या जाऊन त्या बद्दल केलेले कागदपत्र खोटें समजले जातील. तुला कर्ज काढण्याचे बिलकुल कारण नाहीं. तसेंच सर्वत्र साहु सावकार यास ही कळविण्यात येते कीं सदरहू बाईला कोणी कर्ज देऊं नये अगर तिजजवळून कोणतीही माझी स्थावर जंगम इस्टेट लिहून घेऊं नये. घेतल्यास तें घेणें रद्द समजून त्या संबंधाची जबाबदारी इस्टेटी वर अगर मजवर राहणार नाहीं. व घेणारा फसेल करितां आगाऊं कळविले आहे. कळावें.

ता० ९।३।१९ इ०

सहीचा निशानी आंगठा

रायसिंग वा॥ महादाजी अवताते

कुणबी राहणार दुर्गवाडा

ता० मुर्तिजापूर याचा खुद

नो० नं० ९३

## नोटीस

नोटीस बेशमी रंगु मर्द भुजंगा मराठे रा. सुकळी गांजापूर ता. पुसद.

यांसः—

नोटीस देणार बापुजी वल्लद सटवाजी मराठी रा. सुकळी गाजापूर ता. पुसद जि० यवतमाळ कारणे नोटीस देण्यांत येते कीं, तूं माझी चुलत भावजई आहे. तुझा नवरा भुजंगा व मी एकत्र कुंटुबांत असुन इस्टेट खागें पिणे वगैरे सर्व एकत्र होते. तो मल्यानंतर तूं व मी एकत्र आहोत. इस्टेटीचा पूर्ण मालक मी आहे. तुझा फक्त अन्न वस्त्राचा हक्क आहे. असें असता लोकांच्या भुलथापी वरुन तूं दत्तक घेणार आहेस असे समजतें व त्वां एक दत्तक पत्रहि करुन ठेवलें आहे असें आमचे कानावर आलें आहे. आह्मी सर्व इस्टेटीचे मालक असतां तुझा दत्तक घेण्याचा व तोहि आमचे समती वाचून घेण्याचा मुळींच अधिकार नाहीं. व दत्तक घेतला तरी त्याचा इस्टेटीवर हक्क चालणार नाहीं आह्मास न विचारतां दत्तविधान न करितां घेतलेल्या दत्तकाचा आमच्या इस्टेटीवर मुळींच हक्क पोंचत नाहीं. तरी तुह्मी करुन ठेवलें असल्यास कोणतेही दत्तपत्र अगर दत्तक

हा बेकायदेशीर आहे. तरी या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं, तुझा अगर तुझ्या दत्तक घेणार असलेल्या दत्तकावा माझ्या ताब्यांत असलेल्या व माझ्या पूर्ण मालकीच्या इस्टेटीवर हक्क नसता कांही खरेदी, गहाण वगैरे अन्य तऱ्हेनें व्यवहार केल्यास अगर लोकांचे कर्ज काढल्यास त्याबद्दल माझी इस्टेट मुळींच जबाबदार नाहीं. तूं अन्न वस्त्राची फक्त मालकीण आहेस हें पूर्ण लक्षांत ठेवावें. या जाहीर नोटीशीनें तुला कळविलें आहे. व लोकांनाही कळविलें आहे. ता० ६।३।१९ इ.

दस्तुर शापराव हनुमंत बल्लाळ राहणार दारव्हा दस्तुर खुद्द

सही

बापुजी वा॥ सटवाजी I. पुंड

द० खु० हल्लीं मु० दारव्हा

नो. नं. ९४

## नोटीस

नोटीस बेशमी देवाजी वा॥ विठोबा व पंदरी वा॥ सदाशीव ब्राह्मण उभयता रा. तेल्हारा ता. आकोट जि. आकोला

यांस:—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आमची जमीन काटेल येथील सर्वे नंबर ४७।४ व ९७ हीं तीन शेतें १ वर्षाचे करारानें १९१४ चे पिकाकरिता मौंढेपट्ट्यानें रुपये ७२९ खास केलें होतें त्यातला माल कपाशीचा तुह्मी शेतें कर्ते वेळेस सांगितले कीं रुपये फिटेपावेतों तुमचे ताब्यांत ठेऊं. त्याप्रमाणें माल आमचे मार्कींचे घराब्यांत काटेले येथे ठेवला आहे व त्याचा भावही तुह्मी अजमास महीने २ झाले ३९ प्रमाणें ठरविला होता ह्मणून निकाला करितां आह्मी ५।६ वेळा गडी पाठविला कीं आमचे माप देऊन जावे व हिशब नक्की करावा रुपये उरल्यास घेऊन जावे न उरल्यास आमचे रुपये तुमचे जवळून द्यावें. परंतु प्रत्येक निरोपाबरोबर तुह्मी उत्तर पाठावेता कीं एक दोन दिवसांत येऊन निकाल करितो. परंतु अद्याप तुमचा पत्ता नाहीं. या वरून आह्मास संशय येते कीं यांत तुह्मास नकसान असावे व तुमचा इरादा आह्मास बुडविण्याचा असावा. करितां तह्मांस जाहिर नोटीस देणें भाग येतो कीं ही नोटीस पावल्यापासून ३ दिवसाचे आंत कपाशीचे माप द्यावें व रुपये वाचल्यास घेऊन जावे न उरल्यास तुमचे जवळून द्यावे व आमची पावती घेऊन जावी या प्रो वरील मुदतीस तुह्मी न वागल्यास पुढें पंच मार्फत कापूस मोजून घेऊ. आपण खुशीनें न दिल्यास कायदेशीर रितीनें फिर्याद करून या नोटीशीचे खर्च व पाठविलेल्या गड्याची रोजदारी सह व कोर्टखर्चासुद्ध घेतली जाईल मग तुमची कोणतेच प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं. कळावें ता० १२।३।१९ इ.

सही

शीवलक शाळिग्राम द० लक्ष्मी नारायण

दुकान वरवट बकाल

नो. नं. ९५

## *Notice*

SUMMONS FOR DISPOSAL OF SUIT.

( Order 5, Rules 1 And 5.)

IN THE COURT OF the judge small cause court DISTRICT. Cawnpore

Suit No. 3249 of 1914.

Firm Ganga Shai Gayaprshad Janaralgunj Cawnpore through Gayapershad owner of the Firm PLAINTIFF,

Firm Bhai Usman Shakoor Dookandar Gulla & Kirana in Akola District Akola Sooba Berar DEFENDANT dwelling at

Whereas The plaintiff has instituted a suit against you for Rs 233-2-3 you are hereby summoned to appear in this Court in person or by a pleader duly instructed and able to answer all material questions relating to the suit or who shall be accompanied by some person able to answer all such questions, on the 7th day of April 1915, at 11 o'clock in the fore noon, to answer the claim; and as the day fixed for your appearance is appointed for the final disposal of the suit, you must be prepared to produce on that day all the witnesses upon whose evidence and all the documents upon which you intend to reply in support of your defence.

Take notice that, in default of your appearance on the day before mentioned, the suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of the Court, this 5th day of March 1915.

B. Jagatnarain Sahib

Judge Small Cause

Court Cawnpore

नो. नं. ९६

## प्रांतिक सामाजिक परिषदेस अनावृत पत्रें.

रा० रा० प्रांतिक सामाजिक परिषदेच्या स्वागत कमिटीचे चेअरमन यांस:—

कृतानेक साष्टांग नमस्कार वि० वि० आपल्या वऱ्हाड प्रांतांत सामाजिक प्रश्नांचा विचार व चर्चा करण्यासाठीं लवकरच मुंबई, महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्र. नागपूर वगैरे दूर दूरच्या प्रांतांतले महाराष्ट्रीय विद्वान् बंधु एकत्र होण्याचा सुदैवाचा योग प्राप्त व्हावयाचा आहे. उमरावतीस भरलेल्या सामाजिक परिषदेनंतर गेल्या पंधरा वर्षांत असा योग आला नव्हता. तो यंदा अल्प प्रमाणावर का होईना, पण पुन्हा प्राप्त होत आहे हें पाहून मनाला होणारें समाधान व्यक्त केल्यावाचून राहवत नाहीं. अशा प्रसंगीं परिषदेच्या उद्दिष्ट कार्याच्या सिद्धीस्तव मनांत आलेले विचार सूचनांच्या रूपानें आपणा सर्वांच्या पुढें मांडणें हें मी माझें कर्तव्य समजत असल्यामुळें हे माझे विचार सर्वांस श्रुत व्हावे ह्मणून मी वऱ्हाड-समाचार पत्राचा आश्रय करीत आहे. या माझ्या सूचनांचा यंदाच्या परिषदेकडून गंभीरपणें विचार होईल तर मी स्वतःस कृत कार्य समजेन.

१ यंदाच्या प्रांतिक परिषदेच्या बैठकीत परिषदेनें गेल्या वर्षांत केलेल्या कामाचा आढावा व पुढच्या वर्षीं करण्यासाठीं योजिलेल्या कामाचा नकाशा समाजापुढें मांडण्यात यावा. केलेल्या कामाच्या आढाव्यावरून परिषदेची उपयुक्तता, व तिची कार्यक्षमता यांचें विषयीं बरोबर कल्पना समाजास करतां येईल हा आढावा तयार करतांना एक गोष्ट नेहमीं लक्षांत ठेवली पाहिजे ती ही कीं गीतत श्रीकृष्णानें जसें या सृष्टींत जें कांहीं कार्य घडत आहे तें माझ्याच प्रेरणेनें घडत आहे असें सगळें कार्यनियंतृत्व आपलेकडे घेतले आहे त्याप्रमाणें समाजांत जें कांहीं सुधारणेचें कार्य चाललें आहे तें या परिषदेच्याच प्रेरणेनें चाललें आहे असें मोघमपणानें पण वस्तुतः असत्य असें विधान न करतां परिषदेनें गेल्या सालीं खरोखर कोणत्या सुधारणांचा उपक्रम केला, तो कोणत्या प्रकारें केला, व त्यांत कितीसें यश आलें, व यश आलें नसल्यास तें कां आलें नाहीं या सर्व गोष्टींचा नीट खुलासा व्हावा. तसेंच परिषदेच्या कार्यकर्त्या मंडळीस समाजाकडून कोठें किती मदत मिळाली किंवा प्रतिबंध झाला, व त्याचीं कारणें काय असावींत याचें ही त्यांत थोडक्यांत विवेचन असावें. ह्मणजे सामाजिक सुधारणेच्या खऱ्या कार्याविषयीं परिषदेच्या चालकांच्या अंगच्या खऱ्या आस्थेचें व त्यांच्या कर्तृत्वशक्तीचें खरें मोजमाप त्यांच्या पदरांत टाकतां येऊन समाजाकडून होणारी मदत किंवा प्रतिकूलता यांचा ही नक्की अदमास करतां येईल. पुढील कार्याचा नकाशा तयार करून समाजापुढें मांडला ह्मणजे येत्या वर्षी आपणांस किती मजल मारावयाची आहे, ती मारण्याइतकी शक्ति आपले पायांत आहे कीं नाहीं, व आपण योजिलेला मार्ग इष्टस्थळीं नेऊन पोंचविणारा आहे कीं यापेक्षां सुगम आणि स्वल्पकालांत इष्टस्थळीं नेणारा दुसरा एखादा मार्ग शोधून काढला पाहिजे याचाही विचार करतां येईल. वरील आढाव्यांत आणि नकाशांत समाजसुधारणे सारख्या महत्त्वाच्या कार्यांत समाजाकडून परिषदेस अपेक्षित असलेल्या मदतीचें स्वरूप व तें साह्य मिळण्यासाठीं समाजाशीं सहानुभूतीनें व सहकारित्वानें वागविण्याची परिषदेची कितपत तयारी आहे याचें ही नक्की व निश्चित विवेचन करणें इष्ट आहे हें सांगावयास नकोच.

हा शेवटचा मुद्दा विशेष महत्त्वाचा आहे. पुष्कळवेळां व्याख्यात्यांच्या तोंडून असे उद्गार निघालेले आपण ऐकतों कीं सामाजिक सुधारणा झपाट्यानें न होण्याचें एक मुख्य कारण समाजाची सुधारणेविषयींची विन्मुखता किंवा उदासीनता हें आहे. बऱ्याच अंशीं हें कारण खरें आहे, आणि हें कारण नष्ट करतां आलें तर सुधारणारथ फार झपाट्यानें आपला मार्ग आक्रमिल यांत शंका नाहीं. पण समाजाकडून तरी ही विन्मुखता किंवा उदासीनता कां दाखविण्यांत येते हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. या प्रश्नाचें उत्तर समाजाचें अज्ञान असें सांगून सुधारकांना मोकळें होतां येणें शक्य नाहीं. समाजांत अज्ञान स्वैरपणानें संचार करीत आहे ही गोष्ट खरी आहे आणि ती अत्यंत शोचनीय ही आहे. पण सामाजिक सुधारणेविषयींची जी प्रतिकूलता किंवा उदासीनता समाजांत दिसत आहे तिचें कारण समाजांतलें अज्ञान हेंच आहे असें ह्मणून चालावयाचें नाहीं. त्या अपेशाचा योग्य वाटा सुधारकांना स्वतःकडे ही थोडासा घ्यावा लागेल. अज्ञ लोकांची गोष्ट सोडून द्या. पण चांगले सुशिक्षित आणि इतर बाबतींत देशकार्याविषयीं खरी खरी कळकळ बाळगणारे व थोडीबहुत झीज सोसण्यास ही तयार असीं माणसें समाजसुधारणे विषयीं विन्मख किंवा उदासीन दिसतात ते कां याला कांहीं विशेष कारण असलें पाहिजे. या कारणाचा शोध करणें ही एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. पण ही करण्यास सुधारकांनीं आत्मनिरीक्षण केलें पाहिजे. हें आत्मनिरीक्षण करण्याची संवय सुधारकांत दिसून येत नाहीं असें पूर्ण विचाराअंतीं माझें मत झालें आहे. आजपर्यंत समाजसुधारणेविषयीं तिच्या पुरस्कर्त्यांनीं केलेलीं भाषणें पहा. त्यांत आपला मार्ग हा अत्यंत शुद्ध व चोखाळलेला मार्ग आहे आणि जी कांहीं चूक घडत आहे ती आपल्या हातून नव्हे, असें बहुधा गृहीत धरलेलें आढळेल. कै. रानडे यांच्या सारख्या अत्यंत विचारी आणि शांत डोक्याच्या पुढाऱ्यांकडून सुद्धां हें आत्मनिरीक्षण व्हावें तसें कधीं झालें नाहीं. आमच्या सुधारकमंडळींत उत्साह नाहीं, खऱ्या कळकळीनें नेटाचे प्रयत्न होत नाहींत, वगैरे उद्गार त्यांनीं वेळोवेळीं काढले आहेत, पण आपली दिशाभूल होत आहे काय? आपल्या समाजाविषयींच्या समजुतींत कोठे चूक होत आहे कीं काय वगैरे गोष्टी त्यांच्या व्याख्यानांतून अभावात दृष्टोत्पत्तीस केवळ्या आढळतात. उदाहरणानें माझा हा मुद्दा ज्यास्त स्पष्ट करून दाखवितां येईल. समाजसुधारणेला मोठा व्यत्यय बाहेरच्या समाजापेक्षां सुधारकांच्या अंतर्गृहाकडून विशेषतः होत असतो असें आपण पुष्कळ वेळां पाहतों याचें कारण पुरुषांची दृष्टी शिक्षणाचे योगानें ज्यास्त व्यापक झालेली असते. तितकी त्यांच्या अशिक्षित पत्नींची झालेली नसते. यामुळें पुरुषांच्या प्रयत्नाला त्यांचेकडून मनःपूर्वक साह्य मिळत नाहीं इतकेंच नाहीं तर कित्येक वेळां अडथळाही येतो. एका अर्थी हें थोडेसें इष्ट ही असतें. कारण पुष्कळ वेळां पुरुषांची सुधारणा घडवून आणण्याची उत्कट इच्छा व ती पूर्ण करण्याची त्यांनीं धरलेली दिशाही वाण्यास जुंपलेल्या बैलाप्रमाणें पूर्णपणें एकांगी असते. त्यांची दृष्टि बहुतांशीं पाश्चात्य चालीचें केवळ अंध अनुकरण करण्याकडे असतें. आपल्या समाजाची प्रकृति व तिला अनुरूप उपाय करण्याची अवश्यकता या गोष्टींचा विचार ते करीत नाहींत. स्त्रियांना शिक्षण हवें येवढी एकच गोष्ट ध्यानांत घेऊन ते लागलीच पाश्चात्य स्त्रियांप्रमाणें इकडे ही स्त्रीशिक्षणाचा प्रसार करण्यास पाहतात. फार लांब कशाला! उमरावतीस स्त्रियाचें हायस्कूल स्थापन झालें आहे. त्यात आपल्या स्त्रियांना खरोखर उपयुक्त होईल असाच शिक्षण क्रम ठेवलेला आहे असें ह्मणण्याचें धैर्य सुधारकाग्रणी करतील काय? स्त्रियांना शिक्षण पाहिजे ही गोष्ट निर्विवाद आहे. पण तें कोणत्या प्रकारचें असलें तर आमच्या समाजाच्या सद्यःस्थितींत अधिक कार्यकारी होईल याचा विचार त्या संस्थेच्या चालकांनीं केला आहे

काय? या संस्थेचा शिक्षणक्रम ठरवितांनां आपल्याहून भिन्न मतांच्या स्त्रीपुरुषांचा विचार कधीं घेण्यांत आला होता काय? सुधारकाग्रणींच्या हातून अशा चुका हमेशा घडतात. ज्या समाजांत आपल्या सुधारणा मतांचा प्रसार करावयाचा त्या समाजाच्या पुढाऱ्यांना ते कस्पटाप्रमाणें समजतात, आपल्याहून भिन्न असलेलें मत कुच का माचें, तें सुधारणा कार्यास विघातक, अतएव त्याज्य अशीच त्यांची समजूत असते, आणि ही समजूतच अखेर त्यांच्या कार्याला विघातक होते. आमचे राज्यकर्ते लोकांना आपल्या विश्वासांत घेऊन राज्यशकट हाकीत नाहींत म्हणून सरकारला दूषण देणारे सुधारकाग्रणी स्वतः समाज सुधारणेच्या बाबतींत तसेंच हट्टाचें वर्तन करीत आहेत. पण ही गोष्ट त्यांच्या लक्षांत येत नाहीं, व आत्मनिरीक्षण केल्याशिवाय येणें शक्यही नाहीं. म्हणून मी म्हणतों कीं यंदाच्या परिषदेच्या चेअरमन साहेबांनी अगर अध्यक्षांनीं असें आत्मनिरीक्षण करून आपल्या प्रयत्नाला समाजाकडून कां प्रोत्साहन मिळत नाहीं त्याच्या कारणांचा अवश्य विचार करावा. मी स्वतः सुधारणेला पूर्णपणें अनुकूळ आहे. पुनर्विवाह प्रचार, बालविवाहनिषेध, जातिभेदाचें नियंत्रण, स्त्रीशिक्षणाचा प्रसार, वगैरे बाबतींत माझे विचार समाजाच्या पुष्कळ पुढे गेलेले आहेत. तथापि या सुधारणा समाजांत रूढ होत नाहींत या बद्दलच्या अपेशाचें खापर समाजाच्या डोक्यावर फोडण्यास मी तयार नाहीं. माझ्यासारख्या विचाराचे लोक आपल्या सुशिक्षित समाजांत थोडेथोडके नाहींत, आणि हीं अनावृतपत्रें लिहिण्यास मी उद्युक्त होत आहे याचें कारण तरी हेंच आहे कीं समाजसुधारणा हें एक पवित्र कार्य आहे अशी माझी मनोदेवता मला पूर्णपणें सांगत आहे. तिच्या प्रसाराचें क्षेत्र वाढत असावें अशी माझी मनापासून इच्छा आहे. त्यासाठीं यथाशक्ति साह्य करण्यास मी अत्यंत उत्सुक आहे; तेव्हां परिषदेच्या चालकांनीं हातीं घेतलेल्या कार्यास पूर्ण यश मिळविण्यासाठीं त्यांचें कोठें चुकत आहे तें वेड्यावाकड्या शद्बांनीं कां होईना पण त्यांच्या नजरेस आणून त्यांना आत्मनिरीक्षण करण्यास प्रवृत्त करावें. म्हणजे सुधारणेचें कार्य लवकर सिद्ध होईल. आतां माझी येवढीच विनंति आहे कीं परिषदेच्या चालकांनीं माझ्या म्हणण्याचें तात्पर्य नीट समजून घ्यावें व त्यावर नीट विचार करून यंदाच्या परिषदेपुढें मीं आरंभीं सांगितलें आहे त्याप्रमाणें गतवर्षीं केलेल्या कामाचा आढावा मांडून पुढें योजिलेल्या कार्याचा नकाशा तयार करतांना माझा आशय दृष्टीपुढें ठेवावा व लहान तोंडीं मोठा घास घेतल्याबद्दल मला क्षमा करावी.

आपला
समाज – सुधारणेच्छु.

---

वऱ्हाडसमाचार

मिति फाल्गुन वद्य ३० शके १८३६

## हिंदुस्थानचें नवें बजेट.

युरोपांतल्या महयुद्धाच्या सुरुवातीनंतर चें हें पहिलेंच बजेट गेल्या आठवड्यांत दिल्ली येथें हिंदुस्थानचे फडणीस सरविल्यम मेयर यांनीं कौंसिलास सादर केलें असल्यामुळें या बजेटाचें स्वरूप कळण्याविषयीं लोकांची जिज्ञासा व उत्कंठा अमर्याद असल्यास नवल नाहीं. चालू सालांत प्रत्येक बाबतींत सरकारचें उत्पन्न कमी झालें आहे. रेलवेचें उत्पन्न, जकात, व्याजाचें उत्पन्न, अफू, पोस्ट व तारायंत्रें इ. बहुतेक सगळ्या बाबी नुकसानींत आल्या आहेत. उलट खर्चाच्या बाबी तितक्याच किंबहुना अधिकच जोरानें वाढल्यामुळें यंदाच्या सालीं १२॥ लक्ष पौंडाची बचत राहील असा जो अदमास गतवर्षाच्या मार्चमध्यें केला होता तो सर्वस्वी चुकून उलट २७.२८ लक्ष पौंडांची तूटच आली. तथापि घाबरण्याचें कारण नाहीं. नव्या सालचें बजेट संबंध वर्षभर युद्ध चालू राहिल असा अंदाज धरून केलें आहे. तरी मुद्दां मुद्देशानें घाबरण्या सारखी स्थिती फडणीस साहेबांना दिसत नाहीं. अर्थात यंदाचे सालीं नवा एखादा कर बसवून दुष्काळांत तेरावा महिना आणण्याच्या खटपटींत शहाणपणानें पडले नाहींत हें पाहून सर्वांना संतोष वाटेल.

युद्धाच्या प्रारंभाच्या दिवसांत व्यापारी लोक जसे घाबरून गेले होते, तशी आतां स्थिति नाहीं हें सरकारी नोटांचे भाव व पोस्टल सेव्हिंग्ज ब्यांकांतून येणाऱ्या रकमा यांवरून कोणाला ही कळण्यासारखें आहे. गेल्या आगस्ट सप्तेंबर मध्यें सरकारी नोटांचा भाव ९१ पर्यंत खालीं गेला होता, तो आतां ९९ च्यावर गेला आहे. तसाच ब्यांकांतल्या ठेवी गेल्या आगष्ट व सप्तेंबर मध्यें जितक्या काढून घेण्यांत आल्या त्यांच्या मानानें आता या काढून घेण्यांत येत नाहींत. लष्करी खर्च युद्धामुळें भलतीकडे वाढविणें अपरिहार्यच होतें. कारण म्हटलेंच आहे कीं 'आत्मानं सततं रक्षेत्.... धनैरपि.' तथापि नव्या बजेटांत लष्करी खर्चांत ही थोडीशी काटकसर करण्याचा सरकारचा विचार आहे. ज्यांची आजच जरूरी नाहीं असा लष्करी खर्च तूर्त तहकूब ठेवण्यांत येणार आहे. रेलवेच्या खर्चांत ही काटकसर व्हावयाची आहे. इरिगेशन ही उत्पन्नाची बाब असल्यामुळें व तिचा शेतकऱ्यांना फार उपयोग असल्यामुळें त्या बाबीवर खर्चाची पुरी रकम खर्च करण्यांत येणार आहे. अशा हिकमतीनें सध्याच्या विकट प्रसंगीं नवे कर न बसविता मोठ्या युक्तीनें पार पडण्याच्या विचारांत फडणीस साहेब आहेत.,

## युद्धासाठीं हिंदुस्थानचा खर्च.

चालू युद्धामुळें हिंदुस्थानला किती रकमेचा चट्टा बसला हें जाणण्याची उत्कंठा या वेळीं प्रत्येकाला असणें स्वाभाविक आहे हें जाणून फडणीस साहेबांनीं बजेटांत ती रकम वेगळी दाखविली आहे. गेल्यासालांत आगष्ट पासून युद्ध सुरू झाल्यामुळें ही रकम सुमारें २० लक्ष पौंड झाली. नव्या सालीं ही रकम ९० लक्ष पौंड सुमारें होईल असा अंदाज धरला आहे. देशी संस्थानिकानीं दिलेल्या देणग्या धरल्या तर हिंदुस्थानानें या युद्धाप्रित्यर्थ ७ लक्ष ६८ हजार पौंड येवढी रकम दिली. हिंदुस्थानच्या सांपत्तिक स्थितीच्यामानानें ही रकम कांहीं सामान्य नाहीं. गेल्या मार्चच्या हिंदुस्थानचें एकंदर कर्ज सुमारें ३॥ अब्ज पौंड होतें. पण यांतला बराचसा भाग रेलवे व इरिगेशनसारख्या अर्थोत्पादक कार्यांत गुंतलेला असल्यामुळें हिंदुस्थानला या कर्जावर जें व्याज द्यावें लागतें ते नुकसानाच्या सदराखालीं घालतां येणार नाहीं. गेल्यासालच्या अंदाजपत्रकांत जरी युद्धामुळें उलथापालथ झाली, तरी एकंदरीनें पाहतां गेल्या सालचा खर्च कोणत्याही बाबतींत गैरशिस्त झाला असें म्हणतां येणार नाहीं. नव्या बजेटासंबंधानें ही असेच समाधानाचें उद्गार काढण्याचा प्रसंग पुढचे सालीं येवो अशी आम्ही प्रभू जवळ प्रार्थना करतों.

## हिंदी कारखान्यास सरकारची मदत.

ज्याप्रमाणें सरकाराकडून शेतकऱ्यांना स्वल्प व्याजानें तगाई देण्यांत येते त्या प्रमाणें हिंदी कारखानेवाल्यांना सरकारनें स्वल्प व्याजानें कर्जाऊ रकमा देऊन हिंदुस्थानच्या उद्योगधंद्यांना मदत करावी अशा अर्थाचा ठराव दिल्लीच्या कायदे कौंसिलापुढें ना० राजा खुशपालसिंग यांनीं आणिला होता. त्यावेळीं मध्यप्रांतातर्फेचे मेंबर ना० सरगंगाधरराव चिटणवीस आणि मि० एम० बी० दादाभाई यांचीं सयुक्तिक व जोरदार भाषणें झालीं. मि० दादाभाई यांनीं अंबाला येथील कांचेचा कारखाना, व दुसरे होतकरू कारखाने केवळ भांडवलाच्या अभावीं कसे बुडाले याविषयींचीं सरकारी रिपोर्टांतलीं प्रमाणें पुढें करून भांडवलाची मागणी या देशांत कशी सार्वत्रिक व रास्त आहे तें उत्तम प्रकारें दाखविलें. तगाई ज्याप्रमाणें शेताच्या तारणावर देण्यांत येते त्याप्रमाणें कारखान्याची इमारत व यंत्र सामुग्री याच्या तारणावर व कारखानदाराच्या स्वतःच्या पतीवर देण्यास कांहीं हरकत नसावी हा मुद्दा त्यानीं सरकारपुढें इतक्या विशद रीतीनें मांडला कीं या ठरावावर सरकारी अधिकाऱ्यांना सयुक्तिक रीतीनें विरोधी भाषण करणें अशक्य झालें. या ठरावाचा परिणाम सरकारी अधिकाऱ्यांच्या मनावर अनुकूळ रीतीनें होऊन ठरावांतला उद्देश कृतीच्या रूपानें लवकरच दृगोचर होईल अशी उमेद बाळगण्यास आतां पुष्कळ जागा आहे हें पाहून प्रत्येकास समाधान वाटेल

## अप्रयोजक विधान.

वरील ठरावास उत्तर देतांना उद्योग धंद्याच्या खात्याचे श्रेष्ठ अधिकारी ना. मि. क्लार्क यानीं जें एक अप्रयोजकपणाचें विधान केलें त्याचा तीव्र निषेध चोहोंकडून करण्यांत येत आहे तो अगदीं रास्त आहे. ते म्हणाले कीं विलायतेहून जे जिनस आयते तयार करून मिळण्यासारखे आहेत त्याची पैदास हिंदुस्थानात करण्याची येवढी यातायात कशाला हवी? ना. मि. क्लार्क यांच्या सारख्याचे हें विधान बळेंच वेड पांघरलेल्या माणसाच्या बरळण्या सारखें आहे. हिंदुस्थानानें स्वतःच्या गरजाकरितां दुसऱ्याच्या तोंडाकडे नेहमींच पाहत राहावें अशी ना. मि क्लार्क यांची इच्छा दिसते. इतके दिवस अज्ञानामुळें आमच्या लोकांनाही असाच भ्रम झालेला होता. पण आतां आमच्या लोकाचे डोळे उघडले आहे. त्यावर पुनः झापड घालण्याचा यत्न करण्यासारखें वेडगळपणाचें हें विधान करण्याच्या पूर्वीं खुद्द विलायतेंतले त्याचे देशबंधु सरकारपाशीं काय मागणी करित आहेत व विलायती कारखानदाराना पैशाची धाडसाची व दीर्घोद्योगाची वाणनसताही ते स्वतःच्या उद्योगधंद्याला उत्तेजन देण्यासाठीं सरकारपाशीं कां मागणी करीत आहेत? व सरकार ही त्याना मदत करण्यास कां उद्युक्त होत आहे या गोष्टीचा विचार ना० साहेबांनीं करावयास पाहिजे होता. हिंदुस्थानच्या लोकाची आज जी दारिद्रावस्था दिसत आहे तिच्या मुळाशीं देशी उद्योग धंद्यांची पिछेहाट करून विलायती मालाला उत्तेजन देणारी सरकारची राजनीति आहे असें आजपर्यंतचा इतिहास सांगत आहे. ही राजनीति बदलण्याचा काळ हिंदुस्थानानें ब्रिटिश साम्राज्यासाठीं आत्महिताचा येवढा यज्ञ केल्यानंतरही आला नाहीं असें ना० मि. क्लार्क यांस खरोखर वाटत असेल तर हिंदुस्थानच्या हिताला इतके विन्मुख अधिकारी लाभल्याबद्दल हिंदुस्थानानें स्वतःच्या दुर्दैवाला बोल लावीत बसलें पाहिजे. पण जेथें खुद्द बादशहा व लॉर्ड हार्डिंज साहेबासारखे मुत्सद्दी हिंदुस्थानविषयींच्या सहानुभूतीनें प्रेरित आहेत. तेथें ना. मि. क्लार्क सारखे सहानुभूतिशून्य अधिकारी शोभत नाहींत असें स्पष्टपणें बोलून दाखविण्यास कोणाची भीती नाहीं. ना. मि. क्लार्क याच्या बाष्कळ विधानास सडेतोड उत्तर देण्यास ना. गोखले यांच्या सारखे स्पष्टवक्ते सभासद आज कौंसिलांत नाहींत ही दुःखाची गोष्ट म्हटली पाहिजे.

## प्रस्तुतचें युद्ध आणि कापसाचा व्यापार

आमच्या वऱ्हाड प्रांताचें सगळ जीवन कापूस हें असल्यामुळें प्रस्तुत युद्धाचा कापसाच्या व्यापारावर काय परिणाम झाला आहे हें पाहणें आमचें कर्तव्य आहे. या लेखांत या विषयाचा जो विचार आम्ही करणार आहों ता नुसत्या आमच्या प्रांतापुरता किंवा हिंदुस्थानापुरता नाहीं, तर जगांतल्या कापूस पिकविणाऱ्या सर्व्या देशांसंबंधानें आहे. कापसाच्या व्यापाराचे संबंध इतके दूरवरचे असतात कीं अशा

विषयासंबंधानं व्यापक दृष्टीनें विचार केल्या-शिवाय मनुष्याचें चालावयाचें नाहीं. संकुचित दृष्टीनें केलेल्या विचाराच्या पायावर केलेली अनुमानें चुकून कापसाचा व्यापार करणारा साफ बुडण्याची भिती असते. ह्मणून कापसाच्या व्यापारासंबंधानें नेहमीं फार व्यापक दृष्टी ठेवावी लागते. विलायतेंतल्या लंडन बोर्ड ऑफ ट्रेड नांवाच्या संस्थेकडून गेल्या जानेवारी महिन्याबद्दलचे प्रसिद्ध झालेले आंकडे पाहतां असें दिसतें कीं लढाई सुरू झाल्यापासून तों जानेवारी अखेर पर्यंत कापसाची विलायतची आयात व कापडाची निर्यात या दोन्हींना मोठा धक्का बसला. पण आतां मात्र हा व्यापार सावरण्याची चिन्हें दिसत आहेत. समरभूमीवर गोळा झालेल्या लक्षावधि सैनिकांचे पोषाख लढाईच्या धिंगामस्तीमुळें जीर्ण झाले आहेत व लवकरच त्यांना नवे पोषाख दिल्यावाचून चालावयाचें नाहीं. हिंवाळा हा आतां संपल्यामुळें कापसाच्या कपड्याला आतां येवढी मागणी येईल कीं ती पुरतां पुरवतां कारखानदारांच्या नाकीं दम येतील. दक्षिण आफ्रिकेंतल्या सैन्याला पातळ हलक्या पोषाख देण्यास सुरुवात झाल्यापासून कानडामर्धल कापडाचे कारखानदाराचें उत्कृ पाढें होत आहे. दक्षिण आफ्रिकेंत वनस्पतींच्या संरक्षण कंतानाचें मांडव घालण्याचा प्रघात अलीकडे शास्त्रज्ञांनी घातल्यापासून कापडाच्या मागणींत आणखी भर पडली आहे. दक्षिण अमेरिकेंत तंबाखुचें उत्पन्न यंदा इतकें आलें आहे कीं तंबाखु भरून ठेवण्यासाठीं पिशव्या तयार करण्यास कापड मिळेनासें झालें आहे! अमेरिकेंतल्या विद्युत् यंत्रामध्यें ही कापसाचा फार उपयोग होतो. ह्याचा फायदा आजपर्यंत जर्मनी व आस्ट्रिया यानीं घेतला, पण यंदा तो इतरांना मिळेल. प्रस्तुतच्या युद्धामुळें जर्मनी व आस्ट्रिया या दोन देशात सुमारें ४०० गिरण्यांचें काम बंद पडलें आहे, व त्यांतल्या अर्ध्यांचें दिवाळें वाजलें आहे. अमेरिकेंतलें कापसाचें पीक यंदा दरसालसारखें आलेलें नाहीं. या व वर सांगितलेल्या इतर गोष्टींमुळें हिंदुस्थानच्या कापसाला यंदा चांगलीच मागणी येण्याचा संभव आहे. वीस वर्षांपूर्वी असाच योग आला होता. त्याची पुनरावृत्ति यंदा होण्याची सुचिन्हें दिसत आहेत, ह्मणून अद्याप कापसाला भाव नाहीं ह्मणून हताश होऊन बसलेल्या आमच्या लोकांनीं हातपाय गाळूं नयेत, अशी आमची त्यांना सूचना आहे.

## शिक्षणाच्या खर्चाची वाटणी.

गेल्या पांच चार वर्षांत सरकारानें उदार हस्तानें शिक्षणासाठीं दिलेल्या मोठ्या रकमांचा विनियोग प्रत्यक्ष शिक्षण प्रसाराकडे न होतां अप्रत्यक्ष रीतीनें ह्मणजे इन्स्पेक्टर वगैरेंचे पगार वाढविण्याकडेच ज्यास्त होतो, त्यामुळें सरकारच्या औदार्याचा फायदा गरीब प्रजेला न मिळतां त्याचा बराच मोठा भाग अधिकाऱ्यांना पुष्ट करण्यांत जातो अशी तक्रार आज बरेच दिवस कित्येकांकडून करण्यांत येत आहे. नुकत्या प्रसिद्ध झालेल्या मद्रासच्या शिक्षणखात्याच्या रिपोर्टावरून या तक्रारींत खरोखर कांहीं तथ्य आहे असें दिसतें. प्रांतिक उत्पन्नांतून या अप्रत्यक्ष खर्चाकडे दिल्या गेलेल्या रकमांचें प्रमाण १९०९।१० सालीं ३९॥ सुमारें होतें, तें गेल्यासालीं ह्मणजे अवघ्या चार वर्षांत ४५ च्याजवळ जवळ गेलें आहे तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या पगारांत भर टाकल्यानें शिक्षण प्रसाराला खरोखर मदत होते कीं काय हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. येवढी रकम शिक्षण प्रसारासाठीं नव्या शाळा काढण्यांत खर्च झाली असती तर साक्षर मुलांची संख्या खात्रीनें वाढली असती. पण प्रत्यक्ष अनुभव जो येत आहे तो अत्यंत निराशाजनक आहे. बंगाल प्रांतांत प्राथमिक शाळांची संख्या उलट कमी झाली आहे अशी ओरड आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांचें या गोष्टीकडे कधीं लक्ष जाईल तें जावो.

## वऱ्हाडवृत्त

**हवामान—** या सप्तकांतही आगंतुक पर्जन्यानें चैत्रांतल्या गर्भावळीच्या मेघांचे कांहीं प्रयोजन ठेविलें नाहीं. उष्ण कालाचा प्रादुर्भाव होत असून ऋतूचा पालट चांगला व्यक्त होत आहे. रोगराई नसून आरोग्य असमाधानकारक नाहीं. उमरावतीच्या प्लेगाची दुर्वार्ता लवकरच शमेल असा रंग दिसतो.

रा० रा० लक्ष्मी नारायण फर्स्ट आडि० डिस्ट्रिक्ट जज्य आकोला यांची बदली रायपुरास झाली असून त्यांच्या जागीं रा. रा. माणिकशा रतनजी दस्तूर यांस नेमण्यात आलें आहे.

रा० रा० कृष्णराव पुरुषोत्तम भट ए. असि. कमिशनर यास दमोहून रायपूर येथें बदलण्यांत आलें.

रा० रा० रघुनाथ माधव भगाडे आफिशिएटिंग सब जज्य उमरावती यांस नागपुरास बदलण्यांत आलें.

**सत्कीर्तन—** हरिभक्तिपरायण वेदमूर्ती रा० रा० ब्रह्मनाळकर बुवा यांचीं कीर्तनें हल्लीं आकोल्यास होत असतात. प्रस्तुतच्या सुधारणा प्रचलित करण्यास यांचीं कीर्तनें हा एक सुलभ मार्ग होय. ब्रह्मनिरूपणाची मेख्ट्रेन पुष्कळांस सांपडतच नाहीं. पाठान्तर दांडगें आहे आणि हे तरुण विद्वान आपल्या ओजस्वी व्याख्यानांत प्रेमळपणा व गोड माधुर्य आणण्याकडे हृदयाचा अधीक ओढा लावतील तर यांचा लाभ बहुगुणित होईल आणि ते आपली परंपरा व सांप्रदाय यास अधीक उज्वल स्वरूप आणितील असा आह्मास भरंवसा आहे.

उमरावतीचे जन्मांध विद्वान साधु पुरुष रा० रा० गुलाबराय महाराज हे सध्या आकोल्यास आले आहेत. शिष्यमंडळी त्यांच्या दर्शनाचा लाभ घेण्यांत निमग्न आहेत.

प्रांतिक सामाजिक परिषदेची ४ थी बैठक यंदा उमरावती येथें गुडफायडेच्या आठवड्यांत व्हावयाची ठरली होती. परंतु हल्लीं उमरावतीस प्लेग सुरू झाल्याकारणानें ही बैठक तूर्त मोठ्या कष्टानें स्वागत कमेटीस तहकूब ठेवणें भाग पडत आहे. ही बैठक पुनः केव्हां होऊं शकेल हें जून अगर जुलै महिन्यांत ठरविण्यांत येईल असें परिषदेच्या स्वागत कमेटीचे चिटणीस रा० रा० आर. आर. जयवंत, उमरावती हे कळवितात.

सालाबादप्रमाणें येत्या चैत्र शु॥ १ च्या दिवशीं ह्मणजे ता० १६।३।१५ रोजीं पैसाफंड अथवा औद्योगिक निधी गोळा करण्याचें काम करावयाचें आहे. हें काम स्वयंसेवक होऊन करण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनीं आपलीं नावें येथील जोगळेकर कंपनींत नोंदवावीं. असें येथील उत्साही देशभक्त रा. गो. कृ. नितळे कळवितात.

या औद्योगिक निधीची उपयुक्तता व त्याचें महत्व आतां लोकांस निराळें प्रतिपादन करून सांगण्याची जरूर राहिली नाहीं. आतां तें सर्वांच्या अंगवळणीं पड ल्यासारखें झालेलें आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तरी येत्या वर्षप्रतिपदेच्या दिवशीं स्वयंसेवक हा निधी मागण्यास येतील त्यावेळीं योग्य ती मदत करतील अशी आशा आहे.

जिल्हा खानदेशांतील चोपडे येथील जोतिषी रा० शंकर भैरव जोशी आज दोन तीन आठवडे येथें आनंदराव लोटे यांच्या घरीं येऊन राहिले आहेत. श्रीमंत होळकर सरकारांनीं बराच मोठा खर्च सोसून प्राचीन शास्त्रांस नामशेष न होऊं देण्यासाठींच जी शाळा स्थापून चालू ठेवली आहे तींत रा० शंकरबुवांनीं अध्ययन करून गृह व फलित जोतिषाचें ज्ञान संपादन केलें आहे. गरजूंनीं त्यांच्या विद्येचा प्रत्यय घेऊन पहावा.

"जैन धर्मांत अष्टान्हिक पर्व" नांवाचें महापर्व असतें या महापर्वानिमित्त आषाढ कार्तिक व फाल्गुन या तीन महिन्यांत शुक्ल अष्टमीपासून पौर्णिमेपर्यंत श्री नंदीश्वर जिन प्रतिमेची पूजा प्रभावना वगैरे करण्यांत येऊन वद्य प्रतिपदेस या उत्सवाची समाप्ति करितात. हा पूजा महोत्सव श्री जिन मंदिरांतच होतो परंतु चालू सालीं हा समारंभ येथील प्रसिद्ध जैन धर्माभिमानी आमचे मित्र रा. चवरे वकील यांनीं स्थापिलेल्या जैन बोर्डिंगचे सुपरिंटेंडेंट रा. डी.डी. गुलालकर यांनीं बोर्डिंगमध्यें असलेल्या जिनमंदिरांतच घडवून आणिला. या उत्सवासाठीं रा. सुबराव देसाई यांनीं मुद्दाम साग्र संगीत श्री नंदीश्वर पूजा रचिली होती. पूजा संगीत असल्यामुळें व इतर संगीत साधनांच्या सहाय्यानें विद्यार्थ्यांकडून गाइली गेल्यामुळें समारंभास विशेष बहार आली होती व श्रोतृ समाज ही बराच येत असे. वद्य प्रतिपदेला ह्मणजे समाप्तीचे दिवशीं रोजच्या पेक्षांही जास्त थाट करण्यांत आला होता. समाप्तीनंतर विद्यार्थ्यांचे व इतर मण्डळींचें गायन होऊन रा. गुलालकर यांनीं शिमग्याच्या बिभत्स प्रकारांपेक्षां वरच्या सारखे समारंभ केल्यानें विद्यार्थ्यांना धार्मिक वळण कसें लागतें वगैरेबद्दल मोठें बोधप्रद सुश्राव्य आणि जोरदार भाषण केलें. आणखी कांहीं इतर सद्गृहस्थांचीं समयोचित भाषणें होऊन व आभार प्रदर्शन करण्यांत येऊन उत्सव समाप्त झाला ह्मणून एक हजर असलेले वातमीदार कळवितात.

## नोटीस

नोटीस रा. रा. राजाराम देविदास नाईक राहणार मुंगळे तालुका वाशीम जिल्हा आकोला यांस खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं आमचे अशील तुमचे बंधू रा. रा. सखाराम देविदास नाईक राहणार मुंगळे यांचे व तुमचे मध्यें आपसांत ठराव होऊन तुह्मी तारिख २९।१२।१४ रोजीं पंचासमक्ष सोडचिठी लिहून दिली व त्यांत सदरहू सोडचिठ्ठीला पूर्ण ष्टांप देऊन नोंदून देण्याचें कबूल केलें परंतु ह्या गोष्टीस अजमासें २ महिनें होऊन गेले तरी आपणास अनेक वेळ ह्मटलें असतां आपण ष्टांप आणून सदरहू सोडचिठ्ठी नोंदून दिली नाहीं करितां ह्या नोटीशीनें आपणास कळविण्यांत येतें कीं. सदर्हू नोटीस पावल्या तारखेपासून आठ दिवसाचे आंत आपण कबूल केले प्रमाणे ष्टांप आणून सोडचिठ्ठी लिहून नोंदून द्यावी तसें न केल्यास आपणावर रितीप्रमाणें कोर्टांत दावा करणे भाग पडेल व दाव्याचा खर्च आपणावर पडेल करितां ह्या नोटीसीनें कळविलें आहे कळावे तारीख १०।३।१५ ई०

सही

गणेश गोपाळ हतवळणे वकील.

नो. नं. ९७

## नोटीस

सर्वत्र साहू सावकार व संभावित लोक यांना

या नोटीसीनें कळविण्यांत येते कीं माझे पुतण्याची बायको नामे कवतीक मर्द परशराम हा तीचा नवरा परशराम यांस मरण्यास १॥ वर्ष झाले तेंव्हांपासून आमचे इस्टेटीचा आमचे चोरून अफरातफर करीत आहे परशरामचा बाप नागोजी हा आज पांच महीन्यापूर्वी मयत झाला आहे त्यानें मरणाचे अगोदर सावध स्थितींत असतां गुंडी व धामणी येथील पंचासमक्ष त्यानें आपली स्थावर जंगम इस्टेट मजला दिली. हें सर्व जगजाहीर आहे; आणि याशिवाय मयत नागोजी हा माझा सख्खा भाऊ असल्यानें त्याचे इस्टेटीवर माझे शिवाय दुसरे कोणाचाच हक्क नाहीं. माझी पुतणसून नामे कवतीक इची वर्तणूक चांगली नसल्यानें व तीचे पोटीं संतान नसल्यानें तिनें दुसरा घरठाव न केल्यास फक्त तिचा अन्नवस्त्राचा अधिकार आहे असें असून तिनें जर वरांतील कोणती वस्तु माझे संमती शिवाय सावकारास विकण्यास, गहाण ठेवण्यास आणल्यास मुळींच घेऊ नये कारण तिला स्वतःस इस्टेटीचा अफरातफर करण्याची मुळींच हक्क राहीला नाहीं कळावे ता० ९।३।१५ इ० द० रंगराव.

सही

गणुजी वा॥ भगाजी नवघरे तेली रा० गुंडी याची नि० रेघ.—

नो० नं० ९८

# युरोपांतील महायुद्ध.

—:*:*:*:—

## उपयुक्त व विविध माहितीचा संग्रह.

( रंगीत नकाशे व विविध चित्रें यांसह. )


सांप्रत युरोपांत जें महायुद्ध चाललें आहे, त्यासंबंधांत लागणारी सर्व प्रकारची माहिती थोडक्यांत वाचकांस समजावी, अशा उद्देशानें हें पुस्तक तयार केलेलें आहे वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या लढाईच्या बातम्या या पुस्तकांत घेतलेल्या नसून, हल्लींच्या महायुद्धाचें ज्ञान सुलभ रीतीनें होईल अशा प्रकारची संगतवार हकीकत घेऊन, शेवटीं वेगवेगळ्या रणभूमीचे २ नकाशे; आणि सर्व जगाचा व युरोपांतील सर्व रणसंग्राम-भूमीचा एकत्र असे दोन रंगीत नकाशे, आणि लढाईत सामील झालेल्या राष्ट्रांचें बलाबल दाखविणारा नकाशा, याप्रमाणें पांच नकाशे या पुस्तकास जोडले आहेत. ह्या नकाशात लढाईची मुख्य ठिकाणें, आरमाराच्या जागा, किल्ले मुख्य शहरें, नद्या, रेल्वे इत्यादि माहिती स्पष्ट करून दाखविली असून, शिवाय स्पष्टीकरणार्थ ३ कोश जोडले आहेत. या कोशाच्या आधारानें लढाईतील शहराची, बंदरांची, गावाची, त्याचप्रमाणें लढाईत भाग घेणारे थोर पुरुष आणि शस्त्रास्त्रासंबंधानें वापरण्यांत येत असलेले पारिभाषिक शब्द इत्यादि माहिती थोडक्यात समजेल अशी योजना केली आहे. पुस्तकांतील विषयांचीं ४९ प्रकरणें केलीं असून त्यांत युरोपांतील राष्ट्रांची परिस्थिति, लढाईचीं कारणें, जर्मनी इंग्लंड, रशिया, फ्रान्स, आस्ट्रेलिया, सर्विया, टर्की, बेल्जम इत्यादि राष्ट्राचा परस्परांत झालेला पत्रव्यवहार नाकेबंदीचीं ठाणीं, व्यापाराचा प्रसार, वेगवेगळ्या राष्ट्रांच्या परिस्थितीची माहिती, लढाईशीं संबंध असलेल्या थोर पुरुषांची माहिती, आतापर्यंत लढाईत घडलेल्या गोष्टींची त्रोटक माहिती, अशा प्रकारें विषयांची योजना करून पन्नासांवर चित्रेंहि घातलीं आहेत. कापडी पुठ्यांत बांधलेल्या पुस्तकाची किंमत १॥ रुपया, आणि साध्या कागदी पुठ्यांत बांधलेल्या पुस्तकाची किं. १ रु. आहे. परंतु '**इंदुप्रकाश**' आणि '**श्रीसयाजीविजय**' या पत्राच्या **वर्गणीदारांस** हें पुस्तक सन १९१९ सालची भेट म्हणून देण्यांत येतें. इंदुप्रकाश रोजचें पत्र असून त्याची वार्षिक वर्गणी टपालसह ९ रु. आहे, आणि सयाजीविजय हें साप्ताहिक पत्र असून त्याची वार्षिक वर्गणी टपालसह रु. २॥ आहे. वाटेल तेव्हां नांव दाखल करून वर्गणीदार होतां येतें. नमुना अंक फुकट मिळेल.

ठाकुरद्वार, मुंबई, दामोदर सांवळाराम आणि मंडळी

---

सतत ६० वर्षाच्या पूर्ण अनुभवानें उत्तमोत्तम ठरलेला

दूषित रक्त शुद्ध करणारा



शरीराचा पंचप्राण म्हणजे शुद्ध रक्त होय. तेंच एकदां बिघडलें कीं नाना तऱ्हेचे रोग देहांत आपला शिरकाव करूं लागतात. भयंकर अशा उपदंशजन्य विकारांमुळ व तदनुषंगिक होणाऱ्यां पक्षघातासारख्या रोगामुळें अर्धांग वायु, अवयव लुले पडणें, स्मरणशक्ति कमी होणें, शरीरावर गांधी उटणें, व्रण व काळे डाग पडणें, संधिवात व दूषित रक्तामुळें उद्भवणाऱ्या इतर सर्व रोगांवर हाच **सार्सापरिला** देणें फारच उत्तम होय. अनुभवाशिवाय गुणाची कल्पना येणार नाहीं. किंमत १ बाटलीस रु. १।. टपालखर्च -।- पांच आणे. चार बाटल्यांस टपालखर्चासह रु. ४॥- उत्तम गुणास चार बाटल्या लागतात. आमचा सार्सापरिल्याचा खप पाहून बऱ्याच लोकांनीं हुबेहुब नकल केली आहे. तरी घेतांना तो आमचाच आहे अशाबद्दल खात्री करून घेणें.

**मालक-** डा. गौतमराव केशव आणि सन्स
ठाकुरद्वार पोस्टाजवळ मुंबई नंबर २

नो. नं. २३

---

सतत ४२ वर्षें चाललेला कारखाना

## ए. जे. ह्मात्रे आणि सन् सुगंधी.

ठि:--पांजरा पोळचा नाका, चिमणलालमहाराजांचे मंदीर भुलेश्वर -- मुंबई.

एकच भाव ! एकच भाव ! !

ओटो मुरंगी आमचेकडे मिळणारा

माल ओटो मुरंगी

**अत्तरें.**— गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल, रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुस्काहिना, गुलहिना, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. हीं अत्तरें दर तोळयास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४ ६ रु.

**तेलें.**— चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगंधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी वरील तेलें दर रुपयास ६ तोळयापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळया भावाची मिळतील. दर बाटली ४ आणे

**अष्टगंधी अरगजा** १ तोळयास ४ आ. ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु.पर्यंत. अरगजा व फितना ( निरनिराळ्या सुवासाचा ) दर **डबीस** ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उदणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ९ आ १० आ. १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट

ह्यांशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी, मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गंजिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आयंवर्धक कार्डस, बिझिक, इसापिकें, हस्तीदंती फासे व फण्या, पितळी सामान. पितळी शिंगे व करणे, चंच्या, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, सुटें व वेणीचें गंगावन इत्यादि वरील पत्त्यावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगांवच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्युपेबलनें पाठविला जाईल. नो. नं. ३

---

# Oriental Government security Life Assurance Co., Ltd

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER
THE LEADING INDIAN LIFE ASSURANCE COMPANY

## FUNDs 4 CRORES.

INVESTITED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BOUNDS.

## Quinquennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Exisra Assunces. |
|---|---|---|
| | Rs | Rs. |
| 1888 | 8668 | 2,63,38,000 |
| 1893 | 17,657 | 4 68,36,090 |
| 1898 | 28,516 | 6 81,27,774 |
| 1903 | 40,390 | 8 47,06,108 |
| 1908 | 52,168 | 10,12,93,883 |
| 1913 | 62 097 | 12,36,79,510 |

| Year. | Annua Income. | Total Assets. |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| 18883 | 1148,642 | 36 38.694 |
| 189 | 21,16,549 | 80 05,818 |
| [illegible]3 | 31,36,421 | 1,40,32356 |
| 1908 | 1,07, 09 | 2,10,[illegible]5,947 |
| 190 | 535,55,639 | 3,22,79,991 |
| 1913 | 69,44 69 | 4,[illegible]1,61,889 |

## RECORD BONUS

*The Bonus declared for the last triennium constitutes a record.*

IMMEDIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH and TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*Extract from report made npon the Company's position as at 31st December 1912, by Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Aciuaries, London*

" At each of the last three Valuations the Reserves of the Compan have been calculated on an increasingly stringent basis. On this oecasion there has been a further addition to the reserves and the financial position of the Company has been further strengthened. The resouaces of the Company are now so ample that the security which they afford is undoubted and Policyholders and Shareholders alike may confidently forward to a continuation of prosperity in the future."

Do not delay in applying for Insurance—delays are dangerous. The Oriental is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy holders with a absolute security and possessing all the important factors essentia in a first class office it commands the full confidence of the public.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBERAL
Full particulars, prospectus and prosposal forms on application to:—

**M. deSOUZA,**
CHIEF AGENT,
*C. P. Berar & Khandesh,* NagPUr

N. N. 25

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

Regd NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४९ ] आकोला--सोमवार तारीख २२ माहे मार्च सन १९१५ ई० [ अंक ११

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हा. ........२ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ डिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक अकोला ९।१।०९ | J. G. Ridland. एजंट

नो. नं २

### केशराचें फूल मुफ्त

पवित्र केशर ॥।= शुद्ध शिलाजीत ॥ असली कस्तूरी २४ मशीरा तिनती ३ खालिस हींग ८= तो० सुंदर कामदार शाल ३ व
३½+१½ गज ६ से १०

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० १२

नो० नं० ८

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं रु. १८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिळाफ करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुनळी खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

ना० नं० ९

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेली सर्व प्रकारचीं सुबक व वाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठ मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन रविवार पेठ नाशिक सिटी.

नो. नं. ४

### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ९ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यांत श्रीशंकराचार्य, शंकरानंद, व विद्यारण्य यांचे उपनिषदावरील भाष्य, आत्मपुराण व अनुभूतिप्रकाश हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास 'वैशेषिक दर्शन' बक्षीस-

सनातन वैदिक धर्माचें, तत्त्वज्ञानाचें व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें--

### आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथें यांचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधीं प्रश्नांचीं मर्मार्थक उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.

नो० नं० ३

### नोटीस

भिकनखा वा। नाथदारखा मुसलमान रा० कारंजा पेष्ठ कारंजा ता० मुर्तिजापूर जि० आकोला. यांस

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं कसबे कारंजा येथील मेहरबान नरहर रामचंद्र घुडे यांचीं शेतें तीन सर्व्हे नंबर १२ व २८ खानापूर येथील व सर्व्हे नंबर २८ भीलखेडे येथील मिळून सर्व्हे नंबर ३ तुह्मी व मी मिळून दरसाल मक्ता ३७५ रुपयावर सन १९१४ते १९१८ पावेतों पांच वर्षा करितां वहीतीस घेतले. व त्याप्रमाणें चालूसालीं दोघांनीं मिळून शेताची किस्तगारी केली. त्यांत पीक उत्पन्न झालेल्या मालाचा तपशील खालीं तो येणें प्रमाणें—

खानापूर येथील शेत सर्व्हे नंबर १२ व २८ आकार रु० भीलखेड येथील शेत सर्व्हे नंबर २८

९० कडबा पेंढी ३००० दर ३
२२८ ज्वारी खंडी ६ दर ३८
५० तुर खंडी १ दर ५०
१५० कापस खंडी ४ अजमास
६ मुग मण २ दर ३
एकुण ५२४ रुपये.

यातील सर्व पीक मला वाटून न देतां तुह्मीच एकटे घेऊन गेले. व सावकाराचे मक्त्याची रकम आजवर दिली नाहीं ह्मणून वरील सावकाराचे मक्त्याची मागणी वरचेवर मजकडे येत असते तर तुह्मांस या नोटिसीनें कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्या दिवसापासून आठ ८ दिवसाचे आंत वरील सावकाराची मक्त्याची रकम पोहोचती करून देऊन त्याची पावती आणून मजला दाखवावी. व माझे हिश्यापैकीं सावकाराचा मक्ता मजरा जातां बाकी राहीलेले पैसे अथवा माल मजला आणून द्यावा. तसें न केल्यास रितीप्रमाणें तजवीज केली जाईल. यापुढें तुमचे व माझे दरम्यान वरील सावकाराचीं शेतें पुढील साले मध्ये राहिलेले मुदतींत माझी वाहाण्याची इच्छा नाहीं करितां वरील कबुलायतींतील तुमचे व माझे शराकती बद्दलची शर्त आजपासून रद्द समजावी. या नोटिसीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल कळावें. तारीख

दस्तुर त्र्यंबक रामकृष्ण बनसोडकर आकोला. सही

१ मारोती उकंडा फुटाणे राहणार कारंजा द० खुद

नो० नं० ९९

### नोटीस.

नोटीस बेशमी दमड्या वा। आकया महार रा० शिवणी आरबी जवळील ता० दारव्हा जि० यवतमाळ पोलीस स्टेशन आरनई पो० महागाव

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मी माझे लग्नाचे नवरे असून लग्न होण्यास सरासरी १९।१६ वर्षे झालीं आहेत त्या अवधींत मी अज्ञान असता १३ महिने नांदविण्यास नेले होते. तेव्हां पासून अद्याप पर्यंत मला नेले नाहीं हल्लीं मला बापकोंत मिळण्यास सरासरी ७।८ वर्षें झालीं तेव्हा पासून तुमचे कडून संसारसुख मिळाले नाहीं. व पुढेंही तुमचे कडून संसारसुख मिळण्याचा संभव नाहीं कारण मला तुमचे येथें नांदण्याकरितां माझे आई बापानें पुष्कळवेळां आणले परंतु तुह्मी मला नांदविण्यास नाकारले त्याबद्दल माझे आई बापानें पुष्कळ वेळां पंचायतीही घातल्या परंतु तुह्मी साफ जबाब दिला कीं मी नादवित नाहीं. व तुला दुसरा नवरा करण्यास माझी मोकळीक आहे हल्लीं मी लोकाचे ३०० रुपये कर्ज काढून निर्वाह केला आहे. ते कर्ज आदा करण्यास मला कांहींच आधार नाहीं व पुढें कर्ज काढून खाल्ले तर तुह्मी देणार नाहीं व कर्ज जास्त होईल तेणेंकरून मला फार त्रास होईल तरी तुह्माला विनंती करण्यांत येते कीं आतां हल्लीं मला लोकाचे देणें असलेले कर्ज रु. ३०० हे द्यावे व मला नांदण्यास नेऊन आपण संसार आनंदानें करावा नाहींतर मला फारकत द्यावी. ह्या वरील सुचना तुह्माला कबूल आहेत किंवा नाहीं ह्याचा जबाब ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत लेखी द्यावा असे न केल्यास तुह्मी नादवित नाहीं हा तुमचा तोंडी जबाब व ही नोटीस फारकत समजून दुसरा पाठव करण्यांत येईल नंतर लोकाचे झालेले कर्ज रुपये ३०० हे आदा करण्याकरितां योग्य रितीनें दावा करण्यांत येईल व माझे वरील तुमचा असलेला नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं. ह्या नोटीशीचा खर्च व पुढें लागणारा सर्व खर्च तुह्माला द्यावा लागेल. ही नोटीस दिली असे कळावें तारीख १२।३।१५ इ०

द० संभु अनपू पी. रा. आकोला
सही
शेवंती मर्द दमड्या नि० हातचा आंगठा खुद असे.

नो. नं. १००

## नोटीस

मेहरबान नरहर रामचंद्र बुडे रा. कारंजा पोष्ट कारंजा

यांस.—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमची शेतें तीन सर्वे नंबर १२ व २८ खानापुर येथील व सर्वे नंबर २८ मीलखेड येथील मिळन सर्वे नंबर तीन हे भीकनखा वा। नामदारखा व मी असें दोघानीं वहीतीस पांच वर्षीं करितां ३७५ रुपयावर सन १९१४ ते १९१८ पावेतों वहीतीस वेतलें व त्या बदल आपणास पांच वर्षाचा कबुलपट्टा दोघानीं मिळून लिहुन दिला. त्यावर आम्हीं दोघांनीं पेरलेला माल मला वाटून न देतां परभारे त्यानींच येकट्यानीं त्यापैकीं माझे हिस्यावर कांहींच येऊं दीले नाहीं करितां या नोटीसीनें आपणास कळविण्यांत येतें कीं या सालचा सारा व मक्त्याची रकम झालेल्या पीकावर वसूल करावा. व त्याचा व माझा बेबनाव असल्या कारणानें त्याचें शराकतींत हिश्यानें शेतें वाहण्याची इच्छा नाहीं यापेक्षां तुम्हीं शेताची फोड करून दिल्यास मी वाहण्यास तयार आहे नाहींपेक्षां आम्हीं जो कबुलपट्टा लिहुन दिला तो नेटीस पावल्या पासून रद्द समजावा कळावें. दस्तुर त्र्यंबक रामकृष्ण बनसोडकर आकोला

सही

मारोती उकंडा फुलारी रहाणार कारंजा द. खु:

नो० नं० १०१

---

वऱ्हाडसमाचार

मिति चैत्र शुद्ध ६ शके १८३७

## शाबास ! त्रावणकोर !

राज्यकारभाराच्या कांहीं बाबतींत तरी देशी संस्थानांनीं इंग्रजांवर ताण करून दाखविण्यांत चालविलेली अहमहमिका पाहून आम्हांस फार संतोष वाटतो. मुफत व सक्तीचें शिक्षण सुरू करण्यास हिंदुस्थान सरकारला जेथें भीती वाटते, तेथें बडोदें संस्थानचें उदाहरण दाखविण्यास आम्हांस मोठा अभिमान वाटतो. ग्रामपंचाइतीचें पुनरुज्जीवन हा ब्रिटीश सरकारला मोठा वादग्रस्थ प्रश्न वाटतो तर त्या बाबतींत इंग्रज सरकारला आपण मार्गदर्शक होऊं अशी ईर्षा दवास सारख्या छोट्याशा संस्थानानें धरलेली पाहून त्याचें कौतुक करावेंसें वाटतें. रयतसभा यांचा प्रचार हैसूर, त्रावणकोर व सांगली या संस्थानांतून जोरानें व नेटानें पुढें पाऊल टाकीत आहे आतां त्रावणकोर संस्थानानें शिक्षणाच्या बाबतींत आणखी एक पाऊल पुढें टाकण्याचें मनात आणिलें आहे. खेडेगांवच्या मुलांना शिक्षणासाठीं दूरच्या गावीं जावें लागतें. तेथें शिकून जेवणासाठीं त्यांना परत आपल्या गांवीं [illegible] लागतें. ही अडचण दूर करावी, व त्या मुलांना त्यांच्या शाळेच्या गावांतच एकवेळ जेवण मिळावें असा त्रावणकोर [illegible] उदार गावकऱ्यांच्या सहाय्यानें त्रावणकोर संस्थान करीत आहे. अमेरिकेंत अशा प्रकारची मुलांना मधल्या वेळीं फुकट जेवण देण्याची पद्धति आज कित्येक वर्षे अमलांत आहे व तिच्या योगानें मुलांच्या शरीरप्रकृतीवर व विद्येस्माहावर चांगला परिणाम घडला आहे असें ऐकतों. त्याच पद्धतीचें अनुकरण तूर्त अल्प प्रमाणावर त्रावणकोर संस्थान करीत आहे. तूर्त अनुभव पाहण्यासाठीं एका गावांत १०० मुलांना फुकट जेवण देण्याची तजवीज एक फंड उभारून करण्यात आली आहे. व जेवणाच्या तजवीजीवर देखरेख ठेवण्या करितां गांवकऱ्यांची एक कमिटी नेमण्यांत आली आहे. या कार्यासाठीं संस्थानानें आपल्या तिजोरींतून भरपूर मदत करण्याचें ठरविलें आहे. हा प्रयोग अनुभवाअंतीं उपयुक्त ठरल्यास अन्यत्रही अशा तजविजी करण्यात येतील. अन्नदानाचें पुण्य आमच्या शास्त्रांत मोठें सांगितलें आहे. पण त्याचा उपयोग आमच्यांतले धनिक शेट सावकार ब्राह्मण भोजनें घालून मात्र करून दाखवितात. त्यांच्या या औदार्याला हें [illegible] इष्ट वळण लागल्यास शिक्षणप्रसाराला केवढी मदत होईल तें सांगावयास नको. पण 'येथ [illegible] दुर्लभ' ही गोष्ट खरी.

---

## हिंदुस्थानांतलीं खतें.

इकडे पाहावें तर नेहमीं असें सांगण्यांत येतें कीं हिंदुस्थानच्या जमिनीला मिळावें तसें खत मिळत नाहीं. ह्मणून येथील जमिनींतून निघावें तसें पीक निघत नाहीं, आणि सरकारच्या व्यापारखात्याच्या [illegible] आंकडे पाहावे तर असें दिसतें कीं हिंदुस्थानांतून खताच्या उपयोगी अशा हाडें वगैरे पदार्थांच्या राशीच्या राशी दरसाल परदेशीं रवाना होत आहेत, हा काय चमत्कार ह्मणावा! आमच्या जमिनीला खतें पुरेशीं न मिळण्याला दोन कारणें आहेत. एक तर शास्त्रीय पद्धतीनें खतें तयार करण्यास लागणाऱ्या ज्ञानाचा आमच्या शेतकरी वर्गाच्या ठायीं असलेला अभाव, आणि दुसरें शेतकीचें सर्व जीवन ज्या [illegible] अवलंबून आहे तीं खतें परदेशीं निर्यात न होतील अशा विषयींच्या निर्बंधाचा अभाव. पण या दोन्ही बाबतींत लोकांचे ठायीं असमर्थता असली तरी आमच्या सरकारच्या ठायीं ती नाहीं. लोकांना खतें तयार करतां येत नसलीं तर सरकारनें शास्त्रज्ञांकडून तीं तयार करवून लोकांना तीं प्रत्यक्ष करून दाखवास पाहिजेत, व त्यांचा उपयोग करण्याचा शेतकरी वर्गास शिकवणें त्याचें कर्तव्य आहे. अनेक शेतकरी अडाणी असले तरी एखाद्या गोष्टीपासून फायदा होतो असल्याचें प्रत्यक्ष पाहिल्यानंतर ते जुन्या पद्धतीलाच चिकटून रहातील इतके मूर्ख किंवा स्वार्थपराङमुख ते खास नाहींत. खतासारख्या अत्यंत उपयोगी वस्तूंचा निर्यात बंद करण्यास सरकार असमर्थ आहे असें ही नाहीं. तेव्हां प्रत्येक प्रांतांतल्या ॲग्रिकलचरल असोसिएशनानीं या बाबतींत शेतकऱ्यांना चार समजुतीच्या गोष्टी सांगणें व सरकारकडूनही खतांच्या निर्यातीस प्रतिबंध घालण्याची तजवीज करणें अत्यंत अवश्य आहे.

---

## महायुद्ध

या महायुद्धाच्या आजपर्यंतच्या हकीकतीचें सरकारी साप्ताहिक युद्धवृत्त खालील प्रमाणें आहे. त्यावरून प्रस्तुतच्या स्थितीची कल्पना चांगली होण्यासारखी आहे.

### साप्ताहिक युद्धवृत्त.

### जर्मनांचें फायद्यापेक्षां नुकसानच अधिक झालें आहे.

१ युद्ध सुरू झाल्या [illegible] सुमारें ७ महिने होऊन गेले आहेत. तर ह्या अवधींत दोन्ही पक्षांचा नफानुकसानी काय झाली आहे तें पाहूं. जर्मनानीं बेल्जम आपल्या कबजांत ठेविलें आहे, व पोलंडमधील कांहीं मुलूख ते व्यापून बसले आहेत. जर्मन सैन्याची अनंत प्राणहानि झाली आहे. तरी पण त्यांचा अद्याप पराभव झालेला नाहीं. आणि दोस्त राष्ट्रांचीं सैन्यें पूर्वेकडे व पश्चिमेकडे जर्मन मुलखापासून अद्याप पुष्कळच दूर आहेत. ही युद्धचित्राची एक बाजू झाली.

२. आतां ह्या चित्राची दुसरी बाजू कशी आहे तें पाहूं. ब्रिटिश आरमारानें जर्मन व्यापार बहुतेक ठार बुडविला आहे. जर्मनीचें वसाहतीचें साम्राज्य जर्मनीचे हातांतून बहुतेक परकें झालें आहे. जर्मनी बाहेरील जगाशीं जर्मनीचें दळणवळण तोडून टाकण्यांत आलें आहे, आणि समुद्रापलीकडील देशांतून माल पुरवठा जर्मनीस होणें अशक्य झालें आहे; आणि ह्यामुळें युद्धास जरूर लागणाऱ्या वस्तूंचा जर्मनीला तुटवडा पडूं लागला आहे, व प्रत्यक्ष उपासमारीचा तडाखाही जर्मनीस भासूं लागला आहे.

### दोस्त राष्ट्राचें राखीव ठेविलेलें सैन्य

३. शिवाय, दोस्त राष्ट्रें अधिक सैन्य रणभूमीवर पाठवीत आहेत. इंग्लंडनें १० लाखांहून अधिक सैन्यास युद्धकलेचें शिक्षण देऊन उन्हाळ्यात रणभूमीवर पाठविण्यास तयार केलें आहे. रणभूमीवर पाठविण्याजोगें सैन्य रशिया जवळ तर अनंत शिल्लक आहे, व फ्रेंच सैन्याचा दिवसानुदिवस जास्त जास्त तयारी होत आहे.

### तुर्कांचा त्रेधा

४. शिवाय, तुर्कस्थानचे मदतीवर जर्मनीचा फार मोठा भिस्त होती. 'काकेसस' मधील रशियन मुलुखावर तुर्कांनीं केलेली स्वारी फसली आणि ईजिप्तवर तुर्कांनीं केलेली स्वारी असा [illegible] मोठें नाव देण्यात आलें होतें [illegible] शत्रूंची खूब [illegible] झाली.

### दोस्त राष्ट्रांना आरमाराचा फायदा आहे.

५. ह्या युद्धाचें लक्ष्यपूर्वक अवलोकन करणाऱ्या कोणासही दिसून येईल कीं दोस्त राष्ट्रांना [illegible] मदत [illegible] आहे. [illegible] मोठा [illegible] ठेविली [illegible] तयारी [illegible] केलेला [illegible] राष्ट्रां[illegible] आपल्या [illegible] ठाण्यांत [illegible] ते तर [illegible] होता [illegible] ब्रिटि[illegible] केला. [illegible] आपली [illegible] सावका[illegible]. [illegible] त्यांच्या जुळवा[illegible] देऊन [illegible] तयार [illegible] ते [illegible] होईल. [illegible] होता [illegible] हा [illegible] अधिक [illegible].

६. [illegible] ब्रिटिश [illegible] आणि ब्रिटिश व फ्रेंच आरमारानें [illegible] डार्डनेल्स [illegible] आणि [illegible] बोलावे [illegible] आहे.

### रशियाची मोहिम.

७. [illegible] नाहीं. [illegible] कीं [illegible] युद्धा[illegible] [illegible] पर्वत [illegible] रशियन [illegible] आहे. [illegible] मार्गाला [illegible] कुमक [illegible] रशियन [illegible] रशियन मदतीवर [illegible] कीं [illegible] रशियन [illegible] हे [illegible] आणि [illegible] लढाई [illegible] जर्मनांनीं [illegible] येथें [illegible] ताज्या आलेल्या [illegible] कीं जर्मनांना [illegible] रशियन सैन्यानें सुरुवात केली आहे.

८. दक्षिणेकडे [illegible] आस्ट्रियन सैन्यांना मिळून रशियन सैन्याशीं [illegible] करून [illegible]

प्रयत्न केले. पण येथेंही रशियन सैन्यानें सर्व हल्ले परतविले.

९. असें ह्मणतात कीं जर्मन व आस्ट्रियन सैन्यांनीं मिळून जे निकराचे हल्ले रशियन सैन्यावर केले ते नवें ब्रिटिश सैन्य पश्चिम रणभूमीवर दाखल होण्याचे आधीं पूर्वेकडील रणक्षेत्रांत रशियन सैन्यावर आपणास एकदां पुरा जय मिळवा ह्या हेतूनें केले होते. नवें ब्रिटिश सैन्य रणक्षेत्रावर येऊन दाखल झालें कीं पूर्वेकडील रणक्षेत्रावर रशियन सैन्याशीं लढत असलेल्या सैन्यापैकीं आपलें बरेंचसें सैन्य जर्मनीला पश्चिम रणक्षेत्रावर पाठवावें लागेल. अर्थात् पूर्वेकडे जर्मन सैन्याचें बळ कमी होऊन रशियन सैन्यास थोपवून धरणें त्यांस अधिकच जड जाईल.

**जर्मन पाणबुड्या बोटींनीं केलेल्या हल्ल्यांचा परिणाम फारच थोडा झाला आहे.**

१०. मागील लेखांत सांगितलें होतें कीं, ब्रिटिश समुद्रात फिरणाऱ्या ब्रिटिश व्यापारी गलबतास तारीख १८ फेब्रुवारी पासून आह्मीं पाणबुड्या बोटींनीं बुडवून टाकूं अशी जर्मनांनीं धमकी दिली होती. त्या तारखेपासून आजपर्यंत १,६८० गलबतें ब्रिटिश बंदरांतून आलीं गेलीं. ह्यापैकीं बुडविण्यांत आलीं अशीं ब्रिटिशांचीं ७, अमेरिकेचीं २ व नॉर्वेचें १ होतीं. ही संख्या ह्मणजे फारच थोडी आहे. जर्मनांना असें वाटत होतेंसें दिसतें कीं आपण रोजीं १२ ते २० गलबतें बुडवून टाकूं. एक ब्रिटिश उतारू बोट सुमारें १०० उतारू घेऊन इंग्लिश खाडींतून जात असतांना एका जर्मन पाणबुड्या बोटीनें ती उडवून देण्याचा प्रयत्न केला पण तो फुकट गेला, ही एक लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे. तरी पण इंग्लिश खाडींतून उतारू बोटी जात येत आहेतच.

### जर्मनी व युनायटेड स्टेट्स

११. बुडविण्यांत आलेल्या अमेरिकन गलबतासंबंधानें खुलासेवार सर्व हकीकत आपणास कळवावी असें युनायटेड स्टेटसचे सरकारानें बर्लिन येथें असलेल्या आपल्या वकिलास कळविलें आहे. ब्रिटिश समुद्रांत येणाऱ्या सर्व गलबतांचा आम्ही नाश करूं असा जो जाहिरनामा जर्मनांनीं काढला आहे त्यामुळें अमेरिकन लोकांना फारच चीड आली आहे असें मागील लेखामध्यें सांगितलेंच आहे. दोन अमेरिकन गलबतें तर जर्मनांनीं बुडविलींच, तेव्हां आतां अमेरिकन सरकार काय करतें तें पहावें.

### दार्देनेल्स सामुद्रधुनीवर भडिमार.

१२. भूमध्य समुद्रांतील ब्रिटिश व फ्रेंच आरमारानें 'दार्देनेल्स' सामुद्रधुनीच्या तोंडच्या चार किल्ल्यावर भडिमार करून ते जमीनदोस्त केले व नंतर तीं जहाजें सामुद्रधुनींत बरीच आंत शिरलीं. 'दार्देनेल्स' हा खुला दर्या व 'मार्मोराचा समुद्र' यांस जोडणारी अशी अरुंद सामुद्रधुनी आहे. 'मार्मोराचा समुद्र' अरुंद होत होत 'बास्पोरसचे' सामुद्रधुनीस मिळतो. 'बास्पोरसची सामुद्रधुनी' ही, 'मार्मोराचा समुद्र' व 'काळा समुद्र' ह्याचे मध्यें आहे. 'दार्देनेल्सची सामुद्रधुनी,' 'मार्मोराचा समुद्र' व 'बास्पोरसची सामुद्रधुनी' याचे एका बाजूस युरोपांतलें तुर्कस्थान आहे व दुसरे बाजूस आशियांतलें तुर्कस्थान आहे. 'कान्स्टांटिनोपल' हें शहर बास्पोरसच्या युरोपखंडाकडील बाजूस आहे.

### दार्देनेल्सचें महत्त्व.

१३. ह्यावरून 'दार्देनेल्स' ही सामुद्रधुनी किती महत्त्वाची आहे हें लक्षांत येईल. कान्स्टांटिनोपल व काळा समुद्र ह्यांस जलमार्गानें जाणाऱ्या वाटांचें हें नाकें आहे. ज्या राष्ट्राचे ताब्यात 'दार्देनेल्स' ची सामुद्रधुनी असेल त्या राष्ट्राला भूमध्य समुद्रांत व काळ्या समुद्रांत जाणाऱ्या जहाजास अडविता येईल. गहूं आणणारीं जहाजें काळ्या समुद्र वरील रशियन बंदरांतून येतात. अर्थात्, ज्या राष्ट्राचे ताब्यात दार्देनेल्सची सामुद्रधुनी असेल त्या राष्ट्राचे हातांत काळ्या समुद्रांतून भूमध्य समुद्रात व पुढें इंग्लंड व पश्चिमेकडील देश ह्या ठिकाणीं गहूं जाऊं न देण्याचें सामर्थ्य राहील.

१४ ब्रिटिश व फ्रेंच काफिले हे दार्देनेल्सच्या तोंडचे किल्ले जमीनदोस्त करून गहूं नेणाऱ्या जहाजांचा रस्ता मोकळा करित आहेत आणि तुर्कस्थानाचे पिछाडीस शह बसवित आहेत.

### इतालींतील युद्धार्थ जाहिरसभा.

१५ जर्मनी व आस्ट्रिया या विरुद्ध युद्ध सुरू करावें असें जाहीर रीतीनें मत प्रदर्शित करण्याकरितां इतालींत मोठमोठ्या सभा भरविण्यांत आल्या. व्हेनिस येथें तर आस्ट्रियन बाहुल्याची प्रसिद्धपणें होळी करण्यांत आली.

### फ्रान्स व बेलज्यम.

१६ फ्रान्समधून अशी बातमी आली आहे कीं रणक्षेत्राच पट्याचे मध्य भागांत फ्रेंच सैन्य पुढें सरसावलें आहे आणि पश्चिमेच्या बाजूस ब्रिटिश सैन्यही बरेच पुढें गेलें आहे.

---

## देशी भाषांच्या द्वारें शिक्षण

बंगीय साहित्य परिषदेनें सरकारकडे अर्ज पाठवून अशी विनंती केली आहे कीं मेडिकल स्कूलमध्यें बंगाली भाषेच्या द्वारें शिक्षण देण्यात यावें व त्याच भाषेंत परिक्षाही घेण्यांत यावी. ही मागणी सर्वथा रास्त आहे. हायस्कुलांतून कित्येक विषयांचें शिक्षण देशी भाषेच्या द्वारें देण्यांत यावें असें कांहीं वर्षांपूर्वी मुंबईच्या विद्याखात्याच्या डायरेक्टरसाहेबांनीं सरक्युलर ही काढलें असल्याबद्दल प्रसिद्ध झालें होतें. हायस्कुलापेक्षांही मेडिकल स्कुलांत देशी भाषेच्या द्वारें शिक्षण देण्याची अवश्यकता अधिक आहे. कारण, या स्कुलांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांचें ज्ञान फारच तुटपुंजें असून डाक्तरच्या धंद्याची मोठी जबाबदारी त्यांच्यावर पडावयाची असल्यामुळें त्याना आपापल्या विषयाचें पूर्ण ज्ञान होणें फार अवश्य असतें. इंग्रजींतून हे विषय शिकविले असतां त्यांना पुष्कळवेळां ते विषय चांगले समजत नाहींत. इतकेंच नाहीं, तर एखादे वेळीं विपरीत ज्ञान व अर्थात् त्यापासून विपरीत परिणाम होण्याचीही भीति असते हें लक्षांत घेऊनच पंचवीस तीस वर्षांपूर्वी बंगाल्यांत व त्याचप्रमाणें मुंबईच्या मेडिकल कॉलेजांत हॉस्पिटल असिस्टंटच्या वर्गांतल्या विद्यार्थ्यांना देशी भाषेंत वैद्यकी शिक्षण देण्याचा उपक्रम शहाणपणानें करण्यात आला होता. पण पुढें काय कारण झालें असेल तें असो. ती व्यवस्था पालटून इंग्रजींत शिक्षण देण्याचा प्रघात सुरू झाला व तोच हल्लीं सुरू आहे. देशी भाषेंत वैद्यकी शिक्षण मिळत असे, तेव्हां विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठीं वैद्यकीच्या निरनिराळ्या शाखांवर देशी भाषांत ग्रंथही निर्माण झाले. परलोकवासी डा. सखाराम अर्जुन, गोपाळ शिवराम वगैरे अध्यापकांनीं त्यावेळीं मराठींत ग्रंथ लिहून मराठी वाङ्मयांतली एक उणीव भरून काढली होती. अशा प्रकारें अप्रत्यक्ष रीतीनें मराठी वाङ्मयात भर टाकणारी ही शिक्षणपद्धति पुनः सुरू करण्याविषयीं महाराष्ट्र साहित्य परिषदेनें सरकारास विनंती करणें योग्य आहे. सरकारपुढें याचना करण्यानें स्वाभिमानाला धक्का लागतो अशा विचित्र मताची कांहीं मंडळी साहित्य संमेलनास येत असते, व मागें एकदां युनिव्हर्सिटींतल्या परीक्षांसाठीं देशी भाषा ठेवण्या संबंधाचा ठराव मराठी साहित्य संमेलनापुढें आला असता या मंडळींनें बहुमताच्या जोरावर ते फेटाळून लाविला होता ही गोष्ट ही अद्याप लोकांच्या स्मरणांत असेल. पण त्यवेळची लोकांच्या डोळ्यावरची धुंदी गेल्या सात आठ वर्षांच्या अनुभवानें आतां गेली असेल, व आतां अशा प्रकारचा ठराव परिषदेपुढें आला असता तो पास होईल असें आह्मांस आशा वाटत आहे.

---

## अमेरिकेंची स्वातंत्र्यप्रियता.

अलीकडे सरकार खाजगी शाळांतल्या शिक्षकांकडून व कॉलेजांतल्या प्रोफेसरांकडून आह्मी राजकीय चळवळींत पडणार नाहीं अशा प्रकारचें प्रतिज्ञापत्र लिहून घेऊन त्याच्या मतस्वातंत्र्याला कसा प्रतिबंध करित आहे तें पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजाच्या उदाहरणा वरून आणि कलकत्ता युनव्हर्सिटीनें केलेल्या कित्येक नेमणुका चान्सेलराकडून रद्द करण्यांत आल्या त्यावरून सर्वांना कळून चुकलेंच आहे. या बाबतींत अमेरिकेच्या हार्वर्डयुनिव्हर्सिटीनें घालून दिलेलें उदाहरण अमेरिकेंची स्वातंत्र्य प्रीतिविषयींची कीर्ति निःसंशय वाढविणारें आहे. त्या युनिव्हर्सिटींतले एक प्रोफेसराचीं मतें देशाच्या संरक्षणाच्या प्रश्नासंबंधानें कांहीं विचित्र होतीं. तेव्हां त्या प्रोफेसरास काढून टाकाल तर आपण युनिव्हर्सिटीला तीन कोट रुपयांची देणगी देऊं असें क्लेम वीनर नांवाच्या एका श्रीमान् माणसानें युनिव्हर्सिटीला पत्र लिहिलें. पण ही युनिव्हर्सिटी तुमच्या लालचीनें उष्टें खाऊन स्वतःला भ्रष्ट करून घेणारी नसल्यामुळें मतस्वातंत्र्याच्या तत्त्वाला बाध आणणारी ही तुमची देणगी आह्मांस नको असा रोखठोक जबाब युनिव्हर्सिटीकडून दात्यास मिळाला. 'तुका ह्मणे तेथें पाहिजे जातीचें' हें वाक्य खोटें नाहीं.

---

## मध्यप्रांतासाठीं चीफकोर्ट.

ता० ८ मार्च रोजीं वरिष्ठ कायदे कौंसिलाच्या बैठकीपुढें ना० मि० दादाभाई यांनीं मध्यप्रांत व वऱ्हाड यांच्या साठीं एक स्वतंत्र चीफ कोर्ट उघडण्याची अत्यंत जरूरी दाखविणारा ठराव आणिला होता. या ठरावावर नामदारांचें झालेलें भाषण फार मुद्देसूद व विचार करण्या सारखें होतें. गेल्या चाळीस वर्षांत लोकसंख्या, शिक्षण, व्यापार व उद्योगधंदे, वगैरे बाबतींत मध्यप्रांत व वऱ्हाड यांची कल्पनातीत प्रगति झालेली आहे. हल्लीं या प्रांतांतून न्यायाच्या कोर्टाचें काम कितीवाढलें आहे हें दाखविण्यास उत्तम प्रमाण ह्मणजे वकील, ब्यारिस्टर वगैरे लोकांच्या संख्येंत झालेली वाढ हें होय. १९१२ सालच्या ज्युडिशियल रिपोर्टावरून पाहतां हल्लीं या दोन प्रांतामिळून सुमारें २००० लोक वकीलीचा धंदा करीत आहेत असें दिसतें, नुसत्या ब्यारिस्टरांचीच संख्या ६२ आहे. शेतकी, व्यापार, कारखाने, व इतर उद्योगधंदे यांच्या वाढीबरोबर त्यांच्या व्यवहाराची वाढ ही साहजिकच होत चालली आहे. अर्थात् अशा वाढत्या व्यवहारासंबंधाचे निकाल करण्याला चाळीस वर्षांपूर्वी घालून दिलेली न्यायपद्धति लोकांच्या आताच्या गरजाच्या मानानें उणी पडल्यास तो तिचा दोष ह्मणतां येणार नाहीं. १८९६ सालापर्यंत तर येवढ्या मोठ्याप्रांताला एकच अपील कोर्ट— ज्युडिशियल कमिशनरचें कोर्ट— होतें तेव्हांपासून आडिशनल ज्युडिशल जज्ज नेमण्याची वहिवाट पडली व तीच अजून चालू आहे. या जज्जांच्या नेमणुका प्रांतिक सरकारकडून करण्यांत येत असतात. ज्युडिशियल कमिशनर हे सिव्हिलियन असतात. मुख्यन्यायाधिशाच्या जागीं सिव्हिलियन असणें व ब्यारिस्टर असणें यांच्यातला फरक शद्बांनीं व्यक्त करून दाखविता आला नाहीं तरी लोकांच्या अनुभवाच्या दृष्टीला तो कळण्यासारखा आहे. व्यक्तिविषयक बाजू सोडून तात्विक दृष्ट्या पाहिलें तर ब्यारिस्टर जज्ज अधिक चांगलें काम करूं शकतात हें कबूल करावें लागतें. प्रांतांत सिव्हिलियन जजांच्या जागा थोड्या असल्यामुळें अगदीं खालच्या दर्जाच्या रेघा ओढल्या जज्जालासुद्धा आपल्या आयुष्यक्रमांत केव्हां तरी ज्युडिशियल कमिशनरच्या आसनावर विराजमान होण्याचें भाग्य लाभतें. अशा जजांपुढें नागपुर येथल्या सारख्या हुषार ब्यारिस्टराना कामें करावीं लागणें हें न्यायाच्या दृष्टीनें समाधानकारक नाहीं खरें, पण वस्तुस्थिति अशी आहे यांत शंका नाहीं. शिवाय ज्युडिशियल कमिशनरांचे अधिकारही चीफ कोर्टासारखे किंवा हायकोर्टासारखे नसल्यामुळें अधिकाराबाहेरचे खटले त्यांना मुंबई हायकोर्टाकडे पाठवावे लागतात. यामुळें हा लोकांना बराच त्रास सोसावा लागतो. या सगळ्या गोष्टींचा विचार करतां ज्युडिशल कमिशनरच्या कोर्टाऐवजीं या प्रांताला चीफ कोर्ट मिळावें अशी जी मागणी मि. दादाभाई यांनीं केली आहे ती गैरवाजवी आहे असें कोणालाही ह्मणतां येणार नाहीं अशी आमची खात्री आहे. खर्चाच्या दृष्टीनें या

प्रश्नाचा विचार केला तरी ही इष्ट सुधारणा घडवून आणण्यास मोठीशी अडचण येईल असें वाटत नाहीं. चीफ कोर्ट स्थापन करण्यासाठीं वर्षाचेकांठीं सुमारें लाख सवालाख रुपये ज्यास्त लागतील, पण लोकांना उच्च प्रतीच्या न्यायाचा लाभ होईल त्यापुढें या खर्चाचें महत्त्व वाटण्याचें कारण नाहीं. सध्याचें युद्ध या गोष्टीच्या आड येत नाहीं. कारण सरकारनें ही सुधारणा करण्याचें मनांत आणिलें तरी ती प्रत्यक्ष घडून येण्यास कांहीं कालावधि लागणारच व त्यापूर्वी युद्धाची इतिश्रीही होईल असा अंदाज आहे. सारांश, कोणत्याही दृष्टीनें या प्रश्नाचा विचार केला तरी सरकारनें मि. दादाभाईच्या ठरावाचा विचार करणें अवश्य आहे हें दिसून येईल व ब्रिटिश सरकारला न्यायाच्या सुधारणेइतकी दुसरी कोणतीही गोष्ट प्रिय नाहीं हें लक्षांत घेतलें तर मि. दादाभाई यांनीं पुढें आणलेला ठराव जरी मंजूर झाला नाहीं, तरी त्यांतलें तत्त्व सरकारला पटून त हाऊन आस्ते आस्ते ही सुधारणा घडवून आणतील अशी आह्मांस खात्री वाटते.

---

## झडतीचा विलक्षण प्रकार.

कलकत्याच्या 'भारतमित्र' नांवाच्या पत्रानें पोलीसच्या झडतीसंबंधाची एक विलक्षण गोष्ट उघडकीला आणिली आहे. तिच्यांत कितीसें तथ्य आहे तें आह्मांस सांगतां येत नाहीं, पण कांहीं असलें तर सरकारी अधिकाऱ्याचें लक्ष तिकडे जाऊन खोडसाळपणा करणाऱ्या इसमास चांगलें शासन करण्याची अत्यंत अवश्यकता आहे. बनारस येथें डा० प्रिय वरुण एम. ए. पी. एच. डी. नांवाचे कोणी गृहस्थ भारत फिलॉसफर व भारत या दोन पत्रांचे संपादक आहेत. त्यांच्या येथें कांहीं कारणानें घराची झडती घेण्याची अवश्यकता वाटल्यावरून पोलीस तेथें गेले. डाक्तर साहेबांनीं पोलीसांची झडती प्रथम घ्यावयास पाहिजे होती ती घेतली नाहीं. पोलीस कांहीं खोडसाळपणा करील अशी त्यांस कदाचित् शंका आली नसेल. पण पुढें कांहीं वेळानें त्यांना आपली चूक कळून आली व त्यांनीं पोलीस अधिकाऱ्या देखत पोलीस इन्स्पेक्टरची झडती घेतली, तेव्हां त्याच रुमालांत पिस्तुल निघालें. झडतीचे वेळीं पिस्तुल नेण्याचें कारण काय होतें, व असलें तरी तें डोक्यावरच्या रुमालांत लपवून नेण्याची काय अवश्यकता होती तें कळत नाहीं. सरकारी अधिकाऱ्यांनीं या गोष्टीचा नीट तपास करून नियमाबाहेर वर्तन करणारास कडक शासन करणें अवश्य आहे. कारण येथें डा० प्रियवरुण यांच्यासारख्या सुशिक्षित माणसाच्या इज्जतीचा प्रश्न आहे लोकांच्या मनांत पोलिसांविषयीं जो तिरस्कार उत्पन्न होत असतो तो अशा प्रकारच्या गैरशिस्त वर्तनानें होत असतो.

---

## निष्पक्षपातीपणा खराच!

कलकत्यास डाकाइत लोकांचे डाका घालण्याचे प्रकार मोठे गमतीचे असतात ही गोष्ट तर खरीच, पण तेथील पोलीस ही गुन्हे शोधण्यासारख्या रुक्ष व नीरस कामाला आपल्या चातुर्यानें मजेदारपणा आणतात. गेल्या आठवड्यांतल्या कलकत्याच्या वर्तमानपत्रांवरून कळतें कीं तेथील सी० आय० डी० च्या पोलिसांनीं आपला प्रभाव विशेष अब्रुदार व वजनदार माणसांवर गाजविण्याचा यत्न केला. प्रथम त्यांनीं ना० सुरेंद्रनाथ बॅनरजी यांच्या 'बंगाली' आफिसांतल्या एका लोखंडी पेटीची झडती घेतली. नंतर ना० राधाचरणपाल या धनवान् व वजनदार गृहस्थाच्या मोटार गाडीची झडती घेण्यांत आली. व शेवटीं कलकत्याच्या गव्हर्नराच्या कौन्सिलाचे एक मेंबर न० नवाब शमसुल हुदा यांच्या खुद्द मोटारची झडती झाली. आपण कोण आहों व आपला दर्जा केवढा मोठा आहे हें खुद्द नवाब साहेबांनीं सांगितलें तरी पोलीस ऐकेना. यावरून सगळीं माणसें एका परमेश्वरानें निर्माण केलीं असल्यामुळें त्यांच्यांत उच्चनीचता भेद ठेवणें बरोबर नाहीं हें तत्त्व कलकत्याच्या सी० आय० डी० पोलिसांच्या मनावर पूर्णपणें बिंबलेलें दिसतें. पण इतकी समदृष्टि ठेवणारांच्याठायीं सुद्धा वर्णभेद असावा हें आश्चर्य आहे. कारण त्यांच्या हातीं सांपडलेल्या सावजांत सगळे काळेच लोक होते. एकही गोरा नव्हता. गोरे लोक संशयातीत असतात असें तर त्यांच्या शिक्षणक्रमांत आहे कीं काय!

---

## लढाईच्या बातम्या.

जर्मनांनें तुर्कस्थानला मदत करण्याचें नाकारल्यामुळें तुर्कस्थानच्या पाचावर धारण बसली आहे.

दार्देनेल्सजवळच्या बहुतक किल्यांचा नाश इंग्रज तोफांनीं केला. त्यांच्यापुढें जर्मनीच्या सर्वोत्कृष्ट तोफ चें कांहीं चाललें नाहीं.

तुर्कस्थानचे माजी सुलतान अबदुल्हमीद यांचे एक चिरंजीव गेल्या आठवड्यांत लढाईत मरण पावले.

पोलंडमधलें सगळें सैन्य एकत्र करून वार्सावर पुनः एकवार जोराचा हल्ला करण्याचा जर्मनीचा विचार आहे.

जर्मनांनें इंग्रजांच्या आगबोटी कांहीं बोटी गेल्या आठवड्यांत बुडविल्या आतांपर्यंत पंनासावर इंग्रजांच्या बोटी बुडविण्यांत आल्या. पण येणाऱ्या जाणाऱ्या एकंदर बोटींच्या संख्येच्या मानानें बुडविलेल्या बोटींचें प्रमाण सेकडा १ सुद्धां पडत नाहीं.

ईजिप्त देश आतां अगदीं भयमुक्त झाला आहे.

इटलीनें लढाईची जय्यत तयारी करून ठेविली आहे.

ग्रीस देशाच्या प्रधानमंडळांत मोठी चलबिचल चालली आहे. लवकरच तें राष्ट्र संयुक्त राष्ट्रांना मिळेल असा रंग दिसतो.

आरमारी लढाईत यशस्वी होण्याबद्दल जर्मनीला आशा नव्हतीच. पण आतां तर ती आमिषात नष्ट झाल्यासारखी दिसते.

न्हॉक्‌ईसमधून जर्मनांना हाकून तें ठिकाण फ्रेंचांनीं घेतलें. या ठिकाणीं जर्मन लोक सप्तेंबरपासून मजबुतीकरून राहिले होते.

जर्मन लोकांनीं ट्रिपोलींत चोरून बंदुका पाठविल्यावरून इटालियन लोक चवताळले आहेत. या बंदुका दारूच्या पिपांतून लपवून नेण्यांत आल्या होत्या.

एक अमेरिकन जहाज ब्रिटिश समुद्रांत जर्मनांच्या हातून नाश पावलें. तें अपघातानें नष्ट झालें असें अमेरिकन सरकार समजत आहे. तथापि अधिक चौकशी चालली आहे.

जर्मनीजवळ पैशाचा तुटवडा असल्यामुळें सैन्यांतल्या शिपायाचे व अधिकाऱ्यांचे पगार अर्धे करण्यांत आले आहेत. जर्मनीच्या ल्याशनल ब्यांकनेंही यंदा भागीदारांस व्याज देतां येत नाहीं असें जाहिर केलें आहे.

संयुक्त राष्ट्रांच्या फौजेनें एशियामायनरवर एकाएकीं स्वारी केल्यापासून तुर्कस्थानचें धाबें दणाणलें आहे. या स्वारीचा हेतु काय तो न कळल्यामुळें तुर्कस्थानला आपल्या जीविताविषयीं जबरदस्त भीती उत्पन्न झाल्यासारखी दिसते, व जर्मनीचा पक्ष सोडून देऊन तुर्कस्थान एकटा संयुक्त राष्ट्रांशीं तह करण्यास कबूल होईल असाही कित्येकांचा तर्क आहे. दार्देनेल्स मध्यें इंग्रजांनीं बहुतेक किल्ले सर केले किंवा उध्वस्त केले आहेत जर्मनींत धान्याचा संग्रह संपुष्टांत आल्यामुळें हॉटेलें वगैरेतून विकत मिळणाऱ्या पावाचें वजन कमी करावें असे सक्तीचे हुकूम सुटले आहेत. सारांश, प्रस्तुत युद्धाचा अंत समीप येत चालला आहे अशीं सुलक्षणें दिसत आहेत.

---

## जर्मन लोकांची हिकमत.

सध्याच्या लढाईंत जर्मन लोक नानाप्रकारच्या हिकमती लढवीत आहेत. बाटलींत हवा खेचून भरून ती बाटली खंदकांतल्या ब्रिटिश शिपायांच्या आंगावर फेकावयाची, व ती फेकली ह्मणजे फुटून तींतून जोरानें हवा बाहेर पडून नाश करते अशी हिकमत जर्मनीचे लोक करीत आहेत. या हवेच्या अंगीं इतका जोर असतो कीं तिनें माणसें हवेंत उंच उडून जातात. व ज्या जागीं बाटली पडते तेथें ३०।४० फूट खोल व ४९ फूट व्यासाच्या तोंडाचा मोठा थोरला खड्डा पडतो! आमच्या पुराणांतलीं वर्णनें खोटीं ह्मणणारे आतां काय ह्मणतील!

---

## वऱ्हाडवृत्त

**हवामानः**— नव्या राक्षस संवत्सरापासून वसंत ऋतूचीं सर्व शुभ व आनंदी लक्षणें अनुभवास येत चालली आहेत. तरुवर जीर्णवस्त्रा टाकून नवीन लता पल्लवांनीं शोभायमान दिसूं लागले आहेत. उष्णकाल प्लेगाची इडा पीडा दूर फेकून देऊन आपला नवा आरंभ सुखकर करीत आहे.

रा. रा. लक्ष्मी नारायण ॲडिशनल डिस्ट्रिक्ट ॲन्ड सेशन जज्ज आकोला यास रायपूर येथें डिस्ट्रिक्ट जज्ज नेमण्यांत आलें.

रा. रा. खान बहादूर माणिकजी रतनजी दस्तुर यांस रजा संपल्यानंतर आकोल्यास न रुजू होतां जबलपूर येथें डिस्ट्रिक्ट जज्जच्या जागीं रुजू होण्याचा हुकुम झाला आहे. त्यामुळें रा. रा. गोपाळ वामन बापट जज्ज स्माल काज कोर्ट आकोला यांस ॲडिशनल डिस्ट्रिक्ट ॲन्ड सेशन जज्ज येथेंचें नेमण्यांत आलें.

रा. रा भास्कर मोरेश्वर विध्ने सबजज्ज आकोला यांस यथील स्मालकाज कोर्टावर बदलून रा रा. बाळकृष्ण खंडूजी चौबळ सबजज्ज जबलपूर यांस येथें सबजज्ज नेमल्याअन्वये ते आजरोजीं आपल्या कामावर दाखल होतील.

**स्थानिक कायदेकौन्सिल** — या काउन्सिलची बैठक तारीख १३ व तारीख १९ रोजीं नामदार चीफ कमिशनर यांचे अध्यक्षतेखालीं होऊन बजेट, देवी खात्याचें बिल, मध्य प्रांताचा मुलकी कायदा व इतर पुष्कळशा महत्वाची प्रश्नमाला या गोष्टी फार समाधानक रितीनें घडून आल्या. कैलासवासी सर ब्लेनेर ह्यासेट चीफ सेक्रेटरी व नामदार गोखले यांच्या मृत्यूसंबधानें सर रॉबर्टसन यांचे दुःखोद्गार स्थानिक सरकारच्या उदारपणाला शोभण्यासारखे होते.

प्रोफेसर छत्रे यांच्या सर्कशीचे खेळ कालपासून येथें सुरू झाले आहेत त्याच प्रमाणें एका सिनेमेटोग्राफ कंपनीचे ही खेळ दररोज होत असतात.

**शर्यती** — गेल्या वर्ष प्रतीपदेच्या मुहूर्तावर बैलाच्या व घोड्याच्या शर्यती उमरावती येथें होऊन विजयी बैलवाल्यास व घोडेवाल्यास बक्षीसें देण्यांत आलीं. ही गोष्ट इतरत्र अनुकरण करण्यासारखी आहे.

---


## जाहिरनोटीस

दौलत वा॥ तुकाराम पाटील हल्लीं काम कर्ता पटवारि रा० चावर पोष्ट मराडखेड ता० बळगांव जि० बुलढाणा

यांस—

मी खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते का तुह्मी माझे गंधर्वाचे नवरे असून तुह्मी मजला चार वर्षे होत आली तेव्हांपासून घेऊन जात नाहीं व अन्न वस्त्रही देत नाहीं सबब कळविते कीं तुह्मास नोटीस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत माझे चार वर्षाचा अन्नवस्त्राचा खर्च रुपये २४० माझे माईस देऊन घेऊन जावे अगर न नेल्यास तुह्मी मजला फारकत दिली समजून मी दुसरा घरठाव करीन. वरील रुपयासंबधान दिवाणी कोर्टांत दावा केला जाईल. ही नोटीस लिहून दिली सही ता० १९।३।१९ इ०
मुक्काम कोर्ट अकोला फौजदारी

सही

सहीची नि० सरी मर्द दौलत पाटील इची

नो० नं० १०२


---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारयण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४९ ] आकोला——सोमवार तारीख २९ माहे मार्च सन १९१५ ई० [ अंक १२

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........२ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस मुबाच्य असली पाहिजे.
सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. मागुदें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक, आकोला २।९।०९ — J. G. Ridland. एजंट

नो. नं २

### केशराचें फूल मुफ्त

पवित्र केशर ।।।=शुद्ध शिलाजित ।। असली कस्तूरी २४ मशिरतिनती ३ खालिस हींग ८= तो० सुंदर कामदार शाल ३ वं

$3\frac{1}{2}+1\frac{1}{2}$ गज ६ डो १०

कारगीर स्टोर्स श्रीनगर नं० १२

नो० नं० ८

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं रु. १।८.

बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इमली औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुनली खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ९

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठ मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊ.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ५ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यांत श्रीशंकराचार्य, शंकरानंद, व विद्यारण्य यांचे उपनिषदांवरील भाष्य, आत्मपुराण व अनुभूतिप्रकाश हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास 'वैशेषिक दर्शन' बक्षीस.

सनातन वैदिक धर्माचें, तत्त्वज्ञानाचें व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें——

### आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयांशिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथें यांचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधी प्रश्नांचीं समर्पक उत्तरेंही दिलीं जातात नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट,
२४१ सदाशिव पेठ पुणें.
नो० नं० ३

### नोटीस

नोटीस बेशमी शंकर अण्णाजी महाजद्धे रहणार नांदुरा हल्लीं मुक्काम आकोला.

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्माला आह्मी आमचे तर्फे कोर्टाचे कामाकारितां जनरल मुखत्यारपत्र देऊन नेमलें होतें. आतां तारीख २३।१२।१९१४ इ. पासून तुह्मास नौकरी वरून कमी केलें आहे व तेव्हांपासून तुह्मी आमचे कामावर नाहींत त्या दिवसापासूनच तुमचे मुखत्यारपत्र रद्द झालें असून तुह्मांस आमचे तर्फे कोणतेंही काम करण्याचा अधिकार ता० २३।१२।१४ पासून राहिला नाहीं. तुमचे जवळ आमचे दुकानचें सर्व प्रकारचे (कोर्टाचे) जे कांहीं कागद असतील ते आह्मांस आणून द्यावें व आमचे कामाची माहिती सर्व आह्मास समजाऊन द्यावी याबद्दल अनेकवेळां तुह्मांस सुचविलें असून तुह्मी आजपर्यंत तसें केलें नाहीं मध्यंतरी आपण पुढें येथून आल्यावर सर्व समजून देतो असें झालेंही होतें त्यांस आज सरासरी दोन महिने झाले परंतु आपण अजून माहिती देत नाहीं त्यामुळें आमचें नुकसानी होत आहे तसेंच पुर्वीं तुमचे भरंवशावर असल्यामुळें तोपर्यंतचें आमचे कांहीं नुकसान झालें असल्यास व आमच्या कामाची माहिती व कागदपत्र तुह्मी न समजून दिल्यामुळें त्यापुढें ही आमचे कांहीं नुकसान झाल्यास त्याची सर्व जबाबदारी तुमचेवर आहे. ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत आमचे सर्व कागदपत्र आह्मास देऊन सर्व प्रकारचे (कोर्टाचे) कामाची माहिती आह्मास द्यावी व आमची पावती घ्यावी तसें न केल्यास व आमचे कांहीं कमी जास्त (नुकसान) झाल्यास त्याबद्दल तुह्मास जबाबदार धरलें जाईल व कायदेशीर तजवीज केली जाईल. ता० १९-३-१५

सही मारवाडींत
दीपचंद रूपचंद नांदुरा हल्लीं
मु० आकोला द० खु०
नो. नं. १०३

### जाहीर नोटीस

खालीं सही करणार यांजकडून या जाहीर नोटीसीनें कळविलें जात आहे कीं गोविंद शिवाजी बजबाळ रा० साकेतवाड प्र० व ता० मुर्तिजापूर जि० आकोला यानला मी दिलेलें कुलमुखत्यारपत्र रद्द केलें आहे तरी त्यानकडून कोणतेंही प्रकारचें माझे नांवचे सहीचा लेख करून घेऊ नये घेतल्यास तो रद्द समजला जाईल. त्याचा जबाबदार मी राहणार नाहीं ता० १३।३।१९१५ इ० द० माधवराव रामचंद्र पी० रा०

सही
सीताराम वा। चिमनाजी
चव्हाण कुणबी रा०
रामतीर्थ ता० दर्यापूर
नि० खु०

नो० नं० १०४

### नोटीस.

नोटीस बेशमी हुसेनखां वा। छोटूजी रंगरेज रा० कोसळ ता० सांबर नि० सवाई जयपूर,

यांस

खालीं सही करणार नोटीस देते कीं सुमारें ११ वर्षापूर्वी तुमचा माझ्याशीं निका झाला. त्या वेळेस माझेभावानें आपल्या पदरचे २०० दोनशें रुपये खर्चून तुह्मास घर जावई ह्मणून ठेऊन घेतलें. व तुह्मी तसें राहण्याचे कबुलीबद्दल १ एक रुपयाचे कागदावर करारनामाही लिहून दिला. पुढें तुह्मी दोनचार जणाचे मसलतीनें मला टाकून पळून जाऊन तिकडे देशांत तुह्मी दुसरें लग्न केलें असें कळतें वरून तुह्मास नोटीस देते कीं ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसांत तुह्मी टाकून गेले दिवसापासूनचा पोटगी खर्च दरमहा ५ रुपये प्रमाणें शिवाय माझे माहेरचा हक्क १२५ सवाशे रुपये ह्या दोन्ही रकमा आणून मला देऊन येथें राहून नांदावें. नाहींपेक्षां वरील मुदतींत असें न झाल्यास नोटीस हीच फारकती समजून मी दुसरा निका करीन व मग तुमचा कोणतेच प्रकारचा हक्क मजवर अगर निका लावणारावर चालणार नाहीं. कळावें. तारीख १८ माहे मार्च १९१५

सहीचा निशाणी आंगठा
नूरी मर्द हुसेनखां रंगरेज राहणार
खामगांव हिवाखुर्द
नो० नं० १०५

### नोटीस

नोटीस बेशमी अबदुलगनी वा। अबदुल गफूर राहणार मुर्तिजापूर

यांसः—

या लेखानें कळविण्यांत येते कीं तुह्मास तारीख १८-३-१९१५० रोजीं दिलेली नोटीस ता० २२।३।१५ चे वऱ्हाडसमाचारांतून तुह्मास पावली. त्या नोटिशी प्रमाणें तुह्मी वागले नाहीं. व त्यामुळेंच नोटिशींत दिलेली सहा महिन्याची मुदत रद्द केली

आहे. नोटिस पोहचल्यापासून तर तुह्मी फारच मोगलाई लाविली आहे. सबब तुह्मास बेवारस केले आहे. तुह्मी घरांत राहिल्यानें घरचीं माणसें बदलून जातील व अमीरबी मर्द अबदूल गफूर हिनें खिजमत न केल्यास व आमचे ह्मणणें न ऐकल्यास तिचाही कोणतेच तऱ्हेचा हक्क राहणार नाहीं व जो कोणी तुह्मां उभयतांस कर्जपाणी देईल तर तें माझे इस्टेटीस लागू होणार नाहीं व त्याचा मी जबाबदार राहणार नाहीं. तसेच तुह्मी ३ दिवसांत घर सोडून निघून जावे. न निघाल्यास फौजदारी करण्यांत येईल कळावें. तारीख २२। ३। १९१५ इसवी

सही

दस्तखत अबदुलगफूर वा॥ शेखचांद

दस्तूरखुद्द रा० मुर्तिजापूर

नो० नं० १०६

## नोटीस

रा० रा० बापुजी वा॥ गुणाजी जात माळी राहणार तपवन ता० मंगरूळपीर जि० आकोला

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं शको गुणाजी माळी हा माझा लग्नाचा नवरा असून तो आज सुमारें ४ वर्षें झालीं फरारी झालेला आहे. तरी तपास करितां तपास लागत नाहीं. आपण त्याचे भाऊ आहांत आपण त्याला ४ महिन्याचे आंत शोधून काढावे न सांपडल्यास मला जाती रिवाजाप्रमाणें पुनर्विवाह करावा लागेल कारण आज ४ वर्षें मी माझें बापाचें घरीं आहे व माझे तरुणपण फुकट जात आहे. वरील मुदतीचें आंत माझे नवऱ्याचा तपास न लागल्यास हीच माझी फारकत समजून मी दुसरा नवरा करीन. मी जो दुसरा नवरा करीन त्याचे वरती तुमचा व माझ्या नवऱ्याचा कोणत्याहिप्रकारचा हक्क अगर दिवाणींत दावा चालणार नाहीं. ता० २२।३।१९१५

सही

मनुकी मर्द शकोजी माळी हल्लीं

रा० तऱ्हाळ ता० मंगरूळपीर

जि० आकोला पोष्ट तऱ्हाळ

हातची बांगडी

नो० नं० १०७

## नोटीस

नोटीस बेशमी गोविंद शिवाजी जवजाळ जात कुणबी रा० मौजे साळतवाड प्र० व ता० मुर्तिजापूर जि० आकोला.

यांसः—

खालीं सही करणार याजकडून या नोटीसीनें कळविण्यांत येत आहे कीं तुह्मास मी ता० २।१२।१९१४ इ० रोजीं कुलमुखत्यारपत्र लिहून देऊन नोंदून दिले. ते आपण ता० ७।१२।१९१४ इ० रोजीं त्यालगत लिहून दिले कीं मी मुखत्यारपत्रावरून तुमचे काम करण्यास इच्छित नाहीं सबब मुखत्यारपत्र परत दिलें आहे असे स्वदस्तुराचे सहीनें लिहून दिले आहे ते मी परत घेऊन या नोटीसीनें ते दिलेले मुखत्यारपत्र रद्द केलें आहे. तरी आतां तुह्मी आमचे कोणतेही काम कुलमुखत्यारपत्रांत लिहिले प्र० करू नये. केल्यास तें रद्द समजलें जाईल त्याचा जबाबदार मी राहणार नाहीं कळावे. ता० १६ माहे मार्च सन १९१५

इ. द० माधव रामचंद्र पि० रा०

सही

सीताराम वा॥ त्रिमराजी

चव्हाण जात कुणबी रा०

रामतीर्थ जि० खु०

नो. नं. १०८

## अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० प्रेग्रनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ०८ व्हीपीनें ०१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्ही. पी रु० १०२




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत

पत्ता—बेंद्र आणि कंपनी पुणें सिटी

नो. नं. ७

## मुद्दाम अनुभवाकरिता.

दिलखुषमलम— तमाम त्वचा रोगांवर चालणारा— १ मनुष्यापुरतें औषध किं० १॥ आणा. असल कर्पुरार्क— किं० २ आणे केशनाशक अप्रतिम पूड किं. २ आणे कर्णबिंदू — कानाचा विकार १ दिवसांत गुण ३ दिवसांत फायदा होतो. किं० २ आणे मेंथालार्क किं० १ आणा.

## अनंगविलास

गोळी. अत्यंत धातुस्तंभक व पौष्टिक १ दिवसांत गुण दाखविते, किं० २ आणे “ ४ गोळ्या ” दंतमंजन— ३ दिवसांत गुण किं० २ आणे. विंचवावर प्रतिज्ञेचें औषध किं० ८ मनुष्या पुरत्या औषधाची ३ आणे. नेत्रांजन— डोळ्याचे विकारावर— साधारण, लाली, खुपरी, पाणिगळणें, आग यावर किं० २ आणे. दम्यावर— प्रतिज्ञेनें १ दिवसांत गुण देणारे व ७ दिवसांत पूर्ण फायदा देणारे औषध किं० ४ आणे. शीत्ता पित्तामुळें आंगावर गांधी व खाज अतिशय येत त्यावर ३ दिवसांत गुण देणारे किं० २ आणे. उपदंशरिपु— प्रमेह, उपदंश यावर ३ दिवसांत फायदा व ७ दिवसांत पूर्ण गुण देणार औषध किं० १ रुपया दिलबहार— सुपारी— १ चिमटी विड्यांत घेतांच, अजिर्ण, अमांशयांचा नाश होऊन झाडा साफ होतो, भूख खुलते किं० १ आणा, तंबाखु रंजनवटी— अत्यंत सुवासीक व कडक तंबाखुची गोळी २० किं० २ आणे. निदान ८ आण्याचा माल मागवावा. व टिकिटाचे रुपानें पोस्टेजसह रकम आगाऊ यावी. १ रुपयाचे आरडरीसही अट नाहीं. व्ही. पी. नें पाठवूं.

मुळे एन्ड सन्स नांदुरा

नो० नं० ९

वऱ्हाडसमाचार

मिति चैत्र शुद्ध १३ शके १८३७

## हिंदुस्थानच्या संरक्षणाचा कायदा.

हे नाव ऐकून वाचकांची अशी समजूत होण्याचा संभव आहे कीं या कायद्याचा हिंदुस्थानच्या सैन्याची वृद्धी करणें व आरमार ठेवणें वगैरे गोष्टींशीं कांहीं संबंध असेल. पण तसें कांहीं नाहीं. दिल्ली येथें गेल्या आठवड्यांत जो हा कायदा पास झाला त्याचा उद्देश इतकाच आहे कीं लढाईच्यावेळीं गुप्त बातम्या फोडणें, सैन्यांत शिपायांची भरती करण्याचे कामीं अडथळा उत्पन्न करणें, खोट्यानाट्या गप्पा उडवून लोकांच्या मनांत अस्वस्थता उत्पन्न करणें वगैरे ज्या कित्येक गोष्टी कित्येक उपद्व्यापी मंडळी करीत असते त्यांना धाक बसावा व प्रतिबंध व्हावा. सध्याच्या प्रसंगीं अशा कायद्याची खरोखर फार अवश्यकता होती व ह्मणून तो पास झाल्याबद्दल कोणाही विचारी माणसास संतोषच वाटेल. इंग्लंडचे लोकांना उच्चार स्वातंत्र्याची अतिशय आवड असताही त्यांनीं अशा तऱ्हेचा कायदा मुकाट्यानें कबूल केला. तेव्हां हिंदुस्थानांतही त्याला कोणी हरकत घेणार नाहीं असें आह्मांस वाटतें. शिवाय हा कायदा कायमचा नाहीं. लढाईपुरता व लढाई संपल्यानंतर फक्त सहा महिनेपर्यंत राहणारा आहे, असें सरकारनें स्पष्ट ह्मटलें ही आहे. या कायद्याप्रमाणें शत्रूशीं संबंध ठेवणारे, ब्रिटिश जहाजांना नुकसान पोंचविणारे, किंवा पोंचविण्याची इच्छा धरणारे, खोट्या कंड्या पिकविणारे, तारा तोडण्याची किंवा कारखानें बंद पाडण्याची इच्छा करणारे, व सैन्याला हानि पोंचेल अशी इच्छा धारण करणारे गुन्हेगार ठरून त्यांची चौकशी तीन कमिशनरांचे समोर करण्यांत येईल. हे कमिशनर अर्थात न्यायाचे कामांत वाकबगार असे असतील, व त्यांनीं दिलेल्या निकाला-वर अपील चालणार नाहीं. सध्याचा प्रसंग विलक्षण स्वरूपाचा असल्यामुळें असल्या विलक्षण स्वरूपाच्या कायद्याचा अवश्यकता वाटत आहे. पण शांततेचा काळ प्राप्त होतांच या कायद्याची बोळवण होणार असल्यामुळें आह्मी या कायद्याचें मनःपूर्वक स्वागत करतों. इंग्रजसरकार चलनें आहे. तें आतां आपल्या सरकारी इमारती विकून पैसे गाठीस बांधून पलायन करण्याचा विचा-रांत आहे अशा लोकांना निष्कारण घाबरवून सोडणाऱ्या कंड्या पिकविणारांना या कायद्यानें चांगली दहशत बसेल, व सध्याचेकाळीं ती बसणें अत्यंत इष्टच आहे. अशा कायद्याला कौन्सिलांत ना० सुरेंद्रनाथ ब्यानरजी हे खेरीज करून बाकी सर्व लोकनियुक्त व सरकारी सभासदांची संमति मिळाली हें पाहून आह्मांस संतोष वाटतो.

## जर्मन क्रूझर बुडविलें.

एमडेन सारखेंच फॉकलंड बेटाकडे धुमाकुळ घालणारें ड्रेसडेन नावाचें क्रूझर गेल्या आठवड्यांत ब्रिटिशांनीं बुडविल्याची आनंददायक खबर आली आहे. या क्रूझरनें कांहीं महिन्यांपूर्वीं बराच उत्पात केला होता. मध्यंतरीं शत्रु आपला पाठलाग करीत आहे असें पाहून तें कोठें दडी देऊन बसलें होतें. पण अखेरीस त्याच्या पापाचा घडा भरून तें आतां जलसमाधी घेऊन बसलें आहे. रशियांत व फ्लँडर्स-मधील समरभूमीवर होणारे जर्मनीचे पराभव व एमडेन आणि ड्रेसडेन यांसारख्या क्रूझरांचा नाश या गोष्टी जर्मनीचा विनाशकाळ समीप ठेपल्याचें सुचवीत आहेत.

## जर्मनींतले हिंदी विद्यार्थी,

पाटणा येथें प्रसिद्ध होणाऱ्या पाटलीपुत्र नांवाच्या हिंदी पत्राचा विलायतचा बातमीदार लिहितो कीं आक्सफोर्डहून जर्मनींत गेलेल पुष्कळ हिंदी विद्यार्थी सध्यां लढाईमुळें जर्मनींत अडकून पडले आहेत. त्यांना आपलें गांव सोडून १० मैलापर्लीकडे परवानगीवांचून जातां येत नाहीं. खुद्द जर्मन लोकांना सुद्धां हा नियम लागू आहे. जर्मनींत अडकून पडलेले विद्यार्थी सुमारें १५० आहेत. त्यांपैकीं ज्यांना घराहून खर्च येत नाहीं, अशांना जर्मन सरकारकडून दरमहा ९९ रुपये पोटगी खर्च ह्मणून मिळत असतो. त्यांचा विद्याभ्यास चालूच आहे. अशा विद्यार्थ्यांना कॉलेजातली फी सुद्धां माफ करण्यांत आली आहे. यांपैकीं कित्येक हे इंग्रज सरकारचे हेर असावेत अशी शंका आल्यावरून कैद होऊन पडले आहेत. बाकीचे सुखरूप आहेत. त्यांच्या विषयीं घरच्या माणसांनीं काळजी करण्याचें कारण नाहीं.

## रंग पालटत चालला.

थोडे दिवसांपूर्वीं हिंदी विद्यार्थ्यांसंबंधानें व सामान्यतः एकंदर हिंदी लोकांसंबंधानें विलायतच्या लोकांचीं मनें इतकीं कलुषित झालीं होतीं कीं हिंदी विद्यार्थ्यांना युनिव्हर्सिटींत मज्जाव, हिंदी लोकांना कारखान्यांत मज्जाव, काळ्या लोकांना गोऱ्याच्या क्लबांत सुद्धां मज्जाव, असा सर्वत्र मज्जाव असे. पण प्रस्तुतच्या लढाईत हिंदुस्थाननें जी राजनिष्ठापूर्वक मदत केली तिचा तिकडील लोकांच्या मनावर इतका परिणाम झाला आहे कीं आतां हिंदी लोकांचा सर्वत्र सत्कार होत आहे. एका हिंदी माणसाला तिकडे रिक्रूटचर मुख्य सार्जंटची जागा मिळाली आहे. हिंदी विद्यार्थ्यांसाठीं कॉलेजाचीं द्वारं खुलीं झालीं आहेत. गुरखे, शीख वगैरे शिपाई जातील तिकडे त्यांचा जयजयकार होत आहे.

फार काय, पण यंदाचे वर्षी नॅशनल लिबरल क्लबमध्ये सुद्धां हिंदी गृहस्थांचा शिरकाव झाला आहे.

## निवडक वर्तमानें

मुंबई युनिव्हर्सिटी व्हाइस चान्सेलराचे जागीं सरफेरोजशहा मेथा यांची नेमणूक झाली आहे.

कलकत्त्यास कायदेकौन्सिलाचे बैठकीचेवेळीं ना. गव्हर्नर साहेबांच्या गैरहजिरींत त्यांचें ह्मणजे अध्यक्षाचें काम करण्याचा अपूर्व योग ना. नबाब शमसुल हुदा यांस प्राप्त झाला होता. गव्हर्नराचें काम करण्याचा प्रसंग हिंदी गृहस्थाला हा पहिलाच. ना. गोखले यांच्या जागीं वरिष्ठ कायदेकौन्सिलांत ना. मेतकवाड यांची नेमणूक झाली.

सोमवार ता. ७ रोजीं दक्षिणेंत वाई, गुहागर वगैरे काहीं ठिकाणीं धरणीकंप झाले.

सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीच्या मदतीसाठीं मद्रास येथें सभा झाली. तींत ८००० रुपयाचे आंकडे जागचे जागीं पडले. वसूल किती झाले?

सर्व हायस्कुलांतून देशी भाषांच्या द्वारें शिक्षण देण्यांत यावें असा ठराव वरिष्ठ कायदेकौन्सिलापुढें लवकरच यावयाचा आहे.

मु. खारेपाटण येथील रा. जांभेकर नांवाचे गृहस्थ आपल्या देशांतील सर्व ठळक ठळक गृहस्थांच्या जन्मतिथि व पुण्यतिथि यांचे उत्सव करीत असतात. प. वा. बाळशास्त्री जांभेकर, मंडलीक, आगरकर, प्रो देसाई, तेलंग, रानडे, यांच्या पुण्यतिथि व रा. ब. महाजनि, भांडारकर, सर भालचंद्र, इ. गृहस्थांच्या जन्मतिथीचे दिवशीं त्यांनीं उत्सव केले.

बंगाल्यांत डाके फार पडतात ह्मणून संरक्षणासाठीं बंदुका बाळगण्याची परवानगी तेथील सरकारनें कांहीं निवडक लोकांना दिली आहे. पण अट अशी घातली आहे कीं बंदुक उडविण्यासाठीं त्यांनीं लष्करीतून पेनशन घेतलेल्या एखाद्या शिपायास त्यांनीं नोकरीस ठेविलें पाहिजे.

पूर्वी आपल्या देशांत शेंखाच्या बांगड्या बायकांनीं भरण्याची चाल होती बंगाल्यांत अद्यापही ती आहे. कांचेच्या बांगड्या केव्हांपासून प्रचारांत आल्या तें कळत नाहीं.

आपल्या देशांत बायकांनीं नाकांत नथ घालण्याची चाल नव्हती. पूर्वीच्या वाङ्मयांत नथेचा कोठेंही उल्लेख सांपडत नाहीं.

बंगाल्यांत अराजकता व अत्याचार यांच्या प्रसारास आळा घालण्याचे उपाय योजण्यासाठीं ना० सुरेंद्रनाथ ब्यानरजी यांच्या अध्यक्षत्वाखालीं एक सभा भरली होती.

बडोद्यास पंडिताचें कान्फरन्स भरलें होतें. संस्कृतविद्या व पाश्चात्यविद्या यांचें योग्य संमिश्रण करण्याचें तेथील महाराज यांनीं मनावर घेतलें आहे.

## कोठें तरी चुकतें आहे.

हिंदुस्थानांत शिक्षणाचा प्रसार अधिकाधिक व्हावा अशी अमचे परमपूज्य बादशहा पांचवे जार्ज यांनीं आपली इच्छा स्पष्टपणें बोलून दाखविली आहे. त्या इच्छेनुरूप हिंदुस्थान सरकारनें शिक्षणाप्रीत्यर्थ मोठाल्या रकमा ही प्रांतिक सरकारांना दिल्या आहेत. असें असतां शिक्षणाचें पाऊल बंगाल व मद्रास या दोन इलाख्यांत कसें मागें पडत आहे तें नुकतेंच आह्मी एका अंकांत दाखविलें होतें. आज बहार प्रांतांतून ही अशीच ओरड ऐकूं येत आहे. पाटणा येथें प्रसिद्ध होणारें बिहारीपत्र ह्मणतें कीं त्या प्रांतांत हायस्कुलांची संख्या कमी झाली आहे. मिडल स्कुलें व प्राथमिक शाळा यांचीही तीच तक्रार आहे. त्यामुळें लोकांत असंतोष उद्भवूं पाहत आहे. यावरून शिक्षण विषयक धोरणांत कोठें तरी चुकत असलें पाहिजे हें उघड आहे. हा असंतोष वाढूं देणें कोणत्याही प्रकारें इष्ट नसल्यामुळें ना. लॉर्ड हार्डींग साहेब या गोष्टीच्या मुळाशीं जाऊन चौकशी करतील तर खरा प्रकार उघडकीस येऊन त्यांनीं आपल्या कारकीर्दींत करून ठेविलेल्या अनेक सत्कृत्यांत भर पडेल व हिंदुस्थानच्या अवनतीचें भय दूर होईल अशी आह्मी आशा करतों.

## साहित्य संमेलन.

यंदा मे महिन्यांत मुंबई येथें भरणाऱ्या साहित्य संमेलनाचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याविषयीं मिरज संस्थानचे अधिपति सर गंगाधरराव बाळासाहेब पटवर्धन यांस महाराष्ट्र साहित्यपरिषदेकडून विनंति करण्यांत आली होती. ती त्यांनीं मान्य केली असल्याचें आह्मांस खाजगी पत्राच्या आधारें कळतें. सरसाहेब स्वतः लेखक व शास्त्रीय विषयाचे व्यासंगी आहेत. त्यांचें भाषण त्यांच्या या व्यासंगाला अनुरूप असेंच होईल व मराठी वाङ्मयांत शास्त्रीय ग्रंथांची जी मोठी उणीव आहे ती भरून काढण्याचे व्यावहारिक मार्ग ते सुचवितील अशी आशा करणें अप्रासंगिक होणार नाहीं. महाराष्ट्रपरिषदेनें केलेली अध्यक्षाची निवड सर्वथा योग्य आहे असें आह्मांस वाटतें.

## वऱ्हाडांतली रेलवे

धामणगांवपासून यवतमाळपर्यंत, आकोल्यापासून हिंगोलीपर्यंत, आणि आकोल्यापासून खांडव्यापर्यंत रेलवेचे रस्ते तयार करण्याची परवानगी खाजगी कंपन्यांनीं मागितली होती काय असा प्रश्न ना० सर कस्तुरचंद डागा यांनीं कौन्सिलांत विचारला होता. त्याला 'नाहीं' असें उत्तर मिळालें. त्याचप्रमाणें या रेलवे लवकर तयार करण्यासंबंधानें हिंदुस्थान सरकारला घाई करण्याचें ही सरकारनें नाकारलें. खांडवा— आकोला— हिंगोली रेलवे संबंधानें रेलवे बोर्डाशीं पत्रव्यवहार झाला होता, पण सध्याच्या युद्धप्रसंगामुळें त्या संबंधांत रेलवेबोर्डाला पुनः लिहिणें योग्य वाटत नाहीं असें सांगण्यांत आलें

## मध्यप्रांताचें कौंसिल.

ता० १३ मार्च रोजीं नागपूर येथें बजेटच्या व इतर कामासाठीं भरलेल्या कायदे कौंसिलाच्या कामाचा जो रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे तो सध्याच्या स्थितींत अतिशय बोधप्रद आहे. बजेटावर बिनसरकारी मेंबरांनीं घेतलेल्या शंका जरी अप्रासंगिक नव्हत्या, तरी सरकारी अधिकाऱ्यांनीं खुलासा केल्यानंतर प्रस्तुत प्रसंगाकडे लक्ष देऊन बहुतेकांनीं आपापले ठराव माघारी घेण्यात मोठें चातुर्य व शहाणपण व्यक्त केलें असें ह्मटलें पाहिजे. आरंभीं ना० चीफ कमिशनर साहेबांनीं सर आर्थर ब्लेनार हासेट यांच्या मृत्युबद्दल शोकप्रदर्शित केला. सर आ० ब्लेनारहासेट हे मध्यप्रांतांतील एक मोठे अधिकारी असल्यामुळें हें दुःखप्रदर्शन अवश्यच होतें. प० वा० ना० गोखले यांची गोष्ट तशी नसतांही त्यांच्या मृत्युबद्दल योग्य व सढळ शब्दांनीं दुःखप्रदर्शन करण्यानें मृत व्यक्तीविषयींचा परमादर व्यक्त होऊन त्याच्या बरोबर सरकारी अधिकाऱ्यांचे ठायीं असलेली गुणग्राहकताही व्यक्त झाली. सरकारी अधिकाऱ्यांचे कृत्यावर अतिशय कडक पण रास्त टीका करणारे त्यांना अप्रिय असतात अशीं पुष्कळांची चुकीची समजूत आहे, ती यानें दूर होईल, आणि बिनसरकारी सभासदांना ना० गोखले यांच्या पाऊलवाटेनें जाण्यास उत्तेजन येईल. बजेटांतल्या निरनिराळ्या बाबींवर झालेला वाद अतिशय नेमस्त स्वरूपाचा झाला. हल्लींच्या युद्धासारख्या प्रसंगीं एकेक पै एकेका रुपयाच्या योग्यतेची आहे. अशावेळीं सरकारी अधिकाऱ्यांची संख्या वाढविणें, त्यांच्या भत्त्यांत वृद्धि करणें, त्यांच्यासाठीं बंगले बांधणें वगैरे कामांकडे सरकार मोठाल्या रकमा खर्च करीत आहे, आणि तेच लोकांच्या शिक्षणाकडे खर्च करण्यासाठीं वरिष्ठ सरकारानें उदारपणें दिले त्या रकमा ही सरकारच्यानें खर्च करवत नाहींत, असा सरकारच्या वर्तनांत दिसून येणारा विरोध कोणत्याही दृष्टीला क्षणभर कुठेंत केल्यावांचून राहणार नाहीं. या मुद्यावर बिनसरकारी अधिकाऱ्यांनीं आक्षेप घेण्यास जागा होता, व त्याप्रमाणें आक्षेप घेण्यांत ही आले, व सरकारी अधिकाऱ्यांनीं त्यावर खुलासा ही केला, पण स्पष्टपणें बोलावयाचे ह्मणजे सदर अधिकाऱ्यांनीं दिलेलीं उत्तरें समाधानकारक नव्हतीं असेंच ह्मटलें पाहिजे. तथापि बिनसरकारी सभासदांनीं आपापले ठराव परत घेतले. यांत त्यांनीं नेमस्तपणाचा थोडासा अतिरेक केला असेंच पुष्कळांना वाटण्याचा संभव आहे. उदाहरणार्थ एक्साईज खात्याचें उत्पन्न युद्धामुळें यंदावेळेस ८ लक्ष कमी होईल असा बजेटांत अंदाज केला असून त्या खात्याची सुधारणा करण्यासाठीं ह्मणून खर्चांत वाढ केली आहे. वऱ्हाडांतल्या गुरांच्या चराईचे दर कमी करण्याकडे लक्ष ठेऊन फारेस्टचे उत्पन्नाचा अंदाज कमी धरावा अशी ना० मुधोळकर यांच्या योग्य सूचनेला उत्तर देतांना जे अधिकारी लढाईच्या खर्चाची सबब पुढें आणतात, तेच सध्याच्या लढाईच्या वेळीं वरच्यासारख्या अनवश्यक गोष्टींत खर्चाची वाढ करतात हें आश्चर्य नव्हे काय? या बाबतींत सरकारी रिपोर्टांतले आंकडे पुढें मांडून ना० रा० ब० मुधोळकर यांनीं आपले मुद्दे फार चांगल्या रीतीनें मांडले होते व गुरांच्या चारी दरापासून रयतेला कसा त्रास होतो याचें ह्मणदार चित्र आपल्या भाषणांत मांडलें होतें. पण त्यांचे आंकडे चुकले आहेत अशी सबब सांगून त्यांना गप्प बसविण्यांत आलें! तसेंच सध्या खर्चांत काटकसर करण्याची अत्यंत अवश्यकता आहे अशावेळीं सरकारी अधिकाऱ्यांच्या भरपाच्या रकमांना कातरी लावणें योग्य आहे असें रा० ब० नीं ह्मणतांच त्यांना उत्तर ह्मणून हिंदुस्थानसरकारच्या हुकुमाकडे बोट दाखविण्यात आलें. पण याच्या उलट शिक्षणासाठीं हिंदुस्थानसरकारांनीं दिलेल्या रकमा पुन्हा खर्च कां करीत नाहीं असें विचारतांच या रकमा कशा खर्च करावयाच्या तें ठरलें नाहीं, सबब त्या शिलकेंत टाकणें जरूर आहे असें ही सांगण्यांत आलें. रयतेच्या शिक्षणाचें लोकांना जेवढें महत्त्व वाटतें तितकें सरकारी अधिकाऱ्यांना वाटूं लागण्याचा सुदिन अद्याप आला नाहीं हें पाहून कोणाला खेद वाटणार नाहीं? सध्याचा प्रसंग लक्षांत घेऊन सहकारी मंडळ्यासाठीं स्पेशल डयुटीवरच्या अधिकाऱ्याच्या पगारांत १९००० रु० ची बचत करण्याची ना० मि० केळकर यांची सूचना गैरवाजवी नव्हती असें सर्वांनांही ह्मणेल. पण सरकारला ती आवडली नाहीं, आणि ना० मि० केळकर यांना आपला ठराव माघारा घेणेंच युक्त दिसलें. फार काय पण छिंदवाडा येथील मालगुजाऱ्याच्या बगीचावर होणारा १००० रुपयांचा ज्यादा खर्च कमी करण्यास ही सरकारी अधिकारी तयार झाले नाहींत. सध्याच ज्यांची जरुरी नाहीं असे बंगले बांधण्यापेक्षां ते पैसे अर्धे वऱ्हाडांत व अर्धे मध्यप्रांतात रस्ते व सडका करण्याकडे खर्च करावे अशी ना० रा० ब० मुधोळकर यांची सूचना बहुतांचें महत्तम हित या दृष्टीनें विचार करता अत्युत्तम होती. कारण बंगल्यापासून फार तर पांच चार ऑफिसरांची सोय होईल, पण सडका केल्यानें हजारो लोकांची सोय होऊन व्यापारवृद्धीला ही मदत झाली असती, सुदैवानें हा ठराव अंशतः मान्य करण्यात आला. बजेटाच्या बाबतींत अशी पुष्कळ घासघीस झाल्यावर देवी टोचण्याविषयींच्या कायद्यांत दुरुती करण्याबद्दलचें बिल पुढें आलें. यावेळीं तर एक मोठीच मौज झाली. या बिलावर चर्चा चालली असतांना ना० मि० शिवप्रसाद यांनीं देवी टोचण्यापासून खरोखर फायदा होतो कीं काय अशी शंका काढली व बिलाला विरोध केला. खरें ह्मटलें असतां ना० मि० शिवप्रसाद यांनीं काढलेली शंका कांहीं निराधार नव्हती. तिला अनुभवाचें व शास्त्रज्ञानाचें ही पाठबळ होतें. एकदा देवी टोचल्या नंतर पुनः अंगच्या देवी आल्याचीं व त्या देवी मुळें लोक आंधळे झाल्याची किंवा मेल्याची ही उदाहरणें लोकांच्या अनुभवांत आहेत. इंग्लंड, जर्मनी, अमेरिका वगैरे सुधारलेल्या व शास्त्रज्ञांत प्रगति झालेल्या देशांत ही देवी टोचण्याच्या क्रियेस अपायकारक समजणाऱ्या शास्त्रज्ञांच्या मंडळ्या आहेत; व

ही गोष्ट सरकारी मेंबर ना० कर्नल डेनिस यांनाही ठाऊक आहे. असें आहे तर कायदेकौंसिलांत एखादानें त्या शंकेचा उच्चार केल्याबरोबर ना० कर्नल डेनिस यांना ती गोष्ट 'अब्रह्मण्यम्' 'अहो शांतं पापं' अशी कां वाटावी तें कळत नाहीं. कायदे कौंसिलांतच काय, पण खुद्द गव्हर्नराच्या जागेवर ही देवी टोचण्याच्या विरुद्ध असलेल्या माणसाची नेमणूक होऊं शकते ही गोष्ट ना० कर्नल डेनिस यांस ठाऊक नाहीं काय? देवी टोचण्याच्या विरुद्ध सुधारलेल्या देशांत चांगले मोठाले शास्त्रज्ञांचीं वचनें असतां हिंदुस्थानांत देवी टोचण्याविषयीं सक्ती करण्याविषयींचें बिल पुढें यावें व त्या बिलावर चर्चा करतांना कोणी त्याविरुद्ध म्र कादल्यास सरकारी अधिकाऱ्यांना कांहीं तरी विलक्षण वाटावें हें कशाचें लक्षण समजावयाचें? असो. मध्यप्रांताला मिळालेल्या कायदे कौंसिलाच्या पाहिल्याच बैठकीच्या वादविवादांत असे प्रकार घडून येणें अपरिहार्य होतें. मुंबईसारख्या इलाख्यांतून अनेकवर्षे कायदे कौंसिल अस्तित्वांत असतां ही परवापर्यंत असे प्रकार घडत आले आहेत. तथापि कालांतरानें अनुभव येईल तसतशी सरकारी अधिकाऱ्यांचे अंगीं अधिक सहिष्णुता व लोकनियुक्त मेंबरांच्या अंगीं रास्तपणाचा थोडासा अधिक विशदपणा आणि निकटी हे गुण येतील, आणि लोकमताला कायदे कौंसिलांत अधिक मान मिळून सरकारी अधिकारी व लोकनियुक्त सभासद यांच्यांत परस्परांविषयीं अधिक गुणग्राहकता व सहकारित्व दिसून त्याचा इष्ट परिणाम राज्यकारभारावर घडून ब्रिटिशराजसत्तेचा अधिक चिरस्थायित्व येईल अशी आह्मांस उमेद आहे.

## पुण्याचा 'सुधारक'.

पुण्याचा 'सुधारक' एकाक्ष आहेसें दिसतें त्याला आमच्या स्मृतिग्रंथांतलीं स्त्रीजातीविषयींच्या अन्यायाचीं तेवढीं वचनें दिसतात, आणि त्या वचनांच्या आधारावर तो आमच्या प्राचीन ऋषिवर्यांना रानटी हॉटेंटाट लोकांच्या वर्गांत नेऊन ठेवण्यास पाहतो. पण स्त्रियांना गृहदेवतेचा मान स्मृतिकारांनीं दिलेला त्याला दिसत नाहीं. पूर्वजांची निंदा करून पाश्चात्यांचें अंधपूजन करणें याचें नांव सुधारणा असें असेल तर आमच्या बंधूनें आपला क्रम अव्याहत चालू ठेवावा. मात्र अशा उपायानें सुधारणेला निष्कारण अप्रिय आपण करून ठेवीत आहों ही गोष्ट त्यानें ध्यानांत ठेवावी. सुदैवानें सुधारक ह्मणविणारे सगळे प्राणी पुण्याच्या सुधारका सारखे नाहींत. पंजाबचे मि० लाला लजपतराय हे ही सुधारक आहेत. त्यांचें आमच्या प्राचीन ग्रंथांतल्या स्त्रीविषयक वचनांविषयींचें मत पुण्याच्या सुधारकाच्या मताहून अगदीं भिन्न आहेत ते ह्मणतात कीं स्त्री व पुरुष यांच्या हक्कांचीं समानता आमच्या प्राचीन ग्रंथांनीं कबूल केली आहे. पुरुष हे श्रेष्ठ आणि स्त्रिया ह्मणजे निवळ गुरेंढोरें अशी कल्पना प्राचीन ऋषिप्रणीत ग्रंथांत कोठें ही नाहीं. फार काय पण पूर्वींच्या कायद्याच्या ग्रंथांतूनही स्त्रियांचे पुरुषांच्या बरोबरीचे हक्क मान्य करण्यांत आले आहेत. त्यांना अविभक्तकुटुंबांत स्वतःची खाजगी इस्टेट करतां येत असे. त्या इस्टेटीची व्यवस्था करण्याविषयीं स्मृतिग्रंथांनीं त्यांना दिलेली स्वतंत्रता पुरुषांच्या स्वतंत्रतेपेक्षांही अधिक होती. विभक्त कुटुंबांत पतीच्या निधनोत्तर तीच त्याच्या सर्वस्वाची मालकीण समजली जात असे. सारांश, पुण्याचे सुधारकांत ऋषिप्रणीत ग्रंथवचनांचें स्वरूप जें दाखविण्यांत येत आहे तें यथार्थ नसून केवळ एकांगी आहे. आणि अशा एकपक्षीय लेखांनीं पूर्वींच्या आमच्या संस्कृतीची टवाळी करून पाश्चात्य सुधारणेचा 'उदो' करण्याचा सुधारक कर्त्यांचा प्रयत्न निंद्य आहे असें कोणी ही सुज्ञ माणसास वाटल्यावांचून राहणार नाहीं.

## महाराष्ट्रसाहित्याची हानि.

आह्मास लिहिण्यास अत्यंत दुःख वाटतें कीं मुंबईचे सुप्रसिद्ध कविमुकुटमणी रा. गंगाधर रामचंद्र मोगरे यांस गेल्या आठवड्यांत देवाज्ञा झाली. यांनी रायल एशियाटिक सोसायटीच्या लायब्ररींत मुख्य लायब्रेरीयनचें कामाची आरली मुदत संपवून नुकतेच पेनशन घेतलें होतें. यांचा इंग्रजी व मराठी वाङ्मयाशीं इतका निकट परिचय होता कीं कोणत्याही विषयासंबंधाची साग्र माहिती कोणत्या ग्रंथांत कोठे मिळेल तें ते बिनचूक सागत. हे मराठींतले अग्रगण्य कवि होते. यांची कविता अगदीं साधी, पण प्रसादयुक्त व तेजस्वी असे हल्लीं कवित्व ह्मणजे वेडेपणा, कांहीं तरी बरळणें किंवा विक्षिप्तपणा असा जो अर्थ झाला आहे तो त्यांच्या कवितेला बिलकुल लागू नसे. यांनी मराठी ग्रंथकारास प्रार्थना अभिनव कादंबरी' 'सती' वगैरे कविता अतिशय सरस, प्रसादयुक्त आणि ओजस्वी आहेत. यांच्या कवितेंत कधीं कधीं विनोद ही फार उत्तम प्रतीचा आढळून येई. उदाहरणार्थ, पदव्यांचा पाऊस, मेथाजीची मजलस, व नुकतीच प्रसिद्ध झालेली पुण्याचे धर्माभिमानी या संबंधाच्या कविता पहा. बडोद्याच्या साहित्यसंमेलनाचे प्रसंगीं त्यांनी रचिलेली कविता उत्तम कवितेचा मासला ह्मणून अभिमान दाखविण्याजोगी आहे. हे स्फूर्ति झाल्याशिवाय कधीं कविता करीत नसत. यामुळें यांची कविता थोडीच, पण फार गोड व सरस होत असे. 'आनंद' मासिकांतली 'संक्रांतीचा तिळगूळ' या सारखी उत्तम कविता फारच थोडी पाहण्यास मिळते. रा. मोगरे यांच्या सारखे कविरत्न हरपल्यानें महाराष्ट्रभाषेची झालेली हानि भरून येण्यास फार कालावधि लागेल यांत शंका नाहीं.

## वऱ्हाडवृत्त

हवामान—वाळ्याचे पडदे लावून कृत्रीम थंडी उत्पन्न करण्याला प्रस्तुतचा तीव्र व कडक उन्हाळा भाग पाडीत आहे. रात्रीचा काळ फार रमणीय असतो व त्या वातानें गुलाबी थंडीचा लोकें हीं आरोग्यवृद्धी करितात. प्लेगाचा मुक्काम या शहरीं होतो कीं काय अशी भीती वाटत होती; पण ती बहुतेक दूर झाल्यासारखी दिसते.

रा. रा. लक्ष्मीनारायण ॲडिशनल डिस्ट्रिक्ट जज्य हे आकोल्याहून रायपुरास जाते वेळीं त्यांस येथील ज्ञानवारी येथील आगरवाले ज्ञातीकडून सार्वजनीक पानसुपारी करण्यांत आली. त्यांच्या ज्ञातीनें नोकरी पेशाचा गौरव केला हे थोडे विचित्र होय. पण सुखाची गोष्ट कीं या न्यायरत्नाचें त्यांनी बहुमोल केलें.

अभिनंदनः—रावसाहेब खुशालराव गणपतराव देशमुख अंदुरेकर यांस ग्वाल्हेर सरकारनें आपल्या कायदे कौंसिलांत घेतलें ही बातमी प्रसिद्ध करतांना आह्मास मोठा आनंद वाटतो व त्यांचा बहुविध अनुभव त्यांना आपल्या नव्या कामगिरीला चांगले तरबेज करील असा आह्मास चांगला भरंवसा आहे.

रा० रा० नारायण मुभाजी डिस्ट्रिक्ट जज्ज यांच्या निधनामुळें खाली होणारी जागा आतां कोणास देण्यांत येते या विषयीं वऱ्हाडची मंडळी विशेष काळजीनें चौकशी करीत आहेत.

रा० रा० किलरो असिस्टंट डायरेक्टर विद्याखातें यांस २ महिन्याची हक्काची रजा देण्यांत आली आहे.

रा. रा. बळवंत रघुनाथ पेंढारकर सबजज्य हे पेन्शन घेणार ह्मणून त्यांच्या जागीं रा. रा. रामराव माधो वाठोडकर यास यवतमाळ येथें सबजज्य नेमलें.

## जाहिरात

या जाहिरातीनें सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं माझा मुखत्यार सखाराम वल्लद लक्ष्मण तेली याचें कुलमुखत्यारपत्र रद्द केलें आहे तर आतां त्याच्याशीं माझ्या नावानें जो कोणी देवघेवीचा व्यवहार करील त्याजबद्दलची कोणतेच प्रकारची जबाबदारी मजवर नाहीं. कळावें तारीख २०-३-१९ इ०

द० अंबादास सखाराम द० खु०

सही

मारुती बागजी पाटील द० खु०

नो० नं० १०९

## जाहीर नोटीस

रा. रा. सखाराम वल्लद लक्ष्मणजी तेली रा० कसबे धामणी ता० मंगरूळपीर जि० आकोला पोस्ट मंगरूळपीर

यांस:—

खालीं सही करणार यांजकडून या जाहिर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं मि अज्ञान होतो ह्मणून माझी जन्म देती आई राधाबाई मर्द बाजी चोपडे तेली व चुलती लुगाबाई मर्द रामजी चोपडे तेली रा० कसबे धामणी ता० मंगरूळपीर या उभयतांनीं माझ्या मालकीच्या स्थावर जंगम इस्टेटीची व्यवस्था पाहण्या देवघेव वगैरे करण्यास व त्याचा कायदेशीर हिशेब ठेवण्यास कुलमुखत्यार पत्र दिले होते त्या मुखत्यारपत्राचे आधारें तुह्मी आजपावेतों कुल सर्व वहिवाट केली. आता मी सज्ञान झालों असून सर्व व्यवस्था पाहण्याजोगा आहे. यासाठीं तुह्मांस या जाहिर नोटिशीनें कळविलें जाते कीं तुमचें मुखत्यारपत्र आज पासून रद्द केलें आहे. तर तुह्मी ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत तुह्मी आजपर्यंत केलेल्या वहिवाटीचा हिशेब कागदपत्र देण्याघेण्यासंबंधीं वह्या कर्जरोखे वगैरे सर्व माझे स्वाधीन करून पावती घ्यावी ही नोटीस केली सही ता० २०-३-१९ इ.

द० अंबादास सखाराम रा० आकोला द खु.

सही

मारुती बागजी पाटील द. खु.

मु० आकोला कोर्ट दिवाणी

नो. नं. ११०

## नोटीस.

नोटीस कलम ११ एक्ट ८ सन १८९० प्रमाणें दिवाणी मुकदमा नंबर १६ सन १९१९ इ. दिग्मान डि० जज साहेब यांचें कोर्ट मुक्काम आकोला

नाव बायनाबाई मर्द परशराम

जात कुणबी राहणार अंभा।

तहसील मुर्तिजापूर जिल्हा आकोला

व्या अज्ञपनी किसन परशराम उमर वर्षे ८ राहणार अंभोरा ता० मुर्तिजापूर तहसीलीचे [२] किसन परशराम कुणबी साठीं पालन कर्ता [१] बायनाई मर्द परशराम ईस नेमण्याविषयींच्या अर्जा संबंधीं सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं सदर्हू अर्जदारानें सदर्हू अल्पवयीचे [२] स्वतःचे अणि त्याचे मिळकतीसाठीं पालन कर्ता बायनाई म. परशराम ईस नेमण्याविषयीं अर्ज केल्या वरून सदर्हु अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख २० माहे ४ सन १९१९ इ. रोजी नेमिली आहे. त्यावरून अशी नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदर्हु अर्जदाराच्या अर्जाबद्दल जर कांहीं तक्रार असेल तर त्यास जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जासंबंधीं सर्व मुद्याच्या सवालांना जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊ शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हाजर झालें पाहिजे; आणि त्यास असें ही नोटीस देण्यांत येत आहे कीं सदरी लिहिलेल्या दिवशीं तो हाजर न झाल्यास, त्याच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल. आज तारीख १० माहे ३ सन १९१९ इ. रोजी आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्यानिशीं दिली.

शिक्का

K. K. Thakar.

नो० नं० १११ डि० जज्ज आकोला

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.